

Late Dr. Bhau Mandavkar




ISSN 2349-9370
Vol. 4 Issue 1
Oct. 2017
Regular Issue

Impact Factor
2017 – 5.269
www.sjifactor.com

# Research Journal of India

(Peer Reviewed Multi-Disciplinary Annual National Research Journal)



Dr. Bhau Mandavkar Research Centre
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445401 (India)

Impact Factor 2017 – 5.269 ISSN 2349-9370

# RESEARCH JOURNAL OF INDIA

Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-Disciplinary Studies since 2014

Volume 4 Issue 1
October 2017
Regular Issue

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Principal, Indira Mahavidyalaya & Chairman, Research Centre

**Associate Editor**
**Dr. Veera Mandavkar**
Director, Research Centre

## ---- Editorial Board ----

**Prof. N.R. Thawale**
**Prof. R.M. Wath**
**Prof. N.V. Narule**
**Dr. G.P. Urkunde**
**Prof. S.Y. Lakhadive**
**Prof. D.S. Patil**
**Prof. R.T. Ade**
**Prof. M.P. Rakhunde**

## Invited Guest Editors

1. **Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
2. **Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
3. **Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
4. **Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

**Sonali Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**Prof. Dineshkumar Joshi,** Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
**Dr. Santoh Thakre,** Ex. Dean, Faculty of Social Science, S.G.B. Amravati Uni., Amravati
**Dr. P.W. Kale,** Ex. Dean, Faculty of Commerce, S.G..B. Amravati University, Amravati
**Dr. R.A. Mishra,** Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
**Dr. U.V. Navalekar,** Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
**Dr. J.M. Chatur,** Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
**Dr. Anil Gajbhiye,** Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
**Dr. Shashikant Sawant,** Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.

**Publisher : Dr. Mrs. Veera Mandavkar,** Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401(India)
E mail – **researchjournalofindia@gmail.com** Alternate mail id – **marathipradhyapak@gmail.com**
Telephone: 07201-226147, 226129 Telefax, Mob. Chief Editor: 9422867658 Director 9403014885
Website: **www.indiramahavidyalaya.com** **www.researchjournal.net.in**
**Printer: Seva Prakashan,** Vijay Colony, Rukmini Nagar, Amravati, Maharashtra 444 606
**Cover Page Design & Computer Work : Dr. Pavan Mandavkar**

**Subscription for hard copy for one year Rs. 500/-**

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | साठोत्तरी मराठी साहित्य : आदिवासी कविता | प्रा. डॉ. गणेश क. टाले | 3 |
| 2 | विदर्भातील दलित स्त्री चळवळ | प्रा. डी.डी. जोंधळे | 8 |
| 3 | A Practical Approach to Legislate and Implement the Uniform Civil Code | Dr. Ajay Nathani | 11 |
| 4 | SOCIAL MEDIA AND ITS USEFULNESS IN SURVEY RESEARCH | Mr. Shaileshkumar Narendra Pardeshi | 20 |
| 5 | पेरियार रामस्वामी – व्यक्ती आणि विचार | प्रा. एन. आर. ठवळे | 24 |
| 6 | साठोत्तरी मराठी कविता : एक अध्ययन | प्रा. पी.एस. निर्मळ | 27 |
| 7 | प्रेमा तुझा रंग कसा? : स्वरुप व समीक्षा | प्रा. डॉ. अविनाश श. धोबे | 31 |
| 8 | बंधुमाधवांची दलित कथा : एक चिकित्सा | डॉ. आर.एम. केदार | 34 |
| 9 | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात ग्रंथालयाचे योगदान | डॉ. जी.पी. उरकुंदे | 37 |
| 10 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील भटक्या–विमुक्तांचे जीवन दर्शन | प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण | 40 |
| 11 | स्मृतिस्थळ ग्रंथातील व्यक्तिचित्रे | प्रा. बालाजी डिगोळे | 44 |
| 12 | On the prey of Barn owl *Tyto alba* from Yavatmal city, Maharashtra | Ved Patki[1]* Varsha Zade[2] | 47 |
| 13 | जागतिकीकरण आणि मराठी कवयित्रींच्या कविता | प्रा. डॉ. ममता इंगोले | 52 |
| 14 | STRESS MANAGEMENT FOR LIBRARY PROFESSIONALS | Dr. Vibhavari Balaji Hate | 59 |
| 15 | महात्मा बसवेश्वर समाजवादी संत | प्रा. डॉ. गजानन हेरोळे | 62 |
| 16 | समाजवास्तवाचे भान ठेवणाऱ्या आधुनिक कविता | प्रा. डॉ. शोभा रोकडे | 65 |
| 17 | हिंदी में स्त्रीवादी साहित्य लेखन | प्रा. चौधरी ए. व्ही. | 67 |
| 18 | मुक्तिबोध की विश्वदृष्टि | प्रा. नयन भादुले–राजमाने | 70 |
| 19 | तिसऱ्या सहस्रकाची कविता: आस्वाद आणि आकलन | डॉ. सिध्दार्थ भगत | 73 |
| 20 | मुलांचे आत्मकेंद्रित होणे एक समस्या | प्रा. एस.वाय. लखदिवे | 79 |
| 21 | Ruthenium complexes an emerging field: Application in various fields | Snehal R.Khandekar[1], D.M.Chavhan[2] | 81 |
| 22 | डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या बालसाहित्यातील संस्कार आणि संस्कृती | प्रा.डॉ. नकुल जनार्दन धरमकर | 84 |
| 23 | अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्राचार्य डॉ. व्हि.एच. नागरे | 87 |
| 24 | बदलत्या वळणावरील उल्लेखनीय वैदर्भीय कादंबरी 'कात टाकलेली नागीण' | डॉ. पवन मांडवकर | 91 |
| 25 | राजे विश्वेश्वरराव यांचे सामाजिक व वेगळ्या विदर्भ चळवळीतील योगदान | प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर | 95 |


(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)

# साठोत्तरी मराठी साहित्य : आदिवासी कविता

प्रा. डॉ. गणेश क. टाले
मराठी विभाग प्रमुख
श्रीराम कला महिला महाविद्यालय,
धामणगाव रेल्वे, जि. अमरावती
ई–मेल : ganeshtale.tale@gmail.com भ्रमणध्वनी : 9423522891

साठोत्तर दोन दशकानंतर मराठी साहित्यात 'आदिवासी कविता' दाखल झाली आहे. आदिवासी कविता ही खास देशी वाणाची कविता आहे. उत्कटता, आत्मनिष्ठता ही या वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये असली तरी समूहनिष्ठा हे आदिवासी कवितेचे प्रधान लक्षण आहे. पुस्तकरूपाने प्रकाशित कवितासंग्रह मर्यादित असले तरी निवडक संपादन विविध कालिकांतून भरपूर कविता प्रकाशित झालेली आहे.

## वनवासी–उत्तमराव धोंगडे

महाराष्ट्रातील आदिवासींच्या जीवनावर लिहिलेला पहिला दीर्घ काव्यसंग्रह म्हणजे उत्तमराव धोंगडे यांचा 'वनवासी' (१९८४) हा होय. या दीर्घकाव्याच्या हेतूबद्दल धोंगडे म्हणतात की, ''आदिवासींनी स्वत: अनुभवलेल्या हालअपेष्टा, अफाट दारिद्रय, त्यांची होत असलेली फसवणूक, पिळवणूक, वर्षानुवर्षे चालत आलेल्या वेठबिगारीच्या कामाचा पिळवटून काढणारा अनुभव या साऱ्या गोष्टी आदिवासींना सहज समजण्यात आणि इतरांना त्याची कल्पना यावी व त्यांनी आदिवासींना सहकार्याचा हात द्यावा या भावनेने आदिवासी जीवनावर हे दीर्घकाव्य लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.''

स्वातंत्र्योत्तर तीस–पस्तीस वर्षानंतरचे आदिवासी समाज जीवनाचे वर्तमान वास्तव कवी या दीर्घ काव्यातून प्रकट करतात. पृथ्वीतलावर माणसाकडे परोपकार, दया, करुणा, सहानुभूती असण्यापेक्षा जंगलातील चंदनाची झाडा–फुलांचा परोपकार ते अभिव्यक्त करतात.

'झाडे वेली जंगली परोपकारी, देई फुले फळे
देई भाकरी पोटास तुमच्या, स्वत: चुलीत जळे''

आदिवासी जमातीचा रानात जन्म झाल्यामुळे कवी प्रारब्धाला दोष देऊन हतबल होत नाही. या संदर्भात प्राचीन पुराणकथेचा वारसा प्रकट करताना ते म्हणतात–

''नकोस देऊ दोष नशिबाला, रानात जरी जन्मला
होता लुटारू वाटसरूंचा, वाल्याचा वाल्मिकी झाला!.

प्राचीन काळातील आदिवासींचे वंशज असलेल्या व्यक्तिरेखेच्या पराभूत व जातीय विषमतेने दुर्लक्षित ठेवलेल्या मानसिकतेचे कवी या कवितेतून उदात्तीकरण करतात.

आदिवासींचं मूळ दुखणं आर्य–अनार्य संघर्षात आहे. मूळ निवासी अनार्यांना आर्य संस्कृतीने दूर डोंगरात लोटून भूदास, वेठबिगार ठरविले आहे. स्वत:च्या मातृभूमीतच उपरे ठरविले आहे. हेच उपरेपण त्यांच्या दुरावस्थेचे मूळ कारण असल्याचे कवी सूचित करतात.

''असती जरा लाज मनाची, नसतीच केली वर्णव्यवस्था
आमच्याच भूमीत उपरे आम्ही, नसती झाली दुरावस्था.''

आर्य संस्कृतीने अनार्य आदिवासींवर खोटी पुराणे लादली. खोटा व स्वार्थमूलक इतिहास लिहिला. इतिहास लेखनात आदिवासी वंचित राहीला आहे. रक्ताने इतिहास लिहिण्याची शपथ कवी काव्यातून घेतात.

## गोधड–वाहरू सोनवणे

वाहरू सोनवणे यांचा मराठी व भिल्ली या भाषेतील पहिला काव्यसंग्रह म्हणजे 'गोधड' (१९८७) होय. भिल्ल समाजातून शिकून सवरून पुढे आलेले सोनवणे हे केवळ कवीच नाहीत तर आदिवासींसाठी काम करणाऱ्या श्रमिक मुक्ती दलाचे एक सक्रीय सुजाण कार्यकर्तेही आहेत.

मराठी कवितेच्या क्षेत्रात दलित कवितेची पहिली लाट ओसरल्यानंतर वाहरू सोनवणे यांची आदिवासी जीवनावरील कविता वाचकांचे लक्ष वेधून घेते. दलित कवितेचे समिक्षक डॉ. महेंद्र भवरे म्हणतात की, दलित कवितेत एक प्रकारचा थंडपणा आला की काय असे वाटत असतानाच वाहरू सोनवणे यांची कविता पुढे आली.

गावकुसापासून शेकडो मैल दूर असलेल्या आदिवासीचे समूह जीवन 'गोधड' मधून आविष्कृत झाले. स्वातंत्र्योत्तर तीस वर्षानंतरही ज्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत, अशा आदिम समाजाच्या ठसठशीत वेदना या संग्रहातून प्रकट होतात. वाहरू सोनवणे यांच्या सर्वच कवितांची जातकुळी मराठी कवितेपेक्षा निराळी आहे. त्यांच्या कवितेचे नाते आदिवासी जनचळवळीशी आहे. त्या चळवळीचा हुंकार 'गोधड' मध्ये ऐकायला मिळतो.

आदिम दु:खाची जात, पदर, पोत, पूर्वपरंपरेपासून सतत भिन्न राहिला आहे. भूतकाळ ते वर्तमान काळातही फाटकी गोधड सोडवत नाही.

कारण त्यांच्या 'गोधड' या कवितेत—

''याच गोधडीत
पूर्वज विझत गेलेत
अश्रूंनी गोधड भिजत गेली
आणि
आंबट वास
आठवण देत राहिला
पूर्वज दु:खांची
आजच्या वारसदारांना
माझी फाटकी गोधड
मळलेली!''

फाटकी गोधडला शब्दार्थ नाही, तर आदिमांच्या जीवनातील दारिद्रय व शोषणाचा फाटकी गोधड अर्थ घेऊन येते. याच जीवनात कवीचे मन व्यथित झाले. 'स्त्री' हा वाहरूंचा चिंतनाचा खास विषय आहे. स्त्री, तिचे शोषण, शोषणाचा इतिहास, तिचे वर्तमान कालीन वास्तव कवी 'स्त्री' कवितेतूनही सूचित करतात. तरूणपण, म्हातरपण, चेटकीण, एकवस्तू समजून स्त्री देहाचा भोग, बलात्कार इ. अनेक रूपातील स्त्रीप्रतिमा कवी साकार करतात.

''एक वस्तू अशी
तिला वाटेत घाटेत
सापडेल तिथं रोखावं
मनात आले तर मिठीत घ्यावं
हौस फिटली तर सोडून द्यावं
हाक नाही बोंब नाही.''

पूर्वजांपासून वारसदारांपर्यंत 'फाटकी गोधड' हे दारिद्र्याचे प्रतिक आहे. आदिवासींचे आर्थिक व मानसिक शोषण करणारे, रस पिणारे ऊस आहे. देवदासी कवितेत स्त्री दास्य सूचित करणाऱ्या 'देवाच्या बकऱ्या' आहेत. माणूसकी देणारा चंद्र, आश्वासनांचे फुगलेले फोड, दास्याचा गारठा, फुगलेली जनावरं, दु:खाचं हिरवं वन, निराधारांना झोडपण्याचं प्रतीक म्हणून पाऊस इ. प्रतिमा, प्रतिके आदिवासी जीवनसन्मुख आहे. आदिवासींच्या विविधस्तरीय शोषणाचा अर्थ या प्रतिमांना प्राप्त होतो आहे.

## गोंडवन पेटले आहे — प्रा. विनायक तुमराम

प्रा. विनायक तुमराम हे एक आदिवासी कार्यकर्ते व कवी आहेत. आदिवासी कवींच्या प्रथम पिढीतील ते जेष्ठ कवी आहेत. त्यांचा 'गोंडवन पेटले आहे' (१९८७) हा पहिला काव्यसंग्रह होय.

'गोंडवन पेटले आहे', या काव्यसंग्रहातील कवीची आदिवासी जाणीव नेणीव पृथक आहे. युगानुयुगाची उपेक्षा, अवहेलना, दास्य फेटाळून वनवासमुक्तीचे स्वप्न पाहणारी कवीची जाणीव आविष्कृत होते. दीर्घकाळ वनवासीपणाचे जिणे जगण्यास भाग पाडणाऱ्या आर्य संस्कृतीबद्दल त्वेष, सूडभावना कवीच्या शब्दाशब्दातून निर्माण होते. एकेकाळी आदिवासींची सत्ता असणारे 'गोंडवन' का पेटले आहे? याची कारण मीमांसा कवी या

संग्रहातून करतात. भारताच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासातील आदिवासी पराक्रमी व शूरवीरांचे कर्तृत्व कवीला प्रेरणादायी वाटते.

'गोंडवन पेटले आहे', या संग्रहातील पहिलीच कविता 'थडग्यांचे गाव' ही आहे. प्राचीन काळापासून ते वर्तमान काळापर्यंत आर्य–अनार्य आदिवासी संघर्षात अनार्य आदिवासींचे अनेक पराक्रमी वीर पुरुष आदिवासी स्वातंत्र्यासाठी प्राणाला मुकलेले आहेत. त्यांच्या थडग्यांचे गाव अचानक कवीला गवसले आहे. त्यातून कवी स्वत:चा शोध घेत आहे. आदिवासींच्या जीवनातील अज्ञान, दारिद्रय, अमानुषता यातून कवीची वेदना मुखर होते.

''असवेच्या वादळी रात्री
उणावलेल्या आभाळातील ढगं चेतवून मी
सूर्यप्रांताकडे जाणारे रस्ते हुडकले
तेव्हा अचानक मला
माझ्या गणगोतांच्या थडग्याचे गाव
गवसले.''

ही थडगी म्हणजे कवीच्या नातेवाईक गणगोतांचीच आहे, असे प्रातिनिधिक स्वरूप या रचनेला प्राप्त होते.

प्रा. विनायक तुमराम यांची कविता वेदना, विद्रोहाची कविता आहे. ती आक्रमक व प्रक्षोभक आहे. संवादात्मक हे महत्वाचे वैशिष्टय आहे. तसेच ती कविता इतिहासाची चिकित्सा करणारी आहे. आदिवासींना माणूस म्हणून वागणूक मिळावी, एवढी माफक अपेक्षा तिची आहे. हीच अपेक्षा कवीने आपल्या कवितासंग्रहातून व्यक्त केली आहे.

## ऊलगुलान–भुजंग मेश्राम

'ऊलगुलान' हा भुजंग मेश्राम यांचा पहिलाच कवितासंग्रह (१९९०) साली प्रकाशित झाला. भुजंग मेश्राम यांची मातृभाषा गोंडी असून त्यांनी मराठी, गोंडी, बंजारी, परधानी, वऱ्हाडी, वारली अशा विविध भाषांमधून कवितालेखन केले आहे. भुजंग मेश्राम ऊलगुलान मधून आदिवासीचं मूळनिवासीपण, त्यांचे शोषण, धर्म, रूढी, परंपरा त्यांचे ऐतिहासिक वैभव, वर्तमान काळातील दारिद्रय, शोषण, भूक, उपासमार, आदिवासी स्त्रीजीवन, आदिवासी शिक्षण इ. विषयांवर काव्यलेखन केले आहे.

ऊलगुलान म्हणजे बिहार मधील आदिवासी क्रांतीकारक बिरसा मुंडाच्या क्रांतिकारक चळवळीची ती एक घोषणा आहे. म्हणजे सर्व स्तरातून ऊठाव. आदिवासींचं शोषण करणाऱ्या व्यवस्थे विरूध्द सर्वंकष विद्रोह पुकारणे होय. १९६० नंतरची दलित कविता ज्या आवर्तात सापडली, त्या आवर्तातून दलित कवितेला मोकळे करण्याचे काम भुजंग मेश्राम यांनी केले आहे.

शहर व गावकुसापासून शेकडो मैल दूर असलेल्या झाडीपट्टी, रानवस्ती, डोंगरदरीत जीवन व्यथित करणारा आदिवासी समाज 'ऊलगुलान' मधून साकार होतो. मेश्रामांच्या कवितेचा आशय प्रस्थापित मराठी कविता व दलित कवितेपेक्षा भिन्न आहे. अभिव्यक्ती, भाषा, पुराणकथा यांचेही वेगळेपण जाणवते.

ऊलगुलान मध्ये आदिवासी स्त्री हा कवींच्या खास चिंतनाचा विषय आहे. 'बाजारहाट' या कवितेमधून परधानी बोलीत धरणावरील विधवा स्त्रीचं भाव विश्व रेखाटलं आहे. धरणावर स्त्रियांना कमी मजुरी मिळते. अपुऱ्या मजुरीमध्ये या कवितेतील आई आपल्या मुलाचे स्वप्न साकार करू शकत नाही. घरात मुलाला कोंडून आई बाजाराला जाते.

'अस्या टेमाला हाटाले जातायनी, रूसणाऱ्या
पेराले घरात कोंडा लाग्ते आंदी'.

या कवितेतून आदिवासी स्त्रीच्या जीवनाची आर्थिक ओढाताण होताना दिसून येते.

दलित मुक्ती लढा व दलित साहित्याच्या चळवळीला जशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आहे. त्याचप्रमाणे आदिवासींची मुक्ती चळवळ व त्या चळवळीचं अपत्य असलेल्या आदिवासी साहित्याची प्रेरणासुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे तात्विक अधिष्ठान आहे. सर्वहारा अरण्यवासियांची स्वप्ने बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या संहितेत कोरून ठेवली आहेत.'ऊलगुलान' मधील कविता व्यथा, वेदना, नकार, विद्रोहाची कविता आहे. व्यवस्थाबदलाची मागणी ती करते. आत्मभावना प्रत्यय ती आणून देते. संवादमयता, उपरोधीकता

ही तिची प्रधान वैशिष्टये आहेत. फुले, आंबेडकरी जाणिवेची ती कविता आहे. आदिवासींच्या भूतकालीन व वर्तमानकालीन जीवनावर चिकित्सक भाष्य करणारी कविता आहे. ती समूहमनाचा अविष्कार आहे.

## जागवा मने पेटवा मशाली—प्रा.वामन शेळमाके

प्रा. वामन शेळमाके हे आदिवासी साहित्य चळवळीतील एक व्यापक दृष्टी असलेले सृजनशील प्रतिभावंत कवी आहेत. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'जागवा मने पेटवा मशाली' (१९९१) साली प्रकाशित झाला.

प्रा. वामन शेळमाके आपल्या कवितेतून आदिवासींच्या वनवासमुक्तीचा नारा अधिक बुलंद करतात. आदिवासींच्या व्यथा, वेदना, दु:खाची, वनवासीपणाच्या यातनेची जातकुळीच निराळी आहे. या जातकुळीशी कवी सहृदयतेच्या नात्याने जोडले गेले आहेत. डॉ. सुभाष सावरकर म्हणतात, ''या संग्रहातील कविता ही आर्त पण सच्या भावनेची वाहक आहे. ती ज्या परिसरातून, ज्या पर्यावरणातून उसळून बाहेर आली त्या परिसर पर्यावरणातील भल्या बुऱ्यांचा संपूर्ण गंध तिला लाभला आहे.'' 'जंगलचा राजा' या कवितेतून प्राचीन काळात जंगलचा राजा असणारा आदिवासी आजच्या वर्तमानात मात्र उपाशी, भटका भिकारी, पूर्वीचं राजवैभव गमावलेला बेकारीत जीवन जगणारा, बेघर असा असून सुध्दा तो इमानाशी मात्र प्रमाणित आहे. कारण—

'जंगलचा राजा आहे स्वाभिमानी,
विकली नाही संस्कृती प्रस्थापितांच्या बाजारी'.

क्रांतीचा वाहक असलेला कवी 'नव्या युगाच्या' प्रतिक्षेत आहे. यामुळेच प्रस्थापितांची सर्वच आमंत्रणे—निमंत्रणे नाकारली आहेत. 'असे झाले असते तर' या कवितेत आदिवासींच्या जीवनात असलेला काळोख प्रकाशमान करणारा सूर्य निर्माण झाला असता तर—

'मी सर्वांना उगवत्या सूर्याला नमस्कार
करावयास लावले असते
जयघोष केला असता
मिरवणूक काढली असती
आमच्या दारात सूर्य आणणारांची.''

असे सूर्योदय दाखविणाऱ्याचं स्वागत करण्यासाठी कवीचे मन उत्सुक आहे. वनातला आदिमानव भूकेसाठी तडफडतो आहे, तर शहरात जात, पंथ, धर्माच्या नावावर स्वार्थी, ढोंगी, धर्मांध प्रवृत्तीकडून दंगली पेटवून माणुसकीला काळीमा फासला जात आहे. माणुसकीचा बिमोड करणारे हात कलम करण्याचे कवीने ठरविले आहे. त्यांची कविता आवाहनाची कविता आहे. संघर्षशीलता हा तिचा स्थिरभाव आहे. ती पारंपरिक मिथ्स नाकारणारी कविता आहे. क्रांतिप्रवण आहे. आदिवासी जीवनाचाच गूढ अर्थ घेऊन येणाऱ्या जीवनसापेक्ष प्रतिमा या कवितेत आहे.

## तिरकमठा — सुनील कुमरे

सुनील कुमरे हे कार्यकर्ते आणि आदिवासी कवी आहेत. आदिवासी कवींच्या दुसऱ्या पिढीतील एक सृजनशील प्रतिभावंत आहेत. 'तिरकमठा' म्हणजे आदिवासी कूलभूषण धनुर्धर एकलव्याचे हे पारंपरिक व प्रहारी आयुध आहे.

तिरकमठा मधील पहिली कविता 'आदिवासी स्वातंत्र्य पर्वावर' या कवितेतून आदिवासी स्वायत्ततेची चर्चा सुरू असताना आदिवासींचे ख्रिस्तीकरण व हिंदुत्वकरण करण्याचे या देशातील धर्मांध शक्तीचे मनसुभे कवी लक्षात घेतात—

''जयश्रीराम म्हणतोस आणि जहरी तिरांनी
तू आदिवासी ज्ञातीवंतांचे मुंडके उडवतोस
धन्य निरंकार जपतोस आणि मुर्खाच्या
चरणी नमून वणव्याचा अध्यात्म विसरतोस
जयभीम गजरात परिवर्तनाच्या बाता खपवून
उपजातीची तेढ जोपासतोस.''

आदिवासींचा स्वातंत्र्यसूर्य बिरसा मुंडा, नारायणसिंह उईके यांच्या कार्याचे केव्हा स्मरण होणार असा प्रश्न कविमनाला पडतो.

आदिवासींमध्ये जात जमात जाणीव प्रबळ आहे. आदिवासी अस्तित्वाच्या निश्चित समीकरणासाठी विविध जमात विरहीत समाजरचना आवश्यक आहे. त्याशिवाय गोंड भूतलावर त्यांचे अस्तित्व सिद्ध होणार नाहीत. ही कवीची सामाजिक जाणीव त्यांच्या ''गोंडवनाच्या पेटत्या भूतलावर''कवीतेतून व्यक्त होते.

'अस्तित्वाच्या निश्चित समीकरणासाठी
गोंड–परधान–थोटी उतरंड उद्ध्वस्त करावीच लागेल
ही टाकावू परंपरा नाकारावीच लागेल!

आदिवासी कवींच्या पहिल्या पिढीतील उषाकिरण आत्राम, गंगाधर कुरसंगे, लक्ष्मण कदम, रा. वि. भुस्कुटे, पुरूषोत्तम शेडमाके, दशरथ मडावी, रायसिंग ठाकरे, संघजा मेश्राम, सोपान सुरकुले, प्रभु राजगडकर, रवी कुरसंगे, राजाभाऊ राजगडकर, नेताजी राजगडकर, चामुलाल राठवा. इ. कवींनी आदिवासी जाणीवेतून काव्यलेखन केले आहे. या सर्व कवींच्या कवीतांमध्ये आदिवासी जीवनाच्या व्यथा, वेदना प्रकट होतात. प्रतिमासृष्टीसुद्धा आदिम जीवन संस्कृतीशी निगडित आहे. आदिवासी कुलभूषण एकलव्याची प्रबळ प्रेरणा या कवितेला आहे. इतिहासातील पराक्रमी आदिवासी शूरवीर ही सर्वच आदिवासी कवींची श्रद्धास्थाने आहेत.

## संदर्भग्रंथ

१) वनवासी–उत्तमराव धोंगडे
२) गोधड–वाहरू सोनवणे
३) ऊलगुलान–भुजंग मेश्राम
४) तिरकमठा–सुनील कुमरे
५) गोंडवन पेटले आहे–विनायक तुमराम
६) आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा–विनायक तुमराम
७) जागवा मने पेटवा मशाली–वामन शेळमाके

❖❖❖

# विदर्भातील दलित स्त्री चळवळ

प्रा. डी.डी. जोंधळे
इतिहास विभाग प्रमुख
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा
भ्रमणध्वनी ९४२०१५९४७५

''स्त्री शुद्रो नाधीयता मिमिश्रुति'' असे स्मृतिवचन आहे. या वचनाप्रमाणे स्त्रियांनी व शूद्रांनी वेदाध्ययन करू नये, असे बंधन हिंदू धर्मने घातले होते. त्यामुळे सवर्ण हिंदू स्त्री शूद्र स्त्री व दलित स्त्री यांचा शिक्षणाच्या क्षेत्रातील दजा समान पातळीवरच होतो. जितकी दलित स्त्री मागासलेली व अज्ञानी होती. तितिकीच एकंदर हिंदू स्त्री शिक्षणाच्या बाबतीत होती. इंग्रजांच्या अमदानीतून या देशात शिक्षणाच्या प्रसाराला चालना मिळाली आणि यातूनच आगरकर, लोकहितवारी, ज्योतिबा फुले आदि समाज सुधारक उदयास आले. आगरकर, लोकहितवारी , रानडे, गोखले आदि समाज सुधारकांची चळवळ कवेळ उच्च वर्णातील वर्गापुतीच मर्यादित होते. स्त्रीवर्गाच्या सुधारणावादी विचारांचा ओघ हा उच्चवर्गीय स्त्री समाजाला स्पर्श करणारा होता. त्यामुळे दलित स्त्रीवर्गावर यासमाज सुधारकांच्या चळवळीचा काहीच परिणाम घडून येऊ लागला नाही. कारण त्या दलित, अस्पृश्य होत्या. दलित—अस्पृश्य समाजाप्रमाणेच त्यांनाही शिक्षण घेण्याचा काहीच अधिकार नव्हता. परंतु ब्राम्हणेतर चळवळीचे प्रणेते व अस्पृश्योद्धारक चळवळीचे जनक म. ज्योतिबाराव फुले यांनी दलित स्त्री वर्गाला सुशिक्षित देण्याकरिता महाराष्ट्रात पहिली शाळा स्थापन करुन दलित स्त्री समाजाच्या उत्थानाचा प्रयत्न करण्याचा अग्रमान म. ज्योतिराव फुलेंना द्यावा लागेल. कोल्हापूरचे छत्रपती कै. शाहू महाराज हे तर अस्पृश्य समाजाचे हितकर्ते व उद्धारक होते. सामाजिक क्रांती घडवून आणणऱ्या समाजसुधारकांच्या मालिकेतील शाहू महाराज हे अग्रणी होते. कै. विठ्ठल रामजी शिंदे यांनीही दलितांच्या उत्थनाकरिता बरेच मोठे कार्य केले. त्यांनी महाराष्ट्रात इतर ठिकाणी तसेच विदर्भात अस्पृश्य मुलींच्या शाळा स्थापन करुन त्यांच्या शिक्षणाला प्रामुख्याने प्रोत्साहन दिले.

दलित स्त्री चळवळ ही दलित समाजाच्या उत्थानाच्या चळवळीशी निगडित होती. प्रगती करण्याच्या दृष्टीने दलित समाजाला जसजशा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय सवलती उपलब्ध होत गेल्या, तसातसा दलित स्त्रीवर्गाने सुध्दा एकूण समाजाच्या प्रगतीच्या चढाओढीत पुरुष वर्गाच्या बरोबरीने हिरिरीने पुढाकार घेतला.

हिंदू समाजातील स्त्री वर्गाचा अभ्यास करताना असे दिसून येईल की त्रेवर्णिक हिंदू स्त्री आणि बहुजन समाजातील म्हणजेच शूद्र समजल्या जाणाऱ्या वर्गातील तसेच सवर्ण अथवा दलित अस्पृश्य स्त्री यांच्या सामाजिक समस्यामध्ये फार मोठे अंतर होते. त्रेवर्णिक हिंदू स्त्री ही आपल्याच वर्गातील पुरुषांच्या दास्यत्वाच्या बंधनात जखडली गेलेली होती. धर्मशास्त्राच्या जोखंडाखाली त्रेवर्णिक स्त्रीला कोणतेही सामाजिक स्वातंत्र्य नव्हते. त्रैवर्णिक हिंदू स्त्रीला कोणत्याही प्रकारे घटस्फोट घेण्याचा अथवा विवाहविच्छेद करण्याचा अधिकार नव्हता. पुनर्विवाह करता येत नव्हता. पतिनिधनंतर ती तरुण असली तरी तिच्या डोक्याचे वपन करण्यात येत असे. विवाहानंतर तिच्या पतीगृही तिचा कितीही छळ होत असला, तरी तिला स्वतःच्या आईबापाचा सुद्धा आश्रय मिळणे दुरापास्त असे. कारण तिचे कन्यादान झालेले असे. कोणत्याही वस्तूचे एकदा दान केले की त्या वस्तूला दान करणाऱ्या व्यक्तीची मालकी संपुष्टात येते आणि ज्यास ती वस्तू दान दिली असेल त्या व्यक्तीकडे त्या वस्तूची मालकी जाते. हे दानाचे तत्त्व आहे. याचा अर्थ असा की, जंगम किंवा स्थापन मालमत्तेचे जसे दान करता येते त्याप्रमाणे त्रैवर्णिक हिंदू स्त्री सुद्धा मालमत्ताच समजण्यात येते. तिचे मानवी स्वतंत्र अस्तित्व हिंदू धर्मशास्त्रास मान्य नव्हते. म्हणूनच वस्तूसारखी तिची विल्हेवाट लावताना तिचे कन्यादान केले जात होते. त्यामुळे आईबापाचा आपल्या कन्येवरील हक्क कायमचा संपुष्टात आलेला होता. कन्यादानाच्या पद्धतीने त्रैवर्णिक हिंदू स्त्री कायमची पुरुषाच्या गुलामगिरीत व सामाजिक दृष्ट रुढींच्या बंधनात जखडली गेली. हुंडा पद्धती ही तर त्यांच्या जीवनातील भयंकर सामाजिक रुढी होती आणि आजही त्या दुष्ट रुढींपायी असंख्य स्त्रियांचे बळी घेले जात आहेत. परंतु बहुजन समाज व दलित वर्गातील स्त्री मात्र वरील सामाजिक दास्यत्वाच्या बंधनापासून पुर्णतः मुक्त होती. या वर्गातील स्त्री वर्गाला बरेच व्यापक सामाजिक स्वातंत्र होते. दलित स्त्रीला घटस्फोट अथवा काडीमोड करण्याचा सामाजिक रूढीने अधिकार प्राप्त होता. तिला पतिनिधनानंतर पुनर्विवाह करता येत असे. काडीमोड घेतल्यानंतर पहिला पती जिवंत असताना तिला दुसरा घरठाव करणाचा हक्क होता. अशा प्रकारच्या विवाहाला

पाट लावणे म्हणतात. ह्या प्रथेला सामाजिक मान्यता होती. पती निधनानंतर दलित स्त्रीला तसेच बहुजन समाजातील सुद्धा बालविवाह स्त्रियाला केशवपन करावे लागत नसे. बालविवाहाची प्रथा मात्र सर्वच समाजाध्ये रूढ झाली होती. दलित समाजात सुद्धा बालविवाह प्रथा मान्यता पावली होती. दलित स्त्रीला काडीमोड करण्याचा सामाजिक हक्क प्रचलीत असल्यामुळे, तिच्याबाबतीत घडणाऱ्या कोणत्याही अन्याय प्रसंगी तिच्या आईबापाचा आश्रय तिला नेहमीच मिळत असे. कारण दलित समाजाला 'कन्यादान' तत्त्व मान्य नव्हते. त्यामुळे अशा प्रसंगी निराधार राहण्याचा तिच्यावर प्रसंगच येत नसे. पुनर्विवाह अथवा पाट करुन काडीमोड घेतलेल्या दलित स्त्रीला आपले वैवाहिक जीवन नव्याने सुरू करता येत नसे. या प्रथेमुळे दलित स्त्रीचा पुर्नविवाह होण्याची फारशी अडचण राहात नसे. या दृष्टीने दलीत स्त्री ही सुरुवातीपासूनच सामाजिक स्वातंत्र उपभोगित आली आहे. ज्यावेळी उच्चवर्णीय समाजसुधारक स्त्री वर्गाला घटस्फोटाचा, पुनर्विवाहाचा अधिकार प्राप्त व्हावा म्हणूनच, तसेच पति निधनानंतर स्त्रियांचे केशवपन करु नये, म्हणून लोकात जागृती करीत होते. त्यावेळी दलित स्त्री मात्र ह्या सर्व सामाजिक अनिष्ट रूढींपासून मुक्त होती. दलित समाज ज्यावेळी अस्पर्श व बहिष्कृत मानला असला, त्याचा सामाजिक दर्जा कितीही कनिष्ठ गणला गेला असला, तो दारिद्र्यात पिचलेला असला तरी दलित समाजाचे आपल्या स्त्री वर्गाच्या सामाजिक दर्जासंबधींचे आचारविचार हे पुढारलेले व आधुनिक हे मान्य करावे लागेल.

हुंड्याची प्रथा दलित समाजात कधीच नव्हती. उलट सुधारणेच्या काळापूर्वी महार समाजात मुलीच्या लग्नात मुलीवर काही रक्कम घेण्याची वहिवाट होती. परंतु ही प्रथा सऱ्हास नव्हती. नागपुरातील जाती पंचायतीच्या सभेने १९२० मध्ये मुलीवर पैसे घेऊ नये आणि पाटांच्या बाईवर बापाने फक्त पंचवीस रुपये घ्यावा असा निर्णय घेतलेला होता. मुलीचे लग्नप्रसंगी वरपित्याला पंचाची बाबत म्हणून सोळा रुपये द्यावे लागत. त्यापैकी साक्षगंधात पाच रुपये, सगाईत नऊ रुपये व लग्नात दोन रुपये द्यावे लागत. यातूनच पंचातर्फे काही रक्कम मुलीकरिता देणगी म्हणूनच खर्च करण्यात येत असे. काही ठिकाणी पंचाची बाबत म्हणून तीस रुपये घेत असत. पुढील काळात सुधारणा घडून येईपर्यंत पंचाची बाबत सोळा रुपये व तीस रुपये या मुद्यांवर महार पंचायतीत मतभेद झाले आणि यातूनच महार पंचायतीत सोळावाले आणि तीसवाले असे दोन गट पडले. लग्नात मुलीच्या आईबापानी वरपक्षाला दागिने मागू नयेत व वराने दागिने वाहु नयेत, असा विचार जातीपयंचायतीचा होता. त्यामुळे मुलीला लग्न प्रसंगी दागिने वगैरे देणे हे केवळ वरपक्षाच्या मर्जीवर व ऐपतीवर अवलंबून होते. मुलीचे लग्नप्रसंगी मुलीवर काही रक्कम घेत असल्याची ती वहिवाट पूर्ण होती, ती साधारणत: अत्यंत गरीब असलेल्यांच्याच बाबतीत लागू होती. सामान्यपणे दलित समाजातील स़्री लग्नादी व्यवहारात विकली जाणारी अथवा खरेदी केली जाणारी वस्तु समजली जात नव्हती. तसेच वर हुंडा देउफन खरेदी केला जात नव्हता. अशा समानतेच्या पातळीवर दलित समाजातील दलित स्त्रिचा सामाजिक दर्जा होता हे स्पष्ट होते.

दलित स्त्रिया दलित समाजांतर्गत असलेला सामाजिक दर्जा हा पातळीवर होता, ही बाब लक्षात घेत दलित स्त्रिला स्वत:च्या सामाजिक दास्यत्वाच्या मुक्तीची चळवळ स्वतंत्रपणे उभारण्याची गरजच मुळी भासली नव्हती. दलित स्त्री व पुरुष यांचे सामाजिक, आर्थीक, शैक्षणिक व राजकीय प्रश्न एकच असल्यामुळे दलित समाजाच्या सर्वव्यापक उत्थानाच्या चळवळीत दलित स्त्री समरस व सहभागी होऊ शकली.

पर्यायाने आपल्याला हेही मान्य करावे लागेल की, दलित स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे स्वातंत्र्य होते. आर्थिक क्षेत्रात दलित स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने मेहनत– मजुरी करण्यात कधीही मागे राहिली नाही. शेतातील मोलमजुरी असो की गिरणीतील काम असो, अथवा गृहनिर्माण कार्य, रस्ते निर्माण कार्य किंवा कोणत्याही प्रकारचे श्रममजुरीचे काम असो, दलित स्त्री पुरुषाच्या बरोबरीने कार्यरत राहिली असल्याचे दिसून येते. दलित वर्गातील महार समाजालाच हा विदर्भ विभागात तत्पूर्वी विणकरी हाच प्रमुख व्यवसाय होता. नागपूरकर भोसल्यांच्या काळात विणकर महारांना 'मठ्ठे' म्हणत. आम ग्रामीण जनतेच्या गरजेचे कापड बहुतेक प्रत्येक जिल्ह्यातून तयार करणारा विणकर हा महारच होता. तेव्हा या विणकरीच्या व्यवसायात दलित स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने बरेच काही काम करीत असे आणि त्या दृष्टीने अर्थोत्पदनात दलित समाजातील स्त्रिया बरोबरीचा वाटा राहिला आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, लेखक : एल.एल. कोसारे, नेहार प्रकाशन गुरुनानकपुरा नागपूर – १७, २०१२

२) डॉ. आंबेडकराची भाषणे, संपादक, मा.फ. मांजरे, प्रकाशन महेंद्र मांजरे, अशोक प्रकाशन नागपूर

३) म.प. मंगुडकर, 'महाराष्ट्रातील लोकशाही विचार', प्रकाशक प्राचार्य एम.एल. शहारे, मिलींद महविद्यालय औरंगाबाद
४) दलितांचे शिक्षण , देविदास घोडस्वार
५) एम.ई. भगत विदर्भातील दलित विचार आणि नेतृत्व, संपादक , डॉ. पी.एल. जोशी, पॉलिटीकल आयडिया इन विदर्भ, प्रकाशन सिल्वर जुबली कमिटी डिपार्टमेंट ॲडम पॉल सा.नाग. वि.पी. नागपूर
६) विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, लेखक ल.स. कोसारे, दीप प्रकाशन, नागपूर

❖❖❖

# A Practical Approach to Legislate and Implement the Uniform Civil Code

**Dr. Ajay Nathani**
**District Judge and Principal**
**Government Law College, Mumbai**
drajayn@gmail.com 9920582543

## Introduction

Article 44 of the Constitution of India imposes a duty on the Government of India by emphasizing that the State shall endeavor to secure for the citizens a The Uniform Civil Code throughout the territory of India. India already has the Civil Procedure Code which is the The Uniformly applicable to all. The diversity primarily is in respect of laws relating marriage and succession. This article envisages creating the The Uniform statutory provisions and procedures for marriage, succession, adoption and other correlated affairs for all citizens of India. Even after 70 years of independence the Union is unable to legislate The The Uniform Civil Code. It is because various religious groups oppose such legislation on the ground that it will take away their right of religious freedom guaranteed under article 25 of the constitution. The apprehension doesn’t seem to be legal and logical in the light of observations in the case of **John versus Union of India (2003) 6 SCC 611** wher it is held that religion and religious practices are two different terms. Article 25 guarantees religious freedom however it doesn't provide freedom to follow religious practices.

The purpose of introducing article 44 in the constitution so far so far as I can make it out is embedded in the basic structure of the Constitution. In the Preamble of the Constitution entire India is referred as “we the people of India”. Distinguished Human Rights are conferred on the citizens under chapter 3 of the constitution as fundamental rights. The fundamental rights are guaranteed by making appropriate safeguard under article 32. By giving this framework the framers of the Constitution desired that all the Indians should have the concept of oneness and in order to emphasize this concept it might have been thought that in future all the citizens of India shall have similar laws for all the affairs. The second aspect seems to be of molding the religious practices of different communities and religious groups in such a way that every citizen of India shall be free from shackles of religious practices which refrain him from enjoying rights and freedom enshrined in the Constitution. These shackles deny him opportunities to enjoy and explore fundamental rights and develop his personality to the fullest.

My aim to propose the Uniform Code in respect of marriage, divorce, adoption, maintenance and succession is not to propose legislation of a compulsive Code compelling all the citizens, who follow diverse religious practices, to depart from these practices and start following some other practices. My aim is to propose the Uniform Code which will be in tune with the fundamental rights with liberty to everyone to elect application of the Uniform Code. Education and wisdom brought by the education will guide the citizens to accept the provisions of the The Uniform Code so that they and their progeny can proudly say that they follow the law which is in accordance to fundamental rights conferred on them by the constitution of their country which they have adopted on independence of the nation.

The Hindu Code, which is compilation of four statutes governing marriage, succession, adoption and guardianship, is applicable to followers of the Hindu, the Sikh, the Jain and the Buddha religion. The affairs of members of the religious groups, who are exempted from the application of the Hindu Code, are governed by separate statutes. Muslims are governed by their personal law which is not codified except for the Shariat Act and the Muslim women (Right to Protection on Divorce) Act.

Besides the Hindu Marriage Act the Union government legislated the Special Marriage Act, which is applicable to the citizens, whose marriage is, either solemnized or, registered under the said Act. Provisions of this Act are mostly similar to the Hindu Marriage Act; however a deliberate deviation seems to have been made in certain provisions to make it a broad based legislation. With certain changes the special Marriage Act can be adopted as the Uniform Code in respect of marriages for all the Indians. This Act can be applied as the Uniform Code regulating affairs of marriages and all ancillary aspects of the marriages in all the religious groups to whom the Hindu Marriage Act is applicable. For the rest of the Indians applicability can be made voluntary. I will deal with major provisions of the Act suggesting required changes for its adaptation as the Uniform Marriage law.

**Applicability** – The special Marriage Act is applicable to the marriages performed under the Act or registered under the Act as provided under Section 18 of the Act. It provides reasonable grounds for seeking relief of restoration of conjugal rights, judicial separation, divorce, custody of children and maintenance. It also provide for procedure for seeking relief. Jurisdiction to grand these reliefs after due trial is vested in the Civil Courts. It can be made applicable to all the Indians carving out exceptions for the persons who are exempted from the application of the Hindu Marriage Act giving them liberty to take the benefit of the provisions of the Act by either performing the marriage under the said Act or to get the marriage registered under the Act. Educated girls and the educated parents will definitely like to have marriage performed or registered under this Act to avoid uncertainty of dissolution of marriage otherwise than by judicious process prescribed under the Act. Awareness also can be sprayed amongst the people about the benefits of registration of marriage under this Act. By this way most of the Indians can be brought under the sway of this Act by avoiding confrontation between different religious groups.

**Conditions relating to solemnization of marriage** - Section 4 of the special Marriage Act provides that neither party to the marriage shall be minor, insane or within the degrees of prohibited relationship. Other statutes governing marriages in different religious groups also prohibit marriages of minors. No religion permits marriage of insane. Consent for marriage of bride and bridegroom is essential in most of the communities. In the Mohammedans it is a must. First two conditions for a valid marriage in the Special Marriage Act are according to religious practices of all Indians. In respect of third condition of prohibited relationship special marriage act provides a way out. As per proviso to S. 4 (e) Marriage within prohibited relationship can be permitted if the custom of any tribe, community, group or family permits. By continuing this proviso there can be a valid marriage even if bride and bridegroom are within the degrees of prohibited relationship if required conditions are satisfied. In addition to these conditions some more requirements for marriage can be introduced in order to make the statute more scientific. Scientific conditions like both parties shall have medical certificate declaring HIV negative status, fitness to have conjugal relations with the other party and medical compatibility to have healthy progeny etc. can be introduced.

**Process of solemnization of marriage and registration of marriage –** The Special Marriage doesn't indorse to any rituals of marriage. Provisions of the special Marriage Act in this regard may be continued as they are.

**Restitution of conjugal rights** - provisions of section 22 of the special Marriage Act require that petition for restitution of conjugal rights can be moved against a spouse who has withdrawn from the company of another without reasonable cause. Practice followed in every religion requires that after marital bond the spouses should continue to have conjugal relationship and no partner can withdraw from the relationship without any reasonable excuse. In view of these practices this provision will be acceptable to all the religions.

**Void marriages** - Petition to declare void marriage can be presented on the ground that on the date of marriage the petitioner was unable to give consent, insane, under prohibited relationship or incapable of cohabitation because of impotency. First two conditions are the requirements of valid marriage. As discussed above these are the requirements of a valid marriage in all the religions and therefore contravention of any of them would be a proper ground for annulment of marriage. One of the reasons to create institution of marriage is to legitimize sexual relationship so as to preserve morality in the society. Impotency of any of the spouse defeats the purpose of the marriage and therefore impotency of any of the spouse is appropriate ground to annul the marriage. All these grounds can therefore be continued in the new legislation as grounds to declare a marriage void.

**Voidable marriage** - Marriage not consummated because of refusal of spouse, wife being pregnant by some person other than the husband, consent of either party obtained by coercion or fraud are the grounds for seeking declaration to annul the marriage as voidable. Similar are the ground for declaration of a marriage as a voidable marriage in the Hindu Marriage Act. As I mentioned earlier in all the religions the purpose of the marriage is to legitimize sexual relationship between spouses. Avoidance of consummation of marriage therefore is a proper ground to seek declaration to annul the marriage at the option of aggrieved spouse. Marriage is supposed to be a sacred relation in all the religions. Exercise of fraud to marry is not tolerated by any religion. For this reason the ground of fraud to seek consent for marriage is a proper ground to annul the marriage for the spouse whose consent is

so obtained. This ground is certainly acceptable to members of all religions. All religions also recognize faithfulness of the spouses to each other. One more purpose of the marriage in all religions is to procure a child who is biological descendant of the spouses. In the light of this aspect pregnancy of a wife from some other person is a proper and acceptable ground for annulment of marriage.

**Divorce and judicial separation** - The grounds for divorce and judicial separation are almost similar in the special Marriage Act. Grounds for divorce and judicial separation in the Hindu Marriage Act are mostly similar to the ground in the special Marriage Act. Statutory grounds for divorce in Hindus, Christians and Parsi emphasize that matrimonial relation can be put to an end if there are some justified reasons. This justification shall be well established before the court of law. In the Muslims, however, as per prevalent practice, a Muslim, who is of sound mind and has attained puberty, may divorce his wife without giving any reason. Eminent writer **Amir Ali** in his Mohammedan law 5th edition commented on practices existing before advent of Islam. He comments "At the time of prophet's appearance, the Hillelite Doctrines were chiefly in force among the Jewish Tribes of Arabia and repudiation of marriage by the husbands were common amongst them."(Page 471) He further writes, "The reforms of Muhammad marked a new departure in the history of eastern legislation. He restrained the power of divorce possessed by the husband, he gave to the women a right to obtain separation on reasonable Grounds, and towards the end of his life he went so far as practically to forbid its exercise by the men without the intervention of arbitrator or a judge."(Page 472)

Honorable apex court in the case of **Juveria versus Atif Iqbal (SLP number 8056 of 2013)** considered various judgments and observed,

*"13. The concept of dissolution of marriage under Muslim Personal Law was noticed and discussed by Single Judge of the High Court of Delhi in Masroor Ahmed vs. State (NCT of Delhi) and Anr., (2007) ILR 2 Delhi 1329. In the said case, the High Court noticed different modes of dissolution of marriage under the Muslim Personal Law (Shariat) and held:*

*"15. The question which arises is, given the shariat and its various schools, how does a person proceed on an issue which is in dispute The solution is that in matters which can be settled privately, a person need only consult a mufti (jurisconsult) of his or her school. The mufti gives his fatwa or advisory decision based on the Shariat of his school. However, if a matter is carried to the point of litigation and cannot be settled privately then the qazi (judge) is required to deliver a qaza (judgment) based upon the Shariat(A qazi (or qadi) is a judge appointed by the political authority or state. He or she may pass judgments in his or her jurisdiction in respect of many legal matters, including divorce, inheritance, property, contractual disputes, etc. Schacht, p. 188. A qaza or kada is a judgment, which must be given according to the madhab to which the qadi belongs. Schacht, p. 196. More information on qazis and qazas can be found at pp. 188-198.). The difference between a fatwa and a qaza must be kept in the forefront. A fatwa is merely advisory whereas a qaza is binding. Both, of course, have to be based on the shariat and not on private interpretation de hors the shariat(Abdur Rahim, p. 172 (in respect of qazis) the Muslim Personal Law (Shariat) Application Act, 1937 and the various forms of dissolution of marriage recognized by it.*

*16. In India, the confusion with regard to application of customary law as part of Muslim law was set at rest by the enactment of The Muslim Personal Law (Shariat) Application Act, 1937 . Section 2 of the 1937 Act reads as under:- 2. Application of Personal Law to Muslims.-- Notwithstanding any customs or usage to the contrary, in all questions (save questions relating to agricultural land) regarding intestate succession, special property of females, including personal property inherited or obtained under contract or gift or any other provision of Personal Law, marriage, dissolution of marriage, including talaq, ila, zihar, lian, khula and mubaraat, maintenance, dower, guardianship, gifts, trusts and trust properties, and wakfs (other than charities and charitable institutions and charitable and religious endowments) the rule of decision in cases where the parties are Muslims shall be the Muslim Personal Law (Shariat ). The key words are notwithstanding any customs or usage to the contrary and the rule of decision in cases where the parties are Muslims shall be the Muslim personal law (shariat). This provision requires the court before which any question relating to, inter-alia, dissolution of marriage is in issue and where the parties are Muslims to apply the Muslim personal law (shariat) irrespective of any contrary custom or usage. This is an injunction upon the court (See: C. Mohd. Yunus v. Syed Unnissa: (1962) 1 SCR 67) . What is also of great significance is the expression - 'dissolution of marriage, including talaq, ila, zihar, lian, khula and mubaraat. This gives statutory recognition to the fact that under Muslim personal law, dissolution of marriage can be brought about by various means, only one of which is talaq. Although Islam considers divorce to be odious and abominable, yet it is permissible on grounds of pragmatism, at the core of which is the concept of an irretrievably broken marriage. An elaborate lattice of modes of dissolution of marriage has been put in*

*place, though with differing amplitude and width under the different schools, in an attempt to take care of all possibilities. Khula, for example, is the mode of dissolution when the wife does not want to continue with the marital tie. She proposes to her husband for dissolution of the marriage. This may or may not accompany her offer to give something in return. Generally, the wife offers to give up her claim to Mahr (dower). Khula is a divorce which proceeds from the wife which the husband cannot refuse subject only to reasonable negotiation with regard to what the wife has offered to give him in return. Mubaraat is where both the wife and husband decide to mutually put an end to their marital tie. Since this is* ***divorce by mutual consent*** *there is no necessity for the wife to give up or offer anything to the husband. It is important to note that both under khula and mubaraat there is no need for specifying any reason for the divorce. It takes place if the wife (in the case of khula) or the wife and husband together (in the case of mubaraat) decide to separate on a no fault/no blame basis. Resort to khula (and to a lesser degree, mubaraat) as a mode of dissolution of marriage is quite common in India."*
*14. From the discussion aforesaid, what we find is that 'Khula' is a mode of dissolution of marriage when the wife does not want to continue with the marital tie. To settle the matter privately, the wife need only to consult a Mufti (juris consult) of her school. The Mufti gives his fatwa or advisory decision based on the Shariat of his school. Further, if the wife does not want to continue with marital tie and takes mode of 'Khula' for dissolution of marriage, she is required to propose her husband for dissolution of marriage. This may or may not accompany her offer to give something in return. The wife may offer to give up her claim to Mahr (dower). The 'Khula' is a mode of divorce which proceeds from the wife, the husband cannot refuse subject only to reasonable negotiation with regard to what the wife has offered to give him in return. The Mufti gives his fatwa or advisory decision based on the Shariat of his school. However, if the matter is carried to the point of litigation and cannot be settled privately then the Qazi(Judge) is required to deliver a qaza (judgment) based upon the Shariat.*

*15. In the present case, the appellant stated that she has obtained an ex parte 'Khula' on 9th May, 2008 from Mufti under the Muslim Personal Law. Neither it is pleaded nor is it made clear by the appellant or the 1st respondent as to whether for such 'Khula the appellant made a proposal to husband-1st respondent for dissolution of marriage accompanied by an offer to give something in return. It has not been made clear that whether the appellant gave up her claim to Mahr(dower). The husband, 1 st respondent has not accepted 'Khula' given by Mufti (jurisconsult) which is in the form of fatwa or advisory decision based on the Shariat. He, however, has not moved before the Qazi (Judge) to deliver a qaza (judgment) based upon the Shariat. Instead, he has moved before the Family Court, Bandra against the 'Khula' by filing petition-M.J. Petition No.B-175 of 2008. He has also prayed for restitution of conjugal right. Therefore, with no certainty, it can be stated that the divorce was taken on 9 th May, 2008.*

*16. In Shamim Ara vs. State of U.P. and Anr., (2002) 7 SCC 518, this Court considered valid 'Talaq' in Islamic Law. This Court while discussing the correct law of 'Talaq, as ordained by the Holy Quran observed that Talaq must be for a reasonable cause and be preceded by attempts at reconciliation between the husband and the wife by two arbiters - one from the wife's family and the other from the husband's; if the attempts fail Talaq may be effected. The Court further held that the Talaq to be effective has to be pronounced."*

Observations of their lordships based on various commentaries of Mohammedan law and comments of eminent writer Syed Amir Ali make it very clear that the practices in Mohammedan law also require that there should be positive reasons for effecting divorce. Whether the said reasons are sufficient or not is to be decided by two wise persons. Provisions of the Special marriage Act also require that the party seeking divorce or Judicial separation shall establish ground mentioned in the Act to the satisfaction of a Judge.

**Need for Flexibility in divorce law** - Recent judicial pronouncements have made the process of divorce more and more flexible. Before legislation of the Hindu Code marriage in the Hindus was considered to be an inseparable Bond. The Hindu Code introduced concept of divorce and remarriage and provided Grounds on the basis of which either of the spouse can seek divorce. The principle of relaxing waiting period on the ground of irretrievability of resumption of marital relations brought a desired flexibility in the process of granting relief of divorce by the Courts. It reminds me of Sahir Ludhianvi's few lines which go as under,

पेरियार रामस्वामीचे शिक्षणविषयक विचार क्रंतिकारक होते. आजच्यासारखे शिकून लाचारीचे जिवन जगणे त्यांना मान्य नव्हते. त्याऐवजी शिक्षणात माणूसकी, स्वाभीमान, नावलौकीक व आत्मसन्मान मिळेल असे शिक्षण दिले जावे त्यामुळे मुलांना प्रात्यक्षिक जीवनाचा अर्थ स्पष्ट करणारे, त्यांचे विचार निर्भीड बनवणारे शिक्षण त्यांना दिले जावे असे त्यांना वाटत असे. २४/४/१९२७ पोलूर येथे शिक्षकांच्या अधिवेशनात बोलतांना ते म्हणाले ''विद्यार्थ्यांना समतेने वागण्याचे शिक्षण द्या दीनदुबळयांवर दया करण्याचे शिक्षण द्या, त्यांना विश्वबंधुत्व शिकवा, राष्ट्रनिष्ठा शिकवा'' प्रस्थापित शिक्षणपध्दती सदोष आहे असे त्यांना वाटत असे. एखादा अकुशल कामगार पदवी न घेता पदवीधारकापेक्षा चांगल काम करतो उलट पदवीधर शिकून सवरून स्वाभीमान शून्य व अत्यंत स्वार्थी असू शकतो. पेरियार रामस्वामी यांनी महात्मा फुलेंचे काम पुढे नेले. महाराष्ट्रात फुले, शाहू, आंबेडकर त्याप्रमाणे तामीळनाडू व दक्षीण भारतात पेरियार स्वामींनी शिक्षण विषयक महान कार्य केले. त्यांनी स्त्रीया व अस्पृश्यांना शिक्षण कसे मिळेल याबद्दल प्रयत्न केले. त्यांच्या स्वाभीमान संस्थेच्या वतीने त्यांनी पुढील महत्वाच्या संस्था काढल्या त्यात –

१. पेरियार प्राथमिक विद्यामंदिर, तिरूचनापल्ली.
२. पेरियार मनिअम्मा उच्च माध्यमिक विद्यालय, तिरूचनापल्ली.
३. पेरियार तत्वज्ञान विचारधारा आंतरराष्ट्रीय संस्था, मद्रास.
४. पेरियार अुनसुचीत जाती/जमाती कल्याण केंद्र, मद्रास
५. पेरियार शताब्दी नर्सरी स्कुल, तिरूचनापल्ली
६. नागाम्भाई महिला शिक्षक प्रशिक्षण केंद्र, तिरूचनापल्ली
७. पेरियार महिला फार्मा विज्ञान महाविद्यालय.
८. पेरियार महिला आय.टी.आय. इत्यादी.

थोडक्यात सांगायचे तर पेरियार रामस्वामी आयुष्यभर उपेक्षित वर्गासाठी झटले. त्यांच्यात स्वाभीमान निर्माण करण्यासाठी त्यांनी आपली लेखणी व वाणीचा उपयोग केला. त्यांच्या कार्यात कुठेही अवडंबर व ढोंगीपणा नव्हता ते हाडाचे सुधारक होते. राजकारणात त्यांना जे पटले नाही त्यांच्या विरोधात ते स्पष्ट बोलत असे. महात्मा गांधींच्या विचारांचेही त्यांनी वाभाडे काढले. आयुष्यभर त्यांनी महात्मा गांधींना विरोध केला पण त्याचा भारतावरील प्रभाव पाहून भारताचे नामकरण गांधीनाडू करावे असे स्पष्ट मत नोंदवले.

## आधार –


१. महात्मा फुले समग्र वाड्मय.
२. श्रीपाद रघुनाथ जोशी, य. दी. फडके, भारतीय स्त्री.
३. भिमराव सखदे– पेरियार स्वामी
४. पेरियार रामस्वामी– व्हाय ब्राम्हण हेट रिझर्व्हेशन
५. डॉ.वि.भा. आठल्ये– आधुनिक भारताचा इतिहास
६. संपादक वसंत मून, हरि नरके व इतर – डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, भाग १,२,३


❖❖❖

# साठोत्तरी मराठी कविता : एक अध्ययन

प्रा.पी.एस. निर्मळ
श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय,
बोरगाव मंजू, ता.जि. अकोला, मो. : ९९२११३२७६४

'कविता' हा सर्वांना आवडणारा साहित्याचा प्रकार असून त्यात नाद, लय, ताल असतो. मानव जीवन हेच एक काव्य आहे. मानवी भावनेला आणि विचारांना आवाहन करण्याचे काम कविता करते. कविता हा एक सर्जनशील आणि संवेदनशील वाङ्मयप्रकार आहे. साहित्य, समाज तसेच संस्कृतीच्या निर्मितीमध्ये 'कविता' या वाङ्मय प्रकाराचा महत्त्वाचा वाटा आहे. मनुष्याला जेव्हा माणुसपण प्राप्त झाले आणि आपल्या माणुसपणाचा अविष्कार करावा असे वाटू लागते, तेव्हा त्याने कविता या वाङ्मयप्रकारातून आपल्या भावना सर्वप्रथम मांडल्या. अगदी बालपणात मनुश्य पाळण्यात झोपलेला असतो तेव्हा त्याची आई अंगाईगीत गात असते. आईच्या मुखातून ऐकलेले अंगाईगीत हा माणसाच्या जीवनातील त्याने अनुभवलेला, ऐकलेला कवितेचा पहिला अविष्कार असतो. कोणतीही उत्तम कविता वाचत असताना आपल्याला असे दिसून येते की, कवितेतून कमी शब्दात अधिक व्यापक अर्थ स्पश्ट केलेला असतो. नेमकेपणाने एखादा अनुभव फाफटपसारा न मांडता व्यक्त केला जातो.

'कविता' हा वाङ्मयप्रकार अत्यंत प्राचीन असून कवितेच्या ऐतिहासिक वाटचालीमध्ये ओवी, अभंग, पद, आरती, स्तोस्त्र, विरहिणी, गौळण, भारूड, भूपाळी, श्लोक, आख्यानकाव्य, लावणी, पोवाडा, कटाव, फटका, झगडा, सुनीत, गीत काव्य, गझल, मुक्तछंद, दशपदी, हायकू, विडंबन, चारोळी असे कवितेचे प्रकार आढळून येतात.

'कविता' या वाङ्मयप्रकारामध्ये वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वरांपासून संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत जनाबाई, संत चोखामेळा अशा अनेक संतांनी कवितेची निर्मिती केली. त्यांनी ओवी, अभंग, पद, आरती, स्तोत्र, विरहिणी, गौळण, भारूड, श्लोक इत्यादी वाङ्मयप्रकारातून भक्त आणि इश्वर यांच्यातील नातेसंबंध, शब्दबद्ध केले. समाजातील जातीभेद, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, विषमता यावर कडक टीका केली. कवितेच्या माध्यमातून संतांनी लोकशिक्षणाचे कार्य केले तर, पंडित कवींनी श्लोक, आख्यान या काव्यप्रकारातून काव्यरचना करून विचार मंथन केले तर शाहिरांनी भूपाळी, लावणी, कटाव, फटका, पोवाडा, झगडा अशा प्रकारची काव्यरचना केल्याचे आढळून येते.

१९६० नंतरच्या मराठी कवितेत विविधता दिसून येते. महाराश्ट्रातील विविध प्रदेशातील सामाजिक स्थरातील कवींनी आपले अनुभव, भावना, संवेदना कवितेतून मांडल्या. १९६० नंतरच्या साहित्यातून दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्रीवादी चळवळी इत्यादी चळवळ प्रेरित साहित्यनिर्मिती यांची परस्परपूरक वाटचाल या काळातील साहित्यामधून आढळून येते. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यामुळे मराठी माणूस आणि मराठी भाषेला महत्त्व प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या स्थापनेमुळे मराठी लेखकांच्या मनात नव्या जाणिवांनी जन्म घेतला. महाराष्ट्राच्या सर्वच सामाजिक स्तरात, सांस्कृतिक हालचाल सुरू झाली. महाराष्ट्राच्या समाजकारणात राजकरणात, आपल्याला स्थान मिळाले पाहिजे या उद्देशाने विविध संस्था, चळवळी, संघटना, सामाजिक घटक सक्रीय झाले. १९६० नंतर महाराष्ट्रात प्रचंड उलथापालथी सुरू झाल्या आणि याचे प्रतिध्वनी मराठी वाङ्मय प्रकारामध्ये उमटू लागले.

'साठोत्तरी मराठी कविता' असा शब्दप्रयोग कविवर्य नारायण सुर्वे यांनी विशेषत्वाने केला. साठोत्तरी मराठी कवितेत कवी नारायण सुर्वे, दिलीप चित्रे, अरूण कोलटकर, आरती प्रभू, नामदेव ढसाळ इत्यादी कविंच्या कवितेतून महानगरीय संवेदना, विद्रोही कविता, दलित ग्रामीण कविता यासर्व वाटावळनांवर वाटचाल करणारे अग्रेसर कवी आपआपल्या परीने 'साठोत्तरी मराठी कवितेला' एक मूल्यात्मक अर्थ प्राप्त करून देतात.

कविवर्य नारायण सुर्वे यांनी साधारणत: १९५६च्या सुमारास कविता लेखन सुरू केले. त्यांचे 'ऐसा गा मी ब्रम्ह' (१९६२), 'माझे विद्यापीठ' (१९६६), 'जाहीरनामा' (१९७५), 'सनद' (१९८२) आणि 'नव्या माणसांचे आगमन' (१९९५) इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

नारायण सुर्वे यांनी प्रथम गिरणी कामगार नंतर शिपाई तसेच प्राथमिक शिक्षक म्हणून काम पाहिले. आपल्या कवितांमधून सुर्व्यांनी कामगार जीवनाची बोलीभाषा मांडून पोट भरण्यासाठी अखंड काबाडकष्ट करणाऱ्या समाजाचे अनुभवविश्व आपल्या काव्यातून अधोरेखित केले. कवी म्हणतात,

'दोन दिवस वाट पाहण्यात गेले,
दोन दु:खात गेले हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बर्बाद झाली'

कामगारांचे जीवन अत्यंत खडतर आहे. कामगारांच्या जगण्याचा संघर्श त्यांनी आपल्या कवितेतून मांडला. नारायण सुर्वेची कविता ही दु:खी, कष्टीतांची, कामगारांची, पीडितांची, शोषितांची कविता असली तरी ती खऱ्या अर्थाने माणसांची कविता आहे. विशमतेचे निर्मूलन करण्यासाठी क्रांतीला, परिवर्तनाचा, समतेचा ध्वज आपल्या खांद्यावर घेऊन नारायण सुर्वे म्हणतात,

कामगार आहे मी, तळपती तलवार आहे
सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे
कधी साहिलेले पाहिलेले आहे
माझ्या जगाची गंधवेणाही त्यात आहे.

नारायण सुर्वे हजारो वर्षांपासून गुलामीत असणाऱ्या शोषित, पीडित वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. नारायण सुर्वे यांच्या कवितांविषयी कवी कुसुमाग्रज म्हणतात, ''श्री सुर्वे यांची बरिचशी कविता लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची उपासना करणारी नव्या आनंदभुवणाची स्वप्ने पाहणारी आहे.''

साठोत्तरी मराठी कवितेत दिलीप चित्रे यांच्या कविता म्हणजे मराठी कवितेच्या आधुनिकीकरणाचे उदाहरण होत असे प्रसिद्ध मराठी साहित्यिक भालचंद्र नेमाडे ते म्हणतात.

'खंडोबा' या दिलीप चित्र्यांच्या कवितेत ते म्हणातत,

मी मोरासारखा उघडतो
एका शतकाच्या दु:खाचा पिसारा
आणि थै—थै नाचतो
माझ्या टाहोऐवढ्या निळेपणात
आनंदाने झळझळून
खंडोबा, विठोबा
हा संसाराएवढा एकसंध खडक
बनतो माझं मूळ देऊळ
आणि लिखाण!

खंडोबाकडून विसाव्या शतकाच्या दु:खाच्या पिसाऱ्यापर्यंत या कवितेची अफाट वाटचाल होत राहते. आणि ती कविता विशेष भारावून टाकते. या कवितेतील हे प्रतिमांकित शब्द आणि भारलेली अभिव्यक्ती कोणाला अद्‌भुत किंवा अंग शहारून टाकणार नाही. खंडोबाचा आत्मावतार खंडाबाच्या मूळ अवताराशी अत्यंत चतुराईने कवींनी सांधून घेतला आहे.

महानगरीय संवेदनांची कविता म्हणूनही दिलीप चित्र्यांच्या कवितांकडे पाहिले जाते. कवी वयाच्या बाराव्या वर्षी बडोद्याहून मुंबईला आले. मुंबईचा कानाकोपरा त्यांनी पाहिला. चित्र्यांच्या कवितांमधून ठान मांडून बसलेल्या नगरा — महानगरांची यादी फार लक्षवेधक आहे.

मुंबई, लंडन, शिकागो, मास्को ते लेनिनग्रॅड, हंगेरी, पैठण, पॅरिस, भोपाळ इत्यादी नगरांचा उल्लेक त्यांच्या कवितेत होतो. जगातील विविध महानगरे, भौगौलिक परिसर चित्र्यांच्या कवितेचे विशय झालेले आहेत. महाराष्ट्रातील तसेच भारतातील नद्या, डोंगर, घाट, गावे, शहरे, शिला, शिल्पे यांच्याही त्यांच्या कवितेत समावेश आहे.

साठोत्तर कालखंडातील कवी निरनिराळ्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणातून पुढे आलेले आहेत. अरूण कोलटकरांचा कविता लेखनाचा काळ म्हणजे १९५० ते १९७७ पर्यंत आहे. १९७६ मध्ये त्यांचे 'जेजुरी' हे इंग्रजी काव्य प्रसिध्द झाले. साठोत्तरी कालखंड हा एकमुखी नवप्रवर्तनाचा नसून पाचामुखी नवप्रवर्तनाचा कालखंड आहे. याची जडण घडण नारायण सुर्वे, दिलीप चित्रे, अरूण कोलटकर, नामदेव ढसााळ, ग्रेस या

पंचकवींनी केलेली आहे. कोलटकरांच्या अनेक कविता वैशिष्ट्येपूर्ण आहेत. त्यामध्ये 'बेहदद नाममात्र घोडा', 'मुंबईने भिकेस लावल', 'मेणबत्ती', 'श्री ज्ञानेश्वरसमाधीवर्णन', 'काळा रूमाल', 'आडगांवच्या हॉटेलातील' यासारख्या कविता आशय अभिव्यक्ती आणि विशयांच्या बाबतीत वेगळ्या आहेत. कवी अरूण कोलटकर म्हणतात,

डोक्यावरनं रूमाल बांधून घे
काळा रूमाल त्यातल्या त्यात बरा
नाहीतर इलॅस्टीकची पट्टी शिवून घे मागणं
त्यात कायाय, बायको शिवून दील की तुला
अरे दोन मिंटाच काम

कोलटकरांच्या कवितेत इंग्रजी शब्द येतात. हिंदीतील शब्द येतात. प्रमाण मराठी भाषेच्या दृष्टीने अशुद्ध ठरतील असे कितीतरी शब्द, वाक्प्रचार, त्यांच्या कवितेत दिसून येतात.

कोलटकरांनी एका कवितेत एका वृद्धेचे चित्रण केलेले आढळून येते. त्या कवितेचे नाव 'थेरडी' असे आहे. कवी कोलटकरांनी वृद्धा, म्हातारी, थोरली माय, आजीबाई अशी नावे 'टाळली'आणि 'थेरडी' असा शब्दप्रयोग कवितेच्या शिर्शकासाठी केला. वि.द. घाटे यांनी त्यांच्या एका पुस्तकाचे नाव 'काही म्हातारे व एक म्हातारी' असे ठेवलेले असून 'काही थेरडे व एक थेरडी' असे ठेवले नाही. कोलटकरांची थेरडी आणि वि.द. घाट्यांची म्हातारी या दोन शब्दात फारसा फरक नाही परंतु थेरडी या शब्दातील निंदाव्यंजकता, तुच्छता आणि 'म्हातारी' या शब्दातील आपलेपणा, आदरभाव, ममत्व आपल्याला जाणवल्याशिवाय राहणार नाही.

माणिक गोडघाटे म्हणजेच कवी ग्रेस 'चंद्रमाधवीचे प्रदेश', 'संध्याकाळच्या कविता' हे त्यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह. कवी ग्रेस यांच्या कवितेतील प्रतिमा आणि प्रतिमांची गुंफण मनाला हरखून टाकल्याशिवाय राहत नाही. चंद्र माधवीच्या प्रदेशात निवदेनपर, वर्णनपर, कथनपर स्थळे ही भावविश्कारी स्थळांएवढी मनाला भिडत नाहीत कवी ग्रेस म्हणतात,

'घोडा कशाने खळवळून हसला? नि
संयुक्त अंधार झाला मऊ
तुझ्या भुभ्र पाठीतल्या अंगमोडीतले
रत्न लागेल ना.गे. अशाने जळू'

कवी ग्रेस यांच्या या ओळी मनाला भावून जातात.या कवितेतील प्रश्नार्थक मांडणी विलक्षण जिव्हाळ्याची वाटते.

साठोत्तरी मराठी कवितेत आपले जीवनानुभव कवितेतून मांडले. शोषित, पीडित वर्गाचे चित्रण दलित कवींनी आपल्या कवितेतून केले. नामदेव ढसाळ हे दलित कविंच्या पहिल्या पिढीतील साठोत्तरी मराठी कवी म्हणून ओळखले जातात. नामदेव ढसाळांचा 'गोलपिठा' हा अत्यंत प्रसिध्द काव्यसंग्रह असून दलितांचे स्वप्न, आचार, विचार, सुख, दु:ख, जगणे—मरणे, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक शोशणाचा बुलंद आवाज दलित कवितेतून व्यक्त झाला.

साठोत्तरी कवी म्हणून नामदेव ढसाळांची कविता इतर दलित कविंच्या कवितेपेक्षा निराळी आहे. त्यांची कविता पांढरपेशा वाचकाला चक्राऊन टाकणारी आहे. त्यांच्या कवितेतले जग पांढरपेशांच्या जगाच्या पलिकडे सुरू होते.

माणसाने पहिल्याप्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे

समता स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ढसाळांच्या कवितेची प्रमुख तत्वे आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्शे उलटून गेली पण मानसाला माणसासारखी वागणूक मिळत नाही. कवी नामदेव ढसाळ म्हणतात.

पंधरा ऑगस्ट एक संशयास्पद महाकाय भगोष्ट
स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे
रामराज्याच्या कितव्या घरात आपण ऱ्हातोत
उद्गम, विकास, उंची, संस्कार संस्कृती
कंचा मूलभूत अर्थ स्वातंत्र्याचा

अन्याय, शोषण अस्पृश्यता यावर टीका करताना कवी नामदेव ढसाळ म्हणतात,

'ही लोकशाही नाही हे
ही विटंबना सतरा पिढ्यांची मूग गिळून पोसलेली
हा प्रकाश नाही हे
हा पिंजरा पिळवणुकीचा'

थोडक्यात, साठोत्तरी कविता हा आधुनिक मराठी कवितेच्या मध्यधारेतील स्थिर पद झालेला मुख्य प्रवाह म्हणूनच मानला जातो. साठोत्तरी मराठी कवितेने मराठी कविता या वाङ्मय प्रकाराला एक वेगळे वळण देण्याचे कार्य निश्चितपणे केले आहे. साठोत्तरी मराठी कवितेत दिलीप चित्रे, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर, ग्रेस यांचे अमुल्य योगदान आहे, हे निर्विवादपणे मान्य करावे लागेल.

## निष्कर्ष

१. कविता हा एक सृजनशील वाङ्मयप्रकार आहे.
२. कविता या वाङ्मयप्रकारातून तत्कालीन सामाजिकता अधोरेखित होते.
३. कविता ही कविच्या व्यक्तिमत्त्वाचा सरळ व सज्जन अविष्कार असतो.

## संदर्भ ग्रंथ

१. साठोत्तरी मराठी कविता व कवी – रा.ग. जाधव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
२. मराठी वाङ्मयप्रकारांची सैद्धांतिक रचना व अध्यापन पध्दती – संपा – प्रा.डॉ. तुषार चांदवडकर, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
३. साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह – संपा – डॉ.शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे
४. अर्वाचीन मराठी कविता – संपा. डॉ.गजानन जाधव, राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर
५. अक्षरवैदर्भी –दीपावली विशेषांक, संपा. डॉ. सुभाष सावरकर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, २०१०

❖❖❖

# प्रेमा तुझा रंग कसा? : स्वरुप व समीक्षा

प्रा.डॉ. अविनाश श. धोबे
डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय,
शेंदुरजनाघाट, जि. अमरावती

## नाटकाचे सुंदर कथानक :

वसंत कानेटकर यांनी आपल्या 'प्रेमा तुझा रंग कसा?' या नाटकात मानवी जीवनातील 'प्रेम' या सुंदर व उदात्त भावनेला अग्रस्थान दिले आहे. या नाटकाच्या कथासूत्राविषयी प्रा. ना.सी. फडके म्हणतात की, "स्त्री पुरुषांच्या आकर्षणाचं आणि प्रीतीचं नाटक जगाच्या रंगभूमीवर सतत चाललेलं आहे आणि चालणार आहे. ते सुरु केव्हा झालं आणि संपणार केव्हा ते सांगता येणार नाही, असा या नाटकाचा संदेश आहे. हा संदेश अशा काही मर्मज्ञ, रसिक, सहानुभूतीपूर्ण, खेळकर, क्वचित अवखळ शैलीनं लेखकानं रंगविला आहे की त्याची ही हास्यप्रधान नाट्यकृती सुरू केव्हा आणि केव्हा संपली ते हशा आणि टाळ्यांच्या जल्लोषात प्रेक्षकांना कळणार सुद्धा नाही!" वसंत कानेटकरांनी 'प्रेम' हा नाटकाचा मुख्य विषय घेऊन समाजातील रुढ संकुचित प्रेमाच्या वृत्तीवर व दृष्टीवर येथे हसतखेळत कोरडे ओढले आहेत. नाटककाराने 'प्रेम' या नाजूक भावनेला मध्यवर्ती स्थान देऊन जगातील प्रेमाची विविध रूपे त्यांनी अत्यंत खेळकर पद्धतीने नाटकातून साकार केलेली आहे. प्रत्येक पिढीत बदलत्या वयात प्रेमविषयक कल्पना कशी बदलत जाते याचे समर्थ चित्रण या नाटकातून घडते. मानवी जीवनातील 'प्रेम' या भावनेला नाटकात प्राधान्य देऊन नाटककाराने प्रेमाचे समाजातील संकोचरुप मोठया विनोद पध्दतीने दाखविले आहे.

## नाटकातील विनोदाचे स्वरूप :

❋ <u>शब्दनिष्ठ विनोद</u> : शब्दांच्या अर्थाचा कौशल्यपूर्ण उपयोग करुन जेव्हा हास्य निर्माण केले जाते तेव्हा त्या विनोदास शब्दनिष्ठ विनोद असे म्हणतात. अशा या शब्दनिष्ठ विनोदाचा नाटकाच्या सुरुवातीला चांगला प्रत्यय येतो.

उदा. ❀ <u>प्रियवंदा</u> : लग्नानंतर हनीमूनसाठी आपण खंडाळयातच गेलो होतो नाही का गडे! ! आठवतात का तुम्हाला ते दिवस?

❀ <u>बल्लाळ</u> : आठवतात म्हणजे? चक्क डोळयासमोर दिसताहेत! काय सुंदर दिसत होतीस तू त्यावेळी.

❀ प्रियवंदा : (खोचून) होतीस?

❀ बल्लाळ : नाही म्हणजे, अजूनही दिसतेस ग, पण आता.........

वरील प्रसंगात प्रा. बल्लाळ प्रियबंदाबाईच्या बदललेल्या वयाची व आकारमानाची तिला कल्पना करून देतात. या शाब्दिक खोचकपणामुळे प्रचंड हास्यनिर्मिती होते.

❋ <u>प्रसंगनिष्ठ विनोद</u> : या नाटकामध्ये प्रसंगनिष्ठ विनोद वसंत कानेटकरांनी समर्थपणे उभे केले आहेत. प्रा. बल्लाळ एम.ए. च्या विद्यार्थ्यांची वाट पहात असतात आणि त्याच वेळी बब्बडचा प्रियकर बाजीराव तिथे येतो त्यालाच प्रोफेसर साहेब आपला विद्यार्थी समजून त्याची चांगलीच उलटतपासणी घेतात. त्यामुळे बाजीरावची चांगलीच तारांबळ उडते आणि प्रचंड हास्यनिर्मिती होते तर दुसया प्रसंगात पहिल्या अंकाच्या शेवटी प्रा. बल्लाळ आपल्या जावयाला बाजीरावला बब्बडच्या स्वभावाची माहिती देता देता स्वतःच्या पत्नीचे दोष कथन करू लागतात. त्याचवेळी प्रियवंदाबाई त्यांच्या पाठीमागेच उभ्या असतात आणि बोलता बोलता प्रा. बल्लाळ अचानक मागे वळतात तर काय प्रियवंदाबाई कमरेवर हात ठेवून ठसक्यात उभ्या असतात. त्यांना पाहताच प्रा. बल्लाळ यांच्या अंगाचे पाणी – पाणी होते आणि प्रेक्षक भरभरुन असतात. प्रसंगनिष्ठ विनोद निर्मिती करताना कानेटकरांनी भाषेची मर्यादा कोठेही ओलांडली नाही..

❋ <u>स्वभावनिष्ठ विनोद</u> : माणसांच्या विशिष्ट तऱ्हेच्या स्वभाव वैशिष्ट्यांतून जो विनोद निर्माण होतो त्याला स्वभावनिष्ठ विनोद असे म्हणतात. प्रा. बल्लाळ, प्रियवंदाबाई, बब्बड, बच्याजी यांच्या स्वभावाच्या काही वैशिष्टयांतून नाटकामध्ये विनोद निर्माण झाला आहे. बब्बडचा धांदरटपणा आणि भाबडेपणा यातून अनेक ठिकाणी विनोद निर्माण होतो. प्रा. बल्लाळ यांचा पत्नीसमोरील आज्ञाधारकपणा आणि शेवटी तिसऱ्या अंकात

दाखविलेले पुरुषत्व यातून त्यांच्या स्वभावाची दोन विरुध्द टोके प्रकट होतात. त्याचप्रमाणे पहिल्या अंकात प्रियवंदाबाईच्या रोमॅटिक मुडमुळे देखील वातावरणात प्रसन्नता जाणवते. लहरी, स्त्रीद्वेष्टया आणि प्रेमभंगामुळे निराश झालेल्या व परत स्त्रीप्रेमानेच माणसात आलेल्या बच्चूच्या वागण्याने निर्माण झालेला हा विनोद वैशिष्टयपूर्ण असून तो सर्व नाटकभर पाहायला मिळतो.

या तीनही प्रकारच्या विनोदाचा आविष्कार त्यांच्या नाटकातून झालेला आहे. वसंत कानेटकरांचा विनोद हा निव्वळ विनोद नाही, तर त्यामागे जीवनाचे विचार आणि तत्त्वज्ञान दिसून येते.

❋ पात्राविष्कार (पात्रयोजना) : वसंत कानेटकरांनी प्रेमा तुझा रंग कसा? या नाटकात रसिकांच्या मनावर प्रभाव घालणाऱ्या व चिरस्मरणात राहणाऱ्या पात्रांची योजना केलेली आहेत. 'प्रेम' या मूलभूत मानवी भावनेला वेगवेगळया स्तरावर कवटाळणारी पात्रे प्रस्तुत नाटकात दिसतात. निळूभाऊ गोरे हे प्रेमविषयक जुनाट द्रष्टिकोन प्रकट करणारे, तर सुशील तुळजापूरकर प्रेमाकडे आत्मकेंद्रित व स्वार्थी दृष्टीने पाहणारी, अशी प्रेम या विषयाला वाहिलेली पात्र योजना या नाटकात आहे. प्रेमाचा विविधांगी आविष्कार या नाटकातून अभिव्यक्त झालेला आहे. प्रा. बल्लाळांचे समंजस प्रेम, निळुभाऊंचे भाबडे प्रेम, सुशीलचे आत्मप्रेम आणि बच्चाजीचे पोरकट प्रेम ही प्रेमाची विविधरुपे या नाटकात दिसून येतात. सर्वच पात्रांनी आपआपल्या कलाकौशल्याचे कसब आपल्या भूमिकेत ओतले आहेत. पात्राच्या विविध रुपामुळे हे नाटक मराठी रंगभूमीवर लोकप्रिय झाले आहे.

❋ चित्रात्मकता — दृश्यात्मकता हे या नाटकाचे महत्त्वाचे वाङ्मयीन वैशिष्ट्य आहे. नाटकातील विविध प्रसंग द्रश्यरुपाने रसिकांसमोर साकार होतात. प्रा. बल्लाळ यांच्या बंगल्याचे वर्णन, त्यांची बंगल्यात चाललेली अखंड ज्ञानसाधना, प्रा. बल्लाळ व प्रियवंदाबाई यांचे खंडाळयाला जाण्याचे संवाद, बच्चाजी व सुशील यांचे बसस्टॉपवरील भांडण, बल्लाळांनी बाजीरावला विद्यार्थी समजून घेतलेली फिरकी, बाजीराव — बब्बड यांची प्रेमपत्रे, निळूभाऊ यांची आयुष्याची होरपळ, सुशील व प्रा. बल्लाळ यांचे संवाद इत्यादी सर्व घटनाप्रसंग रसिकांसमोर जिवंतपणी साकार होतात. "या नाटकातील बल्लाळ, प्रियवंदा, बब्बड, बच्चू, सुशील, निळूभाऊ व बाजीराव ही सारी मंडळी आपल्याच प्रतिमा आहेत, वाटते. कधी ते आपल्यामध्ये, कधी घरात तर कधी शेजारी समोरच्या घरात भेटणा या प्रतिमा आहेत." डॉ. वि.भा. देशपांडे यांचा अभिप्राय या नाटकाच्या दृश्यात्मकतेच्या संदर्भात अर्थपूर्ण वाटतो.

❋ काव्यमय शीर्षक — प्रेमा तुझा रंग कसा? नाटक शीर्षकाला काव्यात्मकता प्राप्त झालेली आहे. प्रेमाच्या विविध छटा व विविध रुपे प्रस्तुत नाटकातून अभिव्यक्त झालेली आहे. प्रस्तुत नाटकाचे शीर्षक केवळ काव्यमय नाही तर नाटकाच्या आशयाशी अर्थदृष्टया संबंधीत आहे. नाटकाच्या शीर्षकात सौंदर्यदृष्टीचा व अभिव्यक्तीचा पुरेपुर प्रत्यय येतो. प्रेमा तुझा रंग कसा? हे या नाटक शीर्षक मराठीत अत्यंत लोकप्रिय झाले आहे.

❋ संवादशैली — संवाद हा नाटकाचा महत्त्वाचा घटक आहे. संवादशैलीतूनच नाटकाची भाषा आकार घेत असते. प्रेमा तुझा रंग कसा? या नाटकाचे संवाद अत्यंत प्रवाही असून नित्याच्या जीवनाशी निगडीत आहेत. नाटकातील संवाद सुटसुटीत असून प्रसंगाची रंगत फुलविणारे आहेत. पात्रांच्या स्वभावानुरुप तिचा रंग बदलतो. उदा. १) वनश्रीला खुणा करायला काय जातय? तुला दम्याचा ॲटक आला म्हणजे सेवेशी काही खंडाळयाची वनश्री येणार नाही तुझ्या?

२) अगं सप्तपदी चालून संसाराच्या भट्टीत उतरल्यावर पती पत्नीच्या प्रेमाचे सगळे गहिरे रंग असेच ओघळतात.

३) बरं पोरी! मग खाली उरतात फक्त ओबडधोबड माणंस! दुःख अनावर झालं म्हणजे मुलांनी आई वडिलांना बिलगायचं नाही तर दुसऱ्या कोणाला? हे बघ. जे अटळ आहे ते माणसानं समजून घ्यावं त्याबद्दल खंत वाटून घेण्यात काय अर्थ आहे.

❋ प्रसन्न व मोहक भाषाशैली —

वसंत कानेटकरां यांच्या प्रेमा तुझा रंग कसा? या नाटकाची भाषा ही सहज, साधी, माणसाच्या मनाला भिडणारी प्रभावशाली आहे. या नाटकाची भाषाशैली प्रसन्न आणि मोहक स्वरुपाची आहे. मराठी भाषेचा उत्तम नमुना म्हणून नाटकातील भाषेकडे पाहता येईल. उदा. प्रियवंदाबाई म्हणते, 'खरंचं खंडाळयाला गेलं की माणसाला आपलं वयसुध्दा विसरायला होतं नाही का? आठवतं तुम्हाला दिवसचे दिवस हातात हात घालून स्वच्छंदानं दऱ्याखोऱ्यातून भटकत होता नाही का आपण? कसली बंधनं नाहीत, कसली काळजी नाही! खूप खूप हसावं, कोवळया उन्हात बागडावं, चांदण्यात हिंडावं, अवखळ झऱ्यात डुंबावं, धुक्यातून धावावं, पावसात भिजावं, खरचं गडे बल्लाळ, जाऊ या ना आपण पुन्हा एकदा खंडाळ्याला.

असे तरुणपणाचे वर्णन करणारे कानेटकर त्याचबरोबर लग्नानंतर या प्रेमाची स्थिती काय होते हयाचे देखील तेवढयाच प्रत्ययकारकतेने वर्णन करतात. उदा. प्रा. बल्लाळ म्हणतात, "अरे संसार म्हणजे काय? पत्त्यांच्या पोरखेळ समजलास की मनासारखी पाने हातात आली नाहीत तर दिला डाव उधळून? अरे, हातात येतील ती फत्तरी पाने घेऊन हा डाव जिद्दीने खेळला पाहिजे वेटा, त्याला देखील अंगात हिंमत लागते!"

⁂ काव्यात्मकता :– वसंत कानेटकरांनी प्रस्तुत नाटकात काही गाणी, वाक्यप्रचार यांचा समर्पक उपयोग करुन भाषाशैली अधिक समृध्द केली आहे. नाटकाच्या सुरुवातीला कानेटकरांनी श्रृगांरिक काव्यपंक्तीचा उपयोग करुन चांगली रंगत आणली आहे. उदा. 'गालाला पडते खळी मला पाहुनी' तसेच मानवी भावना व्यक्त करणाऱ्या गीतांचा या नाटकात यथोचित उपयोग केलेला आहे.

उदा. १) तू माझी अन् तुझा मीच ही खातर ना जोवर.

२) किती किती सांगू तुला ग मज चैन नसे! या विरहाने मज गांजीयले।।

३) नच सुंदरी करु कोपा। मजवरी घरी अनुकंपा इत्यादी काव्यगीतामुळे नाटकाच्या वाङ्मयीन सौंदर्यात भर पडलेली आहे. नाटकातील युगायुगाच्या भरतवाक्यातून सुदर असा आशय व्यक्त झालेला आहे. उपरोक्त सर्व गुणवैशिष्टयांमुळे वसंत कानेटकरांचे प्रेमा तुझा रंग कसा? हे नाटक मराठी रंगभूमीवर लोकप्रिय झाले आहे.

## संदर्भग्रंथ सूची :

१. वसंत कानेटकर – प्रेमा तुझा रंग कसा? पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००१
२. डॉ. राजन जयस्वाल – कानेटकरांची नाटयसृष्टी, सृजन प्रकाशन, नागपूर, १९७१
३. वि.भा. देशपांडे – मराठी नाटक आणि रंगभूमी, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९९२

❖❖❖

# बंधुमाधवांची दलित कथा : एक चिकित्सा

डॉ. आर.एम. केदार
डॉ. गो. खे. महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा)
भ्रमणध्वनी ९८९००७८४१३

दलित कथा साहित्यात आपला वेगळा ठसा उमटविणारे कथाकार म्हणजे बंधुमाधव हे होत. त्यांनी आपल्या कथेतून दलित समाजामध्ये स्वाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला. बंधुमाधव यांचे 'आम्हीही माणसं आहोत' व 'पेटलेले आकाश' हे दोन कथासंग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. दलित समाजाच्या वास्तव जीवनाचे चित्रण त्यांच्या काही कथेमधून आले आहे. पोलीस खात्यात नोकरीला असतांना त्यांना काही वेगळे अनुभव आले. कायदा पायदळी तुडविणारे लोक, समाजातील जालीम विषमता आणि रूढी व परंपरा यामुळे दलितांचे होणारे शोषण पाहून त्यांच्यातील साहित्यिक जागा झाला व मग त्यांनी आपल्या बांधवांची दु:खे कथेतून मांडायला सुरूवात केली. आपल्या कथालेखनासंबंधी मत व्यक्त करतांना ते म्हणतात, ''माझ्या दीन दलित बांधवावर हरघडी होत असलेले अमानुष अत्याचार, दिवस उजेडी आया बहिणींवरील बलात्कार नि गावोगावी केला जात असलेला त्यांचा असंख्य कोंडमारा नित्यरोज मी माझ्या पददलित बांधवांच्या या वेदनांना, दु:खांना व अन्यायाची कुठंच दाद लागत नाही हे पाहुनच त्यांच्या त्या साऱ्या वेदना, त्यांची ती सारी दु:ख, सारे अन्याय, जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी माझ्या कथांच्याद्वारे 'जनता' पत्रकातून त्यावेळी मी प्रसिध्द करीत राहिलो. पुढे पुढे तर 'येणे दु:ख माझा फुटो पाहे प्राण' अशी माझी केविलवाणी अवस्था झाली नि अखेर मी सरकारी नोकरीचाही राजीनामा दिला आणि कलावंताचं निखळ साहित्यिकाचं 'सतिचं वाण पत्करलं!'[१] दलितांच्या जीवनाचे दर्शन त्यांनी आपल्या कथेतून घडविले.

कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाली असली तरी लोक कायदा कसा धाब्यावर बसवितात ते 'सव्वा रूपया कप' या कथेत परिणामकारकरित्या दाखविले आहे. या कथेतील हॉटेल हरिजनांसाठी खुले असते पण तेथे 'चहा मिळेल पण तो सव्वा रूपयाला कप वर स्वत:ची कपबशी आणावी' अशी सूचना लावलेली असते. 'महार जल्माची चित्तरकथा' या कथेत दादू महाराच्या जीवनाचे चित्रण येते. हा दलित माणूस गावकीच्या कामाने हैराण झालेला असतो. दादू महार हा वतनदार महार म्हणून गावकीची कामे करतो. पण त्याला त्याच्या कामाचा मोबदला मात्र मिळत नाही. या कथेतील सदगुंड पाटलाचे पेव खोदणारा दादू उपासामुळे चक्क बेशुद्ध पडतो. तरी पाटलाला मात्र त्याची दया येत नाही. शेवटी सहशिलता संपल्यानंतर मात्र हाच दादू प्रतिकारास सज्ज होतो.

'कपाळी लिवल्यालं कंदी पुसंल', 'विखारी भाकरी' या कथांमधून सुध्दा महार वतनदारी विरूद्ध लढयाचे चित्रण आले आहे. त्यांच्या कथा वाचकांच्या हृदयाला जावून भिडतात. कारण त्यातील अनुभवच तेवढे प्रत्ययकारी आहेत. त्यांच्या कथांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. त्यांनी आपल्या कथांसाठी दलित भाषेचा वापर केल्यामुळे त्याची परिणामकारकता अधिक वाढली आहे. आपल्या कथालेखनामागील पार्श्वभूमी स्पष्ट करतांना ते म्हणतात, ''डॉ. आंबेडकरांच्या ज्वालाग्राही तत्त्वज्ञानातील ठिणगी घेऊन तिच्या साहाय्याने माझ्या कथांद्वारे मी माझ्या बांधवांना पेटवून उठवीत होतो आणि असे करता करता शंभराहून अधिक कथा माझ्याकडून लिहून झाल्या हे मला कळलचं नाही''[२] यावरून एक गोष्ट लक्षात येते की बंधुमाधवांनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी कथालेखन केले आहे. 'जन्मठेप' या कथेतील तात्या मांगाची दररोजची हजेरी चुकते म्हणून त्याला तुरूंगात पाठवले जाते कारण कायद्याने त्यांच्या जातीला गुन्हेगार म्हणून ठरविले असते. नाहीतरी गुन्हेगाराचा शिक्का बसलाच आहे हा विचार करून तो इतरांच्या मदतीने तुरूंग फोडून गुन्हेगारी सुरू करतो. वकिलाच्या घरावर दरोडा घालतांना वकील त्याला अन्यायी कायद्याविरूध्द संघर्ष करायला सांगतो. ही कथा डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार करणारीच आहे. तर 'पेटलेले आकाश', 'आम्हीही माणसं आहोत', 'आम्ही गगनालाही गवसणी घालू' इत्यादी कथा प्रचारकी स्वरूपाच्या आहेत. त्यांच्या कथा प्रचारकी आहेत हे त्यांनी स्वत: मान्य केले आहे. ते म्हणतात, ''माझ्या कथासाहित्यातील पुष्कळ अनुभव माझे आहेत. माझ्या साहित्यात कल्पना कमी आहेत किंवा नाहीच प्रचार हा मी महत्वाचा उद्देश मानतो.''[३]

बंधुमाधवांची 'आम्ही गगनालाही गवसणी घालू' ही एक उत्कृष्ट कथा आहे. या कथेत दलितांचा महार वतनाविरूद्धचा संघर्ष आलेला आहे. यातील सोपान काका, लिंबादादा, गणामामा इत्यादी दलित मंडळी गावकीची घाण कामे करण्यास नकार देतात कारण त्या कामामुळेच त्यांना अस्पृश्यत्व आलेले असते. दलित मंडळी मेलेली

जनावरे ओढण्याचे काम नाकारतात. परंतु त्यामुळे गावातील लोक दलितांवर बहिष्कार घालतात. परंतु तरीसुद्धा दलित मंडळी न घाबरता आलेल्या परिस्थितीला तोंड देतात. या कथेतून लेखकाने महारवतने व त्या कामाविरूद्धचा संघर्ष चित्रीत केला आहे. या कथेतील विचार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेच विचार आहेत समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने पाहिले तर ही कथा उत्कृष्ट आहे. गावगाडयाच्या चक्राखाली पिचला गेलेला दलित समाज विद्रोह करून उठला की कोणते रूप घेऊ शकतो ते या कथेत आले आहे.

बंधुमाधवांच्या कथेतून काही ठिकाणी अन्याय, अत्याचाराचे अवास्तव वर्णन येते. उदा. 'आम्हीही माणसं आहोत' या कथेत लग्नाची वरात सवर्ण उधळून लावतात. एव्हढेच नाही तर नवरी—नवरदेवाला घोडयावरून खाली पाडले व त्यांचे कपडेही फाटले असे वर्णन आले आहे. हे वर्णन वास्तव वाटत नाही.

त्यांच्या काही कथांमधून दलित जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे. उदा. 'सव्वा रूपया कप', 'महार जल्माची चित्तरकथा', 'जावे त्यांच्या वंशा', 'विखारी भाकरी', 'आम्हीही माणसं आहोत' इत्यादी कथांमधून बंधुमाधवांनी दलित जीवनाचे यथार्थ चित्रण केले आहे. तसेच त्यांच्या काही कथांमधून दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार व तो मुकाट सहन करणारे दलित नजरेस पडतात. उदा. 'कपाळी लिवल्यालं कंदी पुसंल', 'विखारी भाकरी' इत्यादी कथांमधून दलितांचे जीवन व त्यांचा छळ करणारे सवर्ण व तो सहन करणारे दलित आले आहेत. तर काही कथांमधून अन्याय अत्याचाराविरूद्ध विद्रोह करणारे दलितही दाखविले आहेत. यादृष्टीने बंधुमाधवांच्या 'आम्हीही माणसं आहोत', 'आम्ही गगनालाही गवसणी घालू' या कथा लक्षणीय आहेत. आपल्या कथांच्या द्वारे जेव्हा ते बाबासाहेबांचे विचार मांडतात तेव्हा त्यांचा उद्देश आपल्या दलित बांधवावरील अन्याय, अत्याचार दूर व्हावेत व त्यांचे दु:ख निवारण व्हावे हाच असतो. त्यांनी आपल्या काही कथांमधून संघर्ष करणाऱ्या दलित स्त्रियाही रंगविल्या आहेत. उदा. 'बैत्याचा बैल', 'महार जल्माची चित्तरकथा' या कथांमधून संघर्ष करणाऱ्या स्त्रिया आल्या आहेत. त्यांच्या 'मुक्ती यही पथे' या कथेत धर्मांतरानंतर बौध्द झालेल्या दलितांवर कसा अन्याय, अत्याचार होतो ते दाखविले आहे. या कथेतील नामदेववर जेव्हा अत्याचार होतो तेव्हा त्याबद्दल पोलीसांना सांगतांना तो म्हणतो, ''तुमच्या हिंदू धर्मानंच मला मारल... आम्हाला अस्पृश्य समजून नरकातील हीन किडयापेक्षाही हीन समजण्याची हिंदू धर्मान शिकवण दिली नसती तर गावकऱ्यांची काय बिशाद होती, आम्हाला बेवारशी जनावराप्रमाणे झोडपून काढण्याची?''[४] धर्मांतर केलेल्या दलितांवर झालेल्या अन्याय अत्याचाराचे वर्णन या कथेतून बंधुमाधवांनी अत्यंत परिणामकारकरित्या केले आहे.

त्यांच्या कथांबद्दल इंदुमती शेवडे म्हणतात, ''शतकानुशतके उकिरडयावर टाकून दिलेल्या माणसाचे तुच्छ जीवन जगणारा दलित, त्याची व्यथावेदना, विखार व विद्रोह या सर्व भावनांना बंधुमाधवांच्या या कथांनी वाचा फोडली. ज्या काळात ती लिहिली गेली, त्याच्या संस्कारातून ती सुटू शकली नाही. ही कथा संदेशपर आहे. कित्येकदा तो संदेश प्रचारकी थाटाचा वाटतो. अकलात्मक रीतीनेही व्यक्त होतो कुठे कुठे तो उघड उघड व भडक असतो. तरी त्याचा स्पर्श थेट हृदयाला भिडणारा आहे. त्यांच्या या सामर्थ्यामुळेच 'महाराष्ट्राचे मॅक्झिम गॉर्की' म्हणून बंधुमाधवांचे नाव गाजले व त्यांच्या कथेने मोठया अपेक्षा निर्माण केल्या.''[५] म्हणजेच त्यांच्या कथांनी दलित समाजाला जागृत केले. आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरोधात तो संघर्ष करण्यास सिद्ध झाला. त्यांना हे आत्मभान आणून देण्याचे मोठे कार्य बंधुमाधवांच्या कथांनी केले यातच त्यांचे मोठेपण लक्षात येते.

बंधुमाधवांच्या सशक्त कथांबद्दल आपले मत व्यक्त करतांना गंगाधर पानतावणे म्हणतात, ''बंधुमाधवांनी या देशातील वर्णवादाचे नागडे स्वरूप आपल्या कथांतून मांडले. सामाजिक आंदोलनाने तेजस्वी झालेल्या माणसाच्या व्यथा—मनोगतांना अक्षरबध्द केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उग्र लढयातून आकार घेवू पाहणाऱ्यांच्या मनाचा वेध घेतला. समर्थपणे, समृध्दपणे त्यांच्या जीवंत लेखणीने दलितांच्या वेदना मुखर झाल्या. आत कुढणाऱ्या कित्येक शतकांच्या अबोलीला बोली फुटली. बंधुमाधवांच्या या सशक्त लेखनीनेच पुढील कित्येक तरूण दलित लेखकांना प्रेरणा दिली यात शंका नाही.''[६] म्हणजेच बंधुमाधवांनी आपल्या दलित बांधवांच्या व्यथा—वेदनांना शब्दरूप देऊन त्यांना जागृत करण्याचे फार मोठे कार्य केले. एव्हढेच नाहीतर वर्णवादामुळे दलितांना किती खालच्या पातळीवर जीवन जगावे लागत होते ते दाखवून दिले.

बंधुमाधवांना समाजपरिवर्तन अभिप्रेत होते. त्यांनी समाज परिवर्तनाच्या हेतूनेच आपल्या कथा लिहिल्या आहेत. अस्पृश्यांच्या भावनांचा, इच्छा—आकांक्षांचा परिणामकारक आविष्कार त्यांच्या कथांमधून होतो. त्यामुळेच मग त्यांची कथा अधिक सामाजिक होतांना दिसते. त्यांच्या कथेतून दलित जीवनातील विशिष्ट प्रकारच्या सामाजिकतेचे चित्रण येते. दलितांच्या जीवनातील दु:ख नाहिसे करण्याचा जालीम उपाय म्हणून त्यांनी डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार आपल्या कथांमधून केलेला दिसून येतो. त्यांची कथा अन्यायाविरूद्ध संतापाची व प्रतिकाराची भाषा बोलते तसेच ती डॉ. आंबेडकरांच्या विचारांना पुढे नेणारी आहे.

बंधुमाधवांच्या कथेचा एकूणच विचार केला तर त्यांची कथा ही अस्सल दलित जीवनाची कथा आहे. दलितांवर होणाऱ्या अन्याय – अत्याचाराविरूध्द तिने आवाज उठविला आहे. एव्हढेच नाहीतर त्यांच्या नंतरच्या दलित लेखकांना त्यांच्या कथेने विद्रोहाची प्रेरणा दिली. त्यांच्या काही कथांची शिर्षकेही मोठी बोलकी आहेत. उदा. 'कडकाव तुझा डफ', 'ही कोणत्या पापाची शिक्षा', 'त्यो दिवस कधी उगवल?' इत्यादी. दलितांमध्ये जागृती निर्माण करणे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार दलितांपर्यंत पोहचविणे, त्यांच्यात विद्रोहाची, नकाराची भावना निर्माण करणे इत्यादी कारणांसाठी त्यांनी कथालेखन केले आहे.

## निष्कर्ष :

- बंधुमाधवांची कथा ही अस्सल दलित कथा आहे.
- त्यांनी दलित बांधवांच्या व्यथा – वेदनांना आपल्या कथेतून वाचा फोडली.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करणे हे त्यांच्या कथेचे कार्य होते.
- त्यांनी आपल्या कथेतून महार वतनाविरूद्ध संघर्ष करणाऱ्या स्त्रियाही रंगविल्या आहेत.
- त्यांच्या कथा अनुभवसंपन्न असल्यामुळे त्या थेट हृदयाला भिडणाऱ्या आहेत.
- बंधुमाधवांच्या कथांनी पुढच्या पिढीतील दलित लेखकांना प्रेरणा दिली.

## संदर्भ :

१) बंधुमाधव मोडक – उषःकाल, दिवाळी अंक, १९५०.
२) तत्रैव – तत्रैव.
३) गो. म. कुळकर्णी – दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८१, पृ. १९.
४) बंधुमाधव – मुक्ती यही पथे, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, औरंगाबाद, १९७६, पृ. १५१.
५) इंदुमती शेवडे – अस्मितादर्श, जाने – फेब्रु. – मार्च, १९८०, पृ. ४२.
६) गंगाधर पाणतावणे – विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, औरंगाबाद, १९७६, पृ. १५२.

❖❖❖

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात ग्रंथालयाचे योगदान

## (Role of Libraries in college students personality Development)

डॉ. जी.पी. उरकुंदे
ग्रंथपाल
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, मो.नं. ९७६५०३४०९७

## सार (Abstract)

ग्रंथालय हे विद्येचे माहेरघर आहे असे म्हटले जाते. महाविद्यालयीन विद्यार्थी शिक्षण घेत असतांना त्याची नाळ ग्रंथालयाशी जोडली जाणे आवश्यक आहे. यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयाने पुढाकार घेवून विद्यार्थ्यांच्या वाचनीय गरजा पूर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी ग्रंथालयातर्फे विविध सुविधा पुरविणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी हा ग्रंथालयाचा वापर करून विविध स्पर्धात्मक परीक्षेसाठी तयार करणे हे केवळ त्या विद्यार्थ्यांची जबाबदारी नसून ग्रंथालयानी त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात योगदान देण्याची गरज आहे.

## प्रस्तावना

युवक हा देशाचा आधारस्तंभ आहे. देशाची जडणघडण ही युवकांच्या हातात आहे. ज्या देशाचा युवक सक्षम असेल त्या देशाची प्रगती झपाटयाने होत असते. अर्थात देशाचे भवितव्य हे सक्षम युवापिढीवर अवलंबून आहे. त्या युवापिढीला अधिक सक्षम आणि कार्यकूशल करण्यासाठी देशाची शासन व्यवस्था अधिक सक्षम आणि जागरूक असते. केंद्र शासनात केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय हे काम करीत असते. देशातील संसाधचा योग्य उपयोग करून युवक वर्गाला प्रोत्साहीत करण्याची जबाबदारी ही शासन व्यवथेची असते. सक्षम राष्ट्र निर्माण करण्यासाठी युवापिढीच्या व्यक्तिमत्व विकासाची आवश्यकता प्राचीन काळापासून जोपासली गेली आहे. वर्तमान युगात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता अनेक साधने, माध्यमे उपलब्ध आहेत. या साधनाचा परिपूर्ण वापर विद्यार्थ्यांनी करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता ग्रंथालये ही परिपूर्ण आहेत. २१ व्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या युवकांनी ग्रंथालयाचा योग्य तो वापर करून व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य देणे महत्वाचे आहे.

## ग्रंथ हेच गुरू

आजच्या माहितीच्या युगात प्रत्येक युवक, विद्यार्थी हा माहितीने परिपूर्ण असायला हवा. त्यांच्या माहितीची गरज पूर्ण करण्याचे कार्य ग्रंथालयावर अवलंबून आहे. शाळा, महाविद्यालये व विद्यापीठातील ग्रंथालये विद्यार्थी व शिक्षकांना हवी असलेली माहिती पुरविण्याचे कार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, भावी पिढीसाठी सक्षम युवकवर्ग निर्माण व्हावा यासाठी शिक्षण संस्थामधील ग्रंथालये, योग्य मार्गदर्शक, योग्य गुरू होण्याची कार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांची वाचनीय गरज लक्षात घेवून आधुनिक साहित्य पुरविण्यासाठी ग्रंथालये सक्षम आहेत. आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. जगातील घडणाऱ्या घडामोडींचा आढावा घेवून ती माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शैक्षणिक असो वां सार्वजनिक क्षेत्रातील असो ग्रंथालये सक्षम आहेत. विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोझा न पाडता त्यांना सहज व सुलभरितीने माहिती पुरविण्याची जबाबदारी ही ग्रंथालयाने उचलली आहेत. ज्याप्रमाणे गुरू कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता आपल्या शिष्यांना मार्गदर्शन करतो, त्यांना शिक्षण देतो, त्याचप्रमाणे ग्रंथालयातील ग्रंथ हे गुरूप्रमाणे कार्य करीत आहे.

मनुष्य प्राण्याने निसर्गातील घडामोडीचा, स्वत:चे ज्ञान व बुध्दी वापरून यश मिळविण्याचा प्रयत्न केला तेव्हापासून ग्रंथालयाचा उदय झाला असे मानले जाते. महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'ग्रंथ हेच गुरू' आहेत. शिक्षक व ग्रंथ हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मार्गदर्शकाची भुमिका बजावीत असतात. ग्रंथ विद्यार्थ्याला सुसंस्कृत बनविण्याचे कार्य करीत आहेत. कोणत्याही विकसीत आणि विकसनशील देशात

ग्रंथालयाचे स्थान महत्वपूर्ण आहे. ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेचा आत्मा आहे असे म्हटल्या जाते. प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत तसेच संशोधन क्षेत्रातसुद्धा ग्रंथालये ही गुरूच्या स्थानी आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी ग्रंथालयाचा आधार महत्वपूर्ण आहे. जगात घडणाऱ्या ताज्या घडामोडी, हालचाली विद्यार्थ्यांपर्यंत सहजरित्या पुरविण्याचे कार्य ग्रंथालये करीत असतात. ग्रंथ हे अध्ययन व अध्यापनाचे महत्वपूर्ण साधन आहे. लोकमान्य टिळक यांच्या म्हणण्यानुसार शाळा, महाविद्यालयातील उत्तम शिक्षण जन्मभर पुरत नाही तर, ग्रंथ हेच आपले कायमचे गुरू आहेत.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासात शैक्षणिक ग्रंथालयाची भुमिका महत्वपूर्ण आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील ग्रंथालयाचा समावेश आहे.

१. शालेय ग्रंथालय २. महाविद्यालयीन ग्रंथालय ३. विद्यापीठ ग्रंथालय

ही सर्व ग्रंथालये आपापली जबाबदारी सक्षमपणे पार पाडीत आहेत. बालवयातच विद्यार्थ्यांच्या मनावर ग्रंथालयाविषयीची आवड निर्माण करण्याची जबाबदारी शालेय ग्रंथालवर आहे. शालेय ग्रंथालये विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून ग्रंथालयाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## महाविद्यालयीन ग्रंथालय

उच्च शिक्षण प्रणालीत महाविद्यालयीन ग्रंथालयाचे स्थान महत्वपूर्ण आहे. महाविद्यालयीन शिक्षणाचा स्थर हा शालेय शिक्षणापेक्षा उच्च दर्जाचा असतो. क्रमिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अनेक पुस्तकांचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करावा यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालय सतत प्रयत्नशील असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोर उभी असणारी आव्हाने पेलण्यासाठी एक आदर्श सहायक म्हणून ग्रंथालय महत्वपूर्ण भुमिका पार पाडू शकते. ग्रंथालयात विद्यार्थी बसून त्याला हवी असणारी माहिती, हवी असणारे ज्ञान प्राप्त करू शकते. वाचनातून त्याला नवनविन कल्पना सुचू शकतात. नवे प्रयोग, नवे उपक्रम करण्याची प्रेरणा त्याला महाविद्यालयातील ग्रंथालयामधूनच मिळू शकते. समाजात आदर्श नागरिक घडविण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालये अतिशय उपयुक्त आहे. तरूण, होतकरू विद्यार्थ्यांना यशाचा उत्तम मार्ग दाखविण्याचे कार्य महाविद्यालयीन तसेच विद्यापीठ ग्रंथालये करीत आहेत.

सर्व शैक्षणिक उपक्रमात, अभ्यासक्रमात माहिती साक्षरतेचा समावेश करण्यासाठी प्राध्यापक व ग्रंथालयांनी सहकार्य करण्याची गरज निर्माण झाली आहे. समाजात आदर्शपणे जगण्याची प्रेरणा शैक्षणिक ग्रंथालयामधून मिळत आहे. विद्यार्थ्यांनी स्वत:ची बौध्दीक क्षमता व कौशल्य वापरून माहिती साधनाची योग्य निवड केली तर जीवनात यशस्वी टप्पा गाठू शकतो. ग्रंथालयाच्या माध्यमातून साहित्यसंग्रहाचे व्यवस्थापन आणि माहिती प्राप्तीची विविध साधने विद्यार्थी व प्राध्यापकांना उपलब्ध करून देण्याचे कार्य महाविद्यालयातील ग्रंथालये करीत असतात.

## ग्रंथालयाचे प्रशासन आणि व्यक्तिमत्त्व विकास

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारच्या ज्ञानशाखा आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी ग्रंथालये कटिबध्द आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी स्पर्धात्मक परिस्थितीला सामोरे जावे लागते त्यासाठी आजच्या युवकांना योग्य मार्गदर्शन करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी महविद्यालयीन ग्रंथालय असो वा विद्यापीठ ग्रंथालय असो त्या ग्रंथालयाच्या प्रशासनावर जबाबदारी आलेली आहे. ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकास साधण्याच्या हेतूने विविध प्रकल्प, विविध उपक्रम ग्रंथालयांनी राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे गरजेचे आहे. संशोधनात्मक क्षेत्रातसुध्दा विद्यार्थ्यांना विविध साधनाची उपलब्धता करून माहितीसेवा देण्याचे कार्य ग्रंथालये करीत असतात. आज इंटरनेटच्या युगात हवी असलेली माहिती ताबडतोब मिळण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे. विद्यार्थी ग्रंथालयात बसून त्याला हवी असलेली माहिती उपलब्ध करू शकतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकाकरिता इतर संदर्भ साहित्य हवे असते ती सर्व साधने पुरविण्याची जबाबदारी ग्रंथालय प्रशासनाने घेतलेली आहे. ग्रंथालयाचा वापर कसा करावयाचा याची माहिती विद्यार्थ्यांना देवून त्यांच्यात व्यक्तीमत्व विकासाची जागृती निर्माण करणे ग्रंथालयांनी स्वीकारली आहे. ग्रंथालयात येणाऱ्या नवनवीन ग्रंथाची माहिती विद्यार्थ्यांना देवून त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी ग्रंथालये परिपूर्ण आहेत. ग्रंथालयात उपलब्ध असणरी नियतकालिके व संशोधनपर लेख विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देवून

त्यांच्यात स्पर्धात्मक भावना निर्माण करणे गरजेचे आहे. विविध विषयाचे कात्रण एकत्र करून त्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली तर त्यांच्यात जागरूकता निर्माण होऊन स्पर्धा परिक्षेला सामोरे जाण्याची जिद्द निर्माण होईल. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रंथालयात असलेलया ग्रंथपरंपरेची जाणीव निर्माण करून दिली तर विद्यार्थी जास्तीत जास्त ग्रंथालयाचा वापर करून स्वत:च्या व्यक्तीमत्व विकासात भर घालू शकेल. विद्यार्थी हा ग्रंथालयप्रेमी असावा. त्यांच्यात ग्रंथ आणि ग्रंथालयाविषयी आवड निर्माण झाली तरच विद्यार्थी स्वत: होवून ग्रंथालयाचा वापर करतील व स्पर्धात्मक युगात स्वत:च्या व्यक्तीमत्वाचा ठसा उमटल्याशिवाय राहणार नाही. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथाची आवड निर्माण झाली तरच स्वत:चा व्यक्तीमत्व विकास पर्यायाने देशाचा विकासात हातभार लावू शकतील.

## समारोप

ग्रंथालयाच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास साधून देशविकासात हातभार लावू शकतील. समाजात आदर्श नागरीक म्हणून जगण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होवू शकेल. भारत विकसीत राष्ट्राच्या पंगतीत बसण्यासाठी भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी 'समर्थ भारत २०२०' हे पाहिलेले स्वप्न आजचे युवक पूर्ण करू शकतील. याबद्दल शंका येणार नाही. यासाठी समर्थ भारतातील युवकांनी ग्रंथालयाचा वापर करणे गरजेचे आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यापीठ पातळीवर झालेला विस्तार व आधुनिकीकरण बरोबरच सुसज्ज व अद्यावत सेवा देवून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. स्वंयविचारी व संशोधक प्रवृत्तीच्या युवा पिढीला शिक्षित करण्याची महत्वाची भूमिका, योगदान ग्रंथालयीन सेवेमुळे उपलब्ध होते. यामुळेच ग्रंथालये ही लोकशिक्षणाचा महत्त्वपूर्ण अंग बनलेली आहेत.

## संदर्भ

१.Shirinath Sahai – Library and the Community.

२.www.google.com

३.डॉ. कुमार पी.एस.जी., माहिती युग २०११, खंड ४

४.रेवती नरगुंडे, ग्रंथालये आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, कोथरूड, पुणे.

५.यशवंतराव चव्हाण महा. मुक्त विद्यापीठ, ग्रंथालय आणि समाज.

❖❖❖

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील भटक्या–विमुक्तांचे जीवन दर्शन

प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उ.खे. वाणिज्य महाविद्यालय अकोला
ई मेल: nfchavhan@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३१३४२६८

महाराष्ट्राचे मॅक्झिम गॉर्की म्हणून सुपरिचीत असलेले अण्णाभाऊ साठे यांची विपूल साहित्यसंपदा आणि लेखनशैली 'अद्भुत' अशीच आहे. दारिद्र्य आणि जातीव्यवस्थेमुळे केवळ दिड दिवस शाळेत गेलेला हा कलावंत माणूस इतक्या श्रेष्ठ दर्जाच्या वाङ्मयीन कलाकृती निर्माण करू शकतो हे एक आच्छर्यच मानावे लागेल. दुष्काळामुळे वाटेगाव सोडून आईबापासह मुंबईच्या चीरानगर झोपडपट्टीमध्ये त्यांनी आयुष्य काढले. याच झोपडपट्टीत त्यांनी एकापेंक्षा एक अशा श्रेष्ठ कलाकृती जन्माला घातल्या. अण्णाभाऊ ज्या सामाजिक स्तरांतून आले किंवा ते जसे जगले, भोगले, पाहिले आणि अनुभवले तेच वास्तव आपल्या साहित्यातून मांडले. त्यांच्या कथा–कादंबऱ्यातील बहुसंख्य घटना प्रसंगे आणि व्यक्तिरेखा ह्या त्यांच्या पाहणीतल्या होत्या. समाजाच्या खालच्या स्तरातील माणसांचे दु:ख, दारिद्र्य, त्यांचे जगणे जगापुढे आणण्यासाठी अण्णाभाऊनी लेखन केले. ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, ३ नाटक, प्रवासवर्णन, पोवाडे, लोकनाट्य वै. असे विपूल साहित्य निर्माण करूनही त्यांच्या साहित्याची उपेक्षा झाली. मात्र जर्मनी, जपान, पोलंड सारख्या देशातील साहित्यप्रेमी जनतेनी त्यांच्या साहित्यावर भरभरून प्रेम केले. जगातील जवळपास २७ भाषांमध्ये अण्णाभाऊंचे साहित्य अनुवादित झालेले आहे.

भारतीय समाजामध्ये प्रचलित असलेल्या वर्णव्यवस्था किंवा जातीव्यवस्थेच्या उतरंडीमध्ये भटक्या–विमुक्तांना स्थान नव्हते. पूर्वीच्या गावगाड्याच्या व्यवस्थेमध्ये अठरापगड जातीना जे जातीनुसार व्यवसाय स्वातंत्र्य मिळाले होते ते भटक्या–विमुक्तांना मिळाले नाही. परंतु स्वत:ला जगविण्यासाठी त्यांचा संबंध गावगाड्यांशी येणे क्रमप्राप्त होते. या जमातीविषयी गावगाड्यामध्ये असलेला पूर्वग्रह, चोर, लुटारू, गुन्हेगार म्हणून असलेला समज यामुळे त्यांना गावगाड्यांनी स्वीकारले नाही. परिणामी गावगाड्यात स्थिर होता न आल्यामुळे भटक्या – विमुक्तांच्या जीवनात कायम भटकंती आली. गावगाड्यात कोणती ना कोणती सेवा देत, कला दाखवित, खेळ करीत, मनोरंजन करीत, प्रसंगी भीक मागत हागणदारीत पाल मांडून ते जगू लागले. कोणत्याही गावात तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस त्यांना थांबता येत नसल्यामुळे जातीव्यवस्थेच्या दाहक वास्तव्याला त्यांना सामोरे जावे लागले. भटक्या–विमुक्तावर ब्रिटिशांनी लादलेला १८७१ चा जन्मजात गुन्हेगारीचा कायदा, या कायद्यामुळे उद्ध्वस्त झालेले त्यांचे जीवन, काटेरी तारेच्या कुंपणातील त्यांचा आक्रोश, त्यांच्याबद्दल असलेली गावगाड्याची मानसिकता, त्यांचे अस्थिर जीवन, त्यांची आगळीवेगळी संस्कृती, अण्णाभाऊच्या पूर्वीच्या मराठी साहित्याला दिसले नाही. जे काही थोडेफार लेखन झाले असेल ते केवळ भूतदयेपोटी. परंतु खऱ्या अर्थाने अण्णाभाऊंनीच सर्वप्रथम भटक्या–विमुक्तांच्या जगण्याला आणि अस्मितेला शब्द देऊन त्यांचे दु:ख साहित्यातून विस्तृतपणे मांडले. ज्या मराठी साहित्यामध्ये भटक्या–विमुक्तांचा साधा उल्लेखही सापडत नव्हता त्या भीकार पंथातील माणसांना अण्णाभाऊनी आपल्या अनेक कथा–कादंबरीचे नायकत्व बहाल केले आहे. पालातील माणसंसुध्दा पराक्रमी, सुसंस्कृत आणि नैतिक चारित्र्याने संपन्न असू शकतात हे अण्णाभाऊनी या नायकांच्या माध्यमातून दाखवून दिले.

अण्णाभाऊ साठे यांची 'माकडीचा माळ' ही कादंबरी भटक्या–विमुक्तांच्या जीवनावर आणि त्यांच्या अनेकविध प्रश्नांवर प्रभावीपणे चित्रण करणारी भारतीय साहित्यातील पहिली कादंबरी आहे. मराठी साहित्य विश्वाला परिचित नसलेल्या एका वेगळ्या विषयाला प्रथमच अण्णाभाऊनी हाताळले. डवरी, डोंबारी, दरवेशी, माकडवाले, सापगारूडी, तुरेवाले, भानामती वाले, गोसावी, फासेपारधी, नंदीबैलवाले, शिकलगार जमातीची माणसं 'दर कोस दर मुक्काम' करीत काळगांवच्या अफाट अशा फोंड्या माळावर दयाळू नाथा पाटलांच्या आश्रयाने पालं मांडतात. ''तिथं प्रत्येकाचा धर्म वेगळा होता, कर्म वेगळं होतं, नि जगण्याची रीतही निराळी होती..

त्यांची दैवतं वेगळी होती. त्यांची ठिकाणं वेगळी होती.'' तरीही कित्येक दिवसानंतर एकमेकांच्या गाठीभेटी होत असल्यामुळे तो भकास माळ आनंदून जातो. माळावर स्थिर झाल्यानंतर आपापले जनावरं,

जगण्याची साधनं घेऊन जगण्यासाठी हे माळावरचे भिकारी बाहेर पडतात. डवरी डमरू घेऊन डवर घालू लागतात. दरवेशी अंगणात अस्वल नाचवू लागतो. बाळ्या डोंबारी आपल्या तरूण पोरींचा तांडा घेऊन तमाशाचे फड पाडीत होता. सापवाले साप खेळवित होते. भानामतीवाले भानामतीचा चमत्कार दाखवून लोकांना दिपवित होते. परंतु त्यांचे विचित्र जगणे, विचित्र वागणे, मोर, ससा, मुंगुस, उंदीर, बोके, वानर, खारूळ्या, कोल्हे काहीही मारून खाणे, त्यांची भांडणं यामुळे गावकरी वैतागून जातात. एका गोसाव्याने देवाच्या बागेत शिरून वानराची शिकार करून खाल्ल्याचे गावकऱ्यांना कळताच माळावरील ही पीडा दूर करण्यासाठी ते नाथा पाटलांवर दबाव आणतात. दारिद्र्य आणि भूक ही भीकार पंथातील ह्या लोकांना होरपळून काढते याची जाणीव गोसाव्याला भेटल्यानंतर गावकऱ्यांना होते. ''हे पोट ऐकत न्हाय, आम्हास्नी वानरे खा म्हणून वर देणारा राम म्हंजी हे पोट. हे भरत न्हाय. आज गुन्हा घडला खरा, पण पोटासाठी,'' भटक्या–विमुक्तांच्या दरिद्री जीवनात 'भूक' हे केंद्रस्थानी असल्यामुळे पोटाच्या भूकेचा प्रश्न सोडविण्यासाठी नीती–अनिती, चांगले वाईट यांचा निर्वाळा करण्याची मानसिक सवड त्यांच्याकडे दिसत नाही. भटक्यांच्या जीवनात त्यांच्याकडे असलेल्या प्राण्यांना विशेष महत्त्व असते. ते प्राणी त्यांच्या जगण्याचे साधन असल्यामुळे त्यांच्यासाठी ते जीव की प्राण असते. हिकम्या गारूड्याच्या पेटाऱ्यातून पळून गेलेला साप आणि पाऱ्या डवरीच्या पिसाळलेल्या कुत्र्याला यंकूने मारल्यावर 'आता कसे जगायचे?' म्हणून ते टाहो फोडतात. नाथा पाटलाच्या मध्यस्तीने हातघाईवर गेलेले हे प्रकरण मिटविल्या जाते. परंतु पुढे ते एकमेकांचे हाडवैरी होऊन जातात. बाळ्या डोंबारीचे म्हातारे गाढव मेल्यावर ''आज वंगाळ झालं. माझी म्हातारी गाढव मेली. तिचा पायगुण लई चांगला होता. ती माझ्या दावणीत आली नि मग माझी दावण भरली. बारा गाढवाचा मालक झालो. ती माझी देवावानी गाढव मला सोडून गेली.'' असे रडत रडत शोक व्यक्त करतो. गंगू माकड, रंगी माकडीण आणि दगडू नावाचा बोकूड हे यंकू माकडवाल्यांचे जगण्याचे साधनच नाही तर ते त्यांच्या कुटुंबातील सदस्यासारखे आहेत. फाटक्या कपड्यातही अतिशह सुंदर दिसणारी 'दुर्गा' ही यंकू माकडवाल्याची मुलगी आहे. तिचे अप्रतिम सौंदर्य पाहून गावगाड्यातील विलासराव ईनामदार, रंगराव पाटील सारखे लपंट प्रवृत्तीची माणसं तिला भोगायला वेडेपिसे झाले आहेत. शिवाय भीकार पंथातीलच पाऱ्यासारखे इतर सोबती यंकूवरील सूड उगविण्यासाठी दुर्गाची बदनामी करून तिचे चारित्र्य नष्ट करण्यासाठी मदत करतांना दिसतात. गंग्या नावाचा माकड एक प्राणी असूनही दोन वेळा दुर्गाच्या आब्रूचे रक्षण करून भावाचे कर्तव्य पार पाडतो. दगाबाजी करून दुर्गाला कलंकीत करणाऱ्या मानवी प्रवृत्तीपेक्षा गंग्या माकड आणि रंगी माकडीण आपल्याला श्रेष्ठ वाटू लागतात. आपल्या धन्याचा मृत्यू होताच झाडावरून उडी घेऊन आत्महत्या करणरा गंग्या माकड, आणि गंग्या माकडाचा मृत्यू होताच डोकं आपटून जीव देणारी रंगी माकडीणचा मृत्यू वाचकांच्या मनाला सुन्न करते. दुर्गाची सोयरीक सख्या माकडवाल्यांच्या येमू नावाच्या मुलासोबत झालेली असते. दुर्गाला विलासराव ईनामदारांने कलंकित केल्याची बदनामी पाऱ्या डवरी सगळीकडे करून टाकतो. चारित्र्यहिन सून आपल्याला नको म्हणून सख्या माकडवाला जातपंचायत बसवितो. आपले चारित्र्य सिध्द करण्यासाठी दुर्गाला उकळलेल्या तेलातून बंदा रूपया काढण्याची शिक्षा जातपंचायत देते. दुर्गा कलंकित झालेली नव्हती म्हणून ती या शिक्षेसाठी तयार होते. यमूचे दुर्गावर प्रेम असते. त्याला दुर्गावर पूर्ण विश्वास असतो. म्हणून उकळलेल्या तेलातून दुर्गाने पैसे न काढता स्वतःच्या बापालाच पैसे काढायला लावण्यासाठी यमू पंचांना विनंती करतो. ''दुर्गानं पाप केलं, तर मी म्हणतो त्येनंच त्या तेलातला पैसा काढावा. जर बापाचा हात भाजला तर दुर्गानं पाप केलं न्हाय. नि जर त्येचा हात जळला न्हाय तर दुर्गा पापी, बाटलेली:'' येमूची विनंती मान्य करून पंचायत सख्यालाच उकळत्या तेलातून पैसे काढायला लावतात. पण सख्या यासाठी तयार होत नाही हे पाहून जातपंचायत दुर्गाला पवित्र मानते. भटक्या–विमुक्त समाजाच्या पुरूषप्रधान समाजाव्यवस्थेचा भक्कम आधार म्हणजे त्यांची जातपंचायत असते. आपले स्त्रीत्व सिध्द करण्यासाठी स्त्रीनेच परीक्षा द्यावी हा जातपंचायतीचा निर्णय स्त्रियांचे व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेणारा असाच असतो. परंतु अण्णाभाऊनी 'येमू'च्या माध्यमातून 'स्त्री व्यक्तीस्वातंत्र्य' अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या प्रसंगातून अण्णाभाऊनी स्त्रीचा सन्मान किती सहजपणे वाढविला आहे, हे दिसते.

भटक्या–विमुक्त प्रवर्गातील प्रत्येक जमातीमध्ये जातपंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व असते. पंचप्रमुखांची मर्जी सांभाळूनच त्यांनी दिलेले निर्णय मान्य करावे लागते. जातपंचायतीच्या निर्णयाला विरोध करणाऱ्यांना जमातीतून बहिस्कृत व्हावे लागते याची जाणीव अण्णाभाऊला आहे. जातपंचायतीला शरण न जाता त्याविरूध्द बंड करणाऱ्या 'बरबाद्या कंजारी'चे कान कापून वाळीत टाकण्याचा प्रसंग अण्णाभाऊनी आपल्या डोळ्यांनी बघितलेला होता. या अनुभवावरच त्यांनी 'बरबाद्या कंजारी' ही वास्तव कथा लिहिली आहे. अण्णाभाऊ मुंबईला ज्या चाळीमध्ये राहत होते तिथून जवळच असलेल्या टापूमध्ये डवरी, डोंबारी, कंजारी, घिसाडी, बेलदार,

वडारी यासारख्या भटक्या—विमुक्त समाजातील लोकांची कुजक्या फळ्या, सडकी बारदाने, जुने पत्रे यासारख्या निकामी वस्तूनी बनविलेली असंख्य पालं होती. जिथे पाणी नाही, संडास नाही, विज नाही, केवळ अंधार, दारिद्र्य आणि दुर्गंधी असलेल्या वातावरणात बरबाद्या कंजारी कानमळ काढून स्वत:च्या कुटुंबाला जगवित असतो. बरबाद्या आपली थोरली मुलगी निल्लीचे लग्न सैद्यासोबत लावून देतो. क्षयरोगाने सहा महिण्यातच सैद्या मरतो आणि तरूण निल्ली विधवा होते. कंजारी जमातीमध्ये एकदा मुलीचे लग्न झाले की तिच्यावर बापाची सत्ता राहत नाही. त्यामुळे विधवा झालेल्या सूनेला सासरीच आयुष्य काढावे लागते. परंतु काही दिवसानंतर तरूण निल्ली पालातीलच हैदऱ्यासोबत पळून जाते. नवरा मेला तरी सासऱ्याजवळ नांदण्याचा जमातीचा कायदा तिने मोडल्यामुळे तिच्या बापाकडून दंड वसूल करण्यासाठी जातपंचायत बसते. परंतु बरबाद्या ''तुमच्या पोरीचे नवरे मेले असते आणि मग त्या पोरी पळून गेल्या असत्या तर तुम्ही काय केले असते?'' असा प्रश्न करून जातपंचायतीलाच आव्हान देतो. तेव्हा जातपंचायत बरबाद्याचे कान कापून त्याला वाळीत टाकण्याचे शस्त्र उपयोगात आणते. वाळीत टाकणे म्हणजे केवळ कामधंदा नाकारणे एवढ्याच मर्यादित अर्थाने याकडे बघितल्या जात नाही. ''आजपासून बरबाद्या वाळीत पडला. त्याचे हुक्कापाणी बंद, यापुढे त्याचा रोटी व्यवहार, बेटी व्यवहार बंद!'' असा वाळीत टाकण्याचा थेट संबंध हा सामाजिक आणि सुरक्षेशी जोडलेला असतो.

'तमाशा' या लोककलेला प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये अण्णाभाऊचे महत्त्वाचे योगदान आहे. बुलंद आवाज, तल्लख स्मरणशक्ती, तबला—ढोलकी, हार्मोनियम वाजविण्याची असलेली कला यामुळे अण्णाभाऊ तमाशा विश्वात ऐककाळी 'हिरो' ठरले होते. अनेक वर्षे तमाशाविश्वात वावरल्यामुळे अण्णाभाऊनी तेथील वास्तव अगदी सुक्ष्मपणे रेखाटले आहे. कोल्हाटी किंवा डोंबारी या भटक्या समाजातील तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे आणि तमाशाच्या अधोगतीला थिएटरमालक, कंत्राटदार, उन्मत धनदांडगे कसे जबाबदार आहेत यांचे चित्रण त्यानी 'वैजयंता' या कादंबरीत प्रभावीपणे केले आहे. तमाशा विश्वात नाचणाऱ्या स्त्री कलावंतांच्या जीवनातील मोठी शोकांतिका म्हणजे तिचे सौंदर्य, तारूण्य असेपर्यंतच धनदांडगे, श्रीमंत तिला जवळ करतात. जमीन, जुमला, पैसा, अडका यांच्या मोह पाशात तिला अडकवून तिच्या देहाला भोगतात. अनैतिक संबंधातून मुलं जन्माला घालतात, पण त्या मुलांना आापले नाव देत नाही. तिच्या तारूण्याचा बहर संपताच तिला कोणी विचारत नाही. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'वैजयंता' या कादंबरीतील तारूण्य, लावण्य आणि कला याचा अपूर्व संगम असलेली 'गजरा' होय. या कादंबरीची नायीका 'वैजयंता' ही अनैतिक संबंधातूनच गजराच्या पोटी जन्माला आली आहे. बारा दिवसाच्या बाळाला घेऊन गजरा थिएटरमधून नाचते. वैजयंताला तमाशात न आणता तिचे उमासोबत लग्न लावून मोकळे व्हायचे अशी तिची मनोमन इच्छा असते. पुढे वय झाल्यावर गजराचा हात धरून तमाशा शिकणाऱ्या तरूण चंद्राकडूनच ''माझ्या जोडीला बैल चांगला नाही. मी म्हाताऱ्या बैलाबरोबर हे औत एकटी कशी ओढू'' असे अपमानाचे बोल ऐकल्यावर ती तमाशा सोडते आणि श्रीमंताच्या घरी धुणी—भांडे करून जगते. बालपणीचा मित्र उमा सोबत आापले लग्न व्हावे, आपला सुखी संसार असावा अशी स्त्रीसुलभ भावना वैजयंताच्या मनात असते. परंतु उमाच्या आई—वडीलांकडून नकार मिळताच गजरा आणि वैजयंताचे स्वप्न भंग पावते. पुढे वैजयंता नियतीला हार मानून परिस्थितीशरण होते आणि स्वत:ला तमाशा विश्वात गुंतवून घेते. उन्मतपणे लगट करणारे, आपणच कलेचे भोक्ते असल्याचा आव आणून स्वत:ची विषयलोलुपता दडवू पाहणारे, एका स्पर्शासाठी आसुसलेले अशी एकापेक्षा एक भयंकर विकृतीच्या माणसांसोबत तिचा संबंध येऊ लागतो. चवचाळ प्रेक्षकांना संतुष्ट करण्यासाठी वैजयंताला सर्व मर्यादा सोडून वागण्याचा सल्ला देणाऱ्या थिएटरमालकांना ती ''तमाशा म्हणजे माझ्या कलेवर... शरीरावर नाही!'' अशी दम देते. तमाशाविश्व म्हणजे कलेच्या नावांखाली चाललेला मानव्याचा व्यापार आणि तमाशात नाचणारी स्त्री म्हणजे वासनापूर्तीचे साधन अशीच आबा पाटील, सुरेश, चंदूलाल, बाबालाल, दत्तू सव्वाखंडे यासारख्यांची समजूत असते. वैजयंताला भोगण्यासाठी चंदूलाल हरतऱ्हेचे मनसुबे रचतांना दिसतो, पण त्यात तो यशस्वी होत नाही. श्रीमंत जमीनदार, थिएटरमालक हे तमाशातील स्त्रीच्या अगतिकतेचा, दुर्बलतेचा फायदा घेतांना दिसतात. चंद्रा नावाच्या कलावंतीची अक्षरश: होरपळ झालेली आहे. तमाशाच्या धंद्यात मिळणारा मान हा बेगडी असतो. शिवाय कंत्राटदाराच्या, प्रसंगी मानहानी सोसावी लागते. म्हणून सर्व गोष्टीचा विट येऊन जोती आणि हौसाबाई तमाशा सोडतांना दिसतात.

एकेकाळी महाराष्ट्रात तमाशा आणि गावगाड्यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते. कोणत्याही गावात जाऊन तमासगीर पाटलांकडे हजेरी लावीत. आणि तो पाटील लगेच त्यांना शिधा म्हणून धान्य देत असे. सारा गाव तमाशा पाहून संतुष्ट होई. काही गाव तर आपल्या गावाच्या तमासगीराला पोशित असे. अण्णाभाऊच्या

'तमासगीर' या कथेमध्ये गंगारामने आपल्या कलेने सुपे गावाचा लौकीक वाढवावा म्हणून गावातील जनता वर्गणी जमवून त्याला 'तमासगीर' करतात. पळशीचे गावकरी उमाच्या कवित्वाला आणि कलेला देवा इतकेच पवित्र मानतात. उमाचा तमाशा म्हणजे पळशी या गावांची दौलत असते. म्हणजे गावगाडा तमासगीरांना जिवंत ठेवी आणि तमासगीर तमाशाला जिवंत ठेवीत. 'बिलवरी' ह्या कथेमधूनही अण्णाभाऊनी डोंबारी समाजातील रूपाने आणि गायन, नृत्य कलेत निपून असणाऱ्या बिलवरीचे विलासराव सारखे दूर्जन तिच्या दुर्बलतेचा कसा फायदा घेतात याचे चित्रण केले आहे.

फार प्राचीन काळापासून गावगाड्याची रखवाली किंवा जागल्याचे काम करणारी जमात म्हणून 'रामोशी' ओळखली जाते. अण्णाभाऊच्या 'रक्ताचा टिळा' या कथेचा नायक धनाजी रामोशी हा बोरगावचा सनदी शिपाई आहे. तो जागल्याचे काम करतो. पोलीस पाटील भगवानराव पैशाच्या बळावर आपल्या फेफरे येणाऱ्या मुलासाठी 'आवडी' नावाची सोज्वळ, सुंदर सून वाड्यात आणतो. सासऱ्याच्या आणि सख्खा भावाच्या हेकेखोर स्वभावामुळे आपले आयुष्य उद्ध्वस्त झाले म्हणून ती धनाजी रामोशीच्या घरामध्ये शिरते. आवडीच्या ह्या कृत्यामुळे पाटील, पाटलांची आळी आणि तिचा भाऊ यांची नाक कापल्या जाते. धनाजीपासून आवडीला दूर करण्यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू असतो. नासलेल्या सूनेला पाटील घरात घेणार नाही, तिचा जीव घेईल याची कल्पना धनाजीला असते. धनाजी आवडीला मनापासून स्वीकारतो. तिच्या रक्षणासाठी तो नेहमी तत्पर राहतो. परंतु एके दिवशी गोड बोलून तिचा भाऊ आवडीला माहेरी नेऊन तिचा खून करतो. नागूला तुरूंगवास होते. आवडीच्या मृत्यूने वेडा झालेला धनाजी दहा वर्षानंतर तुरूंगातून सुटून आलेल्या नागूला कुऱ्हाडीने कापून आवडीच्या खूनाचा बदला घेतो. गावगाड्यातील प्रतिष्ठित पाटलांच्या वर्चस्वाला न घाबरता अगदी बेडरपणे आवडीला स्वीकारणारा पराक्रमी नायक अण्णाभाऊनी धनाजीच्या रूपाने साकारलेला आहे.

पाषाणयुगापासून आजपर्यंत दगडांची कलाकुसर जाणणारा वडार समाज आहे. डोंगर सुरूंग लावून फोडल्यानंतर किंवा जमीनीतून शिळा, दगड काढल्यानंतर त्यांना सजीव आकार देण्याचे कार्य वडार या विमुक्त समाजाने केले आहे. 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती दीनदलित कष्टकरी, श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे' असे म्हणणाऱ्या अण्णाभाऊंनी मुंबईच्या दगडखाणीवर श्रम करणाऱ्यांवर 'पश्चाताप' आणि 'स्मशानातील सोनं' ह्यासारख्या कथा लिहिलेल्या आहे. 'स्मशानातील सोनं' ह्या कथेतील भीमा गावी पोट भरत नसल्यामुळे मुंबईजवळील डोंगरात असणाऱ्या दगडखाणीवर काम करतो. रेड्यासारखे बळ असलेला भीमा सुतकी चालवून काळे पाषाण फोडायचा. परंतु सहा महिण्याने खाण बद होताच बेकारी आणि उपासमारीने उद्विग्न झालेल्या भीमाला एकेदिवशी स्मशानभूमीतल्या मढ्याच्या राखेत एक तोळा सोन्याची अंगठी सापडते. 'मढ्याच्या राखेत सोनं असतं' असा नवा शोध त्याला लागतो. पोटाची भूक त्याला मसनवटी धुंडाळायला प्रवृत्त करते. मसनवटी तुडवून बाळी, मुंदी, पुतळी, नथ असे काही ना काही तो मिळवू लागतो. पण एके रात्री मसणवटीत प्रेताचे लचके तोडायला आलेल्या कोल्ह्यांशी झुंजताना मढ्याच्या तोंडात अडकलेले दोन बोट गमावून बसतो. दुसऱ्या दिवसापासून बंद झालेली खाण परत सुरू होत असते. परंतु बोट गमावल्यामुळे भीमाला हाती सुतकी धरता येत नसल्यामुळे काम मिळणार नसते. 'प्रायश्चित' ह्या कथेतील बळी आणि उमा दुष्काळांमुळे पोट भरण्यासाठी शहरातील खाणीवर कामाला जातात. उमाने आपली बहिण लीला बळीला दिली होती. आन् बळीने आपली बहिण सारजा उमाला दिलेली होती. त्यांचे नुकतेच एकाच मांडवात साटेलोटे पध्दतीने लग्न झाले होते. खाणमालकांने कामगारांसाठी उभारलेल्या त्या अनेक झोपड्यांमध्ये डोंबारी, डवरी, कंजारी, वंजारी, वडार, बेलदार ह्या जमातीतील लोकांचे एकत्रीकरण झाले होते. त्यापैकी एका झोपडीत पडदा टाकून लीला आणि सारजानी आपला सुखी संसार मांडला. उमा—सारजा, बळी—लीला हे चौघेही नात्याने एक होते. पलीकडे माझा भाऊ आहे याची सुभद्रा आणि लीलाला कल्पना असते. एके रात्री दारू पिऊन उमा आणि बळी अंधाऱ्या झोपडीत शिरतात. शुध्दीवर नसलेले उमा आणि बळी चुकून आपापल्या बायकोसोबत रत न होता संख्या बहिणीशी रत होतात. सकाळी उजाडताच स्वत:च्या अंथरूणावर स्वत:चे भाऊ पाहताच लीला आणि सारजा रात्री झालेल्या शरीर सुखाचा प्रसंग आठवतात. भाऊ—बहिण या पवित्र नात्याचा भंग आपल्याकडून नकळत झाला म्हणून पश्चातापाच्या भावनेने चौघेही मरण जवळ करतात. ''मानवाने पवित्र म्हणून जी नाती निर्माण केली, जी बंधने घातली, त्यांचा भंग होताच त्या चार जीवांनी स्वत:च्या जीवनाचा तो घोर अंत करून घेतला होता. भारतीय संस्कृतीचा रक्षणार्थ ते बलिदान होते. ते घोर, घोर असे प्रायश्चित होते!'' असे अण्णाभाऊ म्हणतात.

संदर्भ ग्रंथ :— 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाड्मय', संपा — अर्जून डांगळे, नीला उपाध्ये, वसुंधरा पेंडसे. डॉ. सुभाष सावरकर, प्रकाशन—महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्र.आ. १ ऑगस्ट १९९८

❖❖❖

# स्मृतिस्थळ ग्रंथातील व्यक्तिचित्रे

प्रा. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, ता. चाकूर, जि. लातूर
भ्रमणध्वनी ८६९८५५४४०३

भटोबासांच्या प्रेमळ व्यक्तिमत्वामुळे अनेक लोक महानुभाव पंथात आले चक्रधरांच्या काळातच म्हाइंभट, महदाईसासारख्या व्यक्ति महानुभाव पंथात आल्या होत्या त्याला कारण चक्रधरांचे विभुतीमत्व होते. परंतु भटोबास हे कांही विभुति म्हणून समजले जात नसे. किंवा स्वत: नागदेवाचार्य आपणास विभुती मानत नसत. तथापि त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्यल लहान थोरांपासून सर्वांना आकर्षण वाटत असे म्हणूनच त्यांना वेधवंतीनागदेव असे म्हणत असत एकदा तर चक्रधर भिक्षेच्या निमित्ताने एका घरी आले तेथे त्यांनी भिक्षेसाठी चक्रधर अशी साद घातली. ही साद ऐकताच घरात रडणारे लहान लेकरु रडणे थांबवून एक टक भटोबासाकडे पहात असत. किंवा आईचे स्तनपान करणारे मुल स्तन टाकून देऊन भटोबासाकडे पहात असत एकदा तर चक्रधर भिक्षेच्या निमित्ताने एका घरी आले तेथे त्यांनी भिक्षेसाठी चक्रधर अशी साद घातली. ही साद ऐकताच घरात रडणारे लहान लेकरु रडणे थांबवून एक टक भटोबासाकडे पहात असत किंवा आईचे स्तनपान करणारे मूल स्तन टाकून देऊन भटोबासाकडे पहात इतके त्यांचे व्यक्तिमत्व आकर्षक होते त्यामुळे नागदेवाचार्यावर, महानुभावपंथावर प्रेम करणाऱ्या अनेक व्यक्ती स्मृतिस्थळात आढळतात.

चक्रधरांच्या विरह दु:खाने वेडया झालेल्या भटोबासास लहानबाळाप्रमाणे सांभाळणारी महइाईसा स्मृतिस्थळात प्रथमच आपले लक्ष वेधून घेत. “नागदेया! प्रसादे प्रसाद बांधीत जताए:” (नागदेव प्रसादनेच प्रसाद बांधीत आहे.) असे भावनाप्रधान उदगार काढणारी महदाईसा म्हणजे जणू कांही कवी ऱ्हदयाची एक प्रेमळ स्त्रीच वाटते.“सृष्टीमध्ये देवा दुर्लभु:का देवाते आठविता दुर्लभु:” (सृष्टीत देव दुर्लभ आहे पण त्याहीपेक्षा देवाचे स्मरण करणारा त्याही पेक्षा दुर्लभ आहे.) अशा उत्कट शब्दात चक्रधरांच्या नामाचा उच्चार करणाऱ्या एका लेकराला कुरवाळणारी महदाइसा स्मृतिस्थळात आढळते.याशिवाय किरकिर—करणाऱ्या रंभाईसेस भटोबसांनी शिव्या देऊन बाहेर घालविले तरी पण ती भटोबासांचे उच्छिष्ट खाण्यासाठी पुन्हा आश्रमात परत आली अशा निर्व्याज प्रेम करणाऱ्या रंभाईसेसारख्या स्त्रिया किंवा मुलीचा मत्यू झाला तरी अतिशय धर्माचे पालन असामान्य धैर्याने करणारी हीराईसा, आचार धर्मातील इतरांच्या चुका काढून संगतीच्या लोकांना मार्गदर्शन करणारी हीराईसा, संसारात गुरफटणारी, आपल्या नवऱ्यास म्हणजेच पंडिताबासास ताळयावर आणणारी हीराइसा आपले लक्ष वेधते.डोमेग्राम (डोमगाव) मुक्कामी चक्रधरांची पिंक पाहून भावविव्हल स्थितीत मुर्च्छित झालेली बाईदेवास आश्रमाची त्याग करणारी पंडितबास, व केशवबास परस्परातील विरोधाचा पिळ जपणारी गोविंद पंडित व आप्पा रामदेव स्वत:च्या दाताने सुपारी फोडून देणारी भाबडी भानूभट सामान्य भगिनी पण मोठया आत्मविश्वासाने महानुभाव पंथाची अनुचल कशी बनली हे लुखाइसा हिच्या चरित्र कथेवरुन दिसून येते.यांचेदेखील आकर्षक व्यक्तिचित्र स्मृतिस्थळात आले आहे. केशिराजबास आपल्या घरातील लोकांचा विरोध पत्करुन महानुभावपंथात कसा आला. महानुभाव पंथापासून त्याचे मन परावृत्त करण्याचा प्रयत्न त्यांच्या घरातील लोकांनी केला. परंतु कांहीही उपयोग झाला नाही शेवटी केशवबासाच्या पत्नीने त्यास महानुभाव पंथात जाण्याची परवानगी दिली. ही सर्वच घटना अतिशय नाटयपूर्ण शैली स्मृतिस्थळात आली आहे. एकदा तर केशिराजबास अटन विजनासाठी एका ठिकाणी गेले असताना त्यांच्या सुंदर रुपावर एका व्यापाऱ्याची मुलगी भाळली आणि विशिष्ट अभिलाषेने ती त्यांच्याकडे आली ते एका देवळात थांबले होते. तेथे ती मुलगी येताच कोणते तरी कारण सांगून जे मंदिराबाहेर गेले ते पुन्हा परतलेच नाहीत. त्यांचे कपडे कांही सामान तेथेच राहिले आणि केशवबास सरळ भटोबासाकडे आले अंधार, पाऊस याची परवा न करता केशवबास मोहाचा त्याग करुन परतले. त्याबद्यल भटोबासांनी त्यांची पुढील शब्दात प्रशंसा केली.

“एके अनिष्ठ आलेया आपण याते राखिले
एके एकांते राखिले
केशवदेनि मार्गा ते राखिले गा”

या शब्दात त्यांनी केशवबासांचे कौतुक केले. एकदा केशवबास आणि कविश्वरबास, पंडितबास हे रस्त्याने चालत होते. तिघापैकी फक्त ते पाहून एकजण म्हणाला, हे दोघेजण भट मार्गाचे महात्मे आहेत पण हा एक मात्र महात्मा दिसत नाही. कारण त्याच्या पायात वाहना आहेत. हे नुसते ऐकताच केशवबासास धक्का बसला आणि त्याच ठिकाणी त्यांनी आपल्या पायातील वाहना काढून तोडून फेकून दिल्या हे जेंव्हा भटोबासांना समजले तेंव्हा आपल्या पंथात किती थोर योग्यतेचे लोक आहेत, याद्दल मनातून आनंद वाटला. यांच्या बाणेदारपणाची प्रसिध्द कथा मूळ स्मृतिस्थळात आली आहे. नरेंद्राने महानुभाव पंथासाठी राजाश्रय देखील सोडला हे स्मृतिस्थळातील त्या प्रसिध्द घटनेवरुन दिसून येते.म्हाइंभटाची अतिशय आकर्षक रुपे प्रस्तुत चरित्रात आढळतात. म्हाइंभट निरंतर परमेश्वराच्या स्मरणात मग्न असत. त्या धुंदीत ते एकदा अटनविजनास गेले असता त्यांची गदोनायकाशी भेट (लीळाचरित्रातील पात्र आहे चक्रधरांच्या लीळांचे संशोधन, बांधणी व चिंतन यांच्या तंद्रीत असलेल्या म्हाइंभटास गदोनायक भेटल्याचे लक्षात आले नाही. पण नंतर जेंव्हा गदोनायकाच्या सेवकाने त्यांना जाणीव करुन दिली तेंव्हा मात्र म्हाइंभटाना पश्चात्ताप झाला. गोसाव्यांच्या (चक्रधर) लीळा गदोनायकास विचारल्या असल्या तर खुपच फायदा झाला असता असे त्यांना वाटू लागले. मराठीतील सुप्रसिध्द लीळाचरित्राची बांधणी कशी होत गेली याचा आलेख म्हाइंभटाच्या चरित्र संदर्भावरुन पाहवयास मिळतो. एकदा लीळांच्या शोधनासाठी म्हाइंभट पैठणला आले. सारंगपंडित यांनी त्यांचे खुप मोठे अतिथ्य केले. परंतु गोसाव्यांच्या लीळा सांगितल्या तरच आपण या अतिथ्याचा स्वीकार करु अशी म्हाइंभटाने अट घातली. ती सारंगपंडितांनी मान्य केली. म्हाइंभटासाठी खिरीचे जेवण सारंगपंडितांनी तयार केले. गोसाव्यांच्या लीळा सारंगपंडिताकडून मिळाल्याच होत्या कसे बसे दोन घास खावून आणि प्रसादाचा लाडू थोडासा खावून ते उठले आणि सर्व अन्नाची उलटी करुन टाकली. नंतर भिक्षा मागूनच ते गंगेवन जाऊन जेवले. या प्रसंगातून म्हाइंभटाचा करारीपणा आणि लीळांच्या शोधांची धडपड दिसून येते. लीळांच्या शोधनासाठी ते एकदा खेइंभटाच्या भेटीसाठी आले खेइंभट शेतात काम करीत होते. त्यांच्या मागे मागे हींडून गोसाव्यांच्या लीळा म्हाइंभटानी त्यांच्याकडून माहित करुन घेतल्या व नमस्कारपूर्वक त्यांचा स्वीकार केला. त्याही दिवसी खेइंभटाकडे जेवले नाहीत भिक्षा मागून ते जेवले. म्हाइंभटाच्या मृत्यूची घटना तर अतिशय ऱ्हदयस्पर्शी आहे. मरण्यापूर्वी भटोबासांनी आपल्या कपाळाला पायाचा स्पर्श करावा असा आग्रह म्हाइंभटानी धरला. परंतु भटोबासांनी त्यांना फक्त हस्तस्पर्श केला.

"भटो मज देवो होई"

असा ध्यास म्हाइंभटाने घेतला त्यावर भटोबास म्हणाले

"तुम्ही जरि देओ नव्हे

तरि केव्हाही देओ नव्हे"

अशा शब्दात म्हाइंभटाच्या जन्माची सार्थकता भटोबासांनी व्यक्त केली आहे. भास्कर भट बोरीकर हा महानुभाव पंथातील एक मोठा जाडा विद्वान व ग्रंथकार होता त्याच्या संबंधातील अनेक प्रभावी घटना स्मृतिस्थळात आल्या आहेत. आपल्या पुर्वीच्या गुरुंना आपले तृतीयशिंग दाखवून खजिल करणारे भास्कर भट बोरीकर, विद्वानांनाही चर्चेत निरुत्तर करुन महानुभाव पंथाची प्रतिमा उजळ करणारे कविश्वरबास किंवा भागवतावर रसाळ व्याख्यान करुन श्रोत्यांचे आणि भटोबासांचे अंतकरण जिंकणारे भास्करभट बोरीकर आपले लक्ष वेधून घेतात. ते रुपाने अतिशय सुंदर होते. फाटक्या तुटक्या कपडयातूनही त्यांचे सौंदर्य उमटून दिसत असे. कविश्वरबासाने उध्दवगीता व शिशुपालवध या ग्रंथाची रचना करुन महानुभाव पंथाचे वैभव वाढविले.

नेमाइसेसारखी स्त्री देखील विरोधकांच्या विरोधाला किती समर्थपणे प्रतिकार करु शकते हे म्हाइंभटाने घरी तिचा झालेला संवाद आहे. त्यातून स्पष्ट होते. नेमाइसेने दारंभटास अतिशय सोप्या शब्दात कर्माचे निरुपण केले आणि ईश्वर प्राप्तीसाठी भटोबासांना शरण जाण्याचे महत्व पटवून दिले. साध्या साध्या स्त्रियांच्या देखील विचारांची उंची किती मोठी होती हे यावरुन दिसून येते. महानुभाव पंथातील लोक म्हणजे कांही वेळा माणूसकीचा आदर्श वाटतात. जसे विनायकबास हे भटोबासांचे एक शिष्य होते. ते एकदा भिक्षेच्या निमित्ताने एका घरी गेले. अर्थात घरातील पुरुष कुठे तरी गावी होता. घरातील स्त्री नेसावयास वस्त्र नाही म्हणून लपली होती. घरातील लहान बाळ पाळण्याअभावी उघडयावरच झोपले होते. वास्तविक ते झोपण्याऐवजी तळतळून रडत होते. कारण त्यास खालची ओबडधोबड जमीन, खडे, गोटे टोचत होते. हे विनायकबासाने पाहिले आणि आपल्या जवळची अन्नाची सर्व भिक्षा त्या स्त्रीस दिली आणि आपल्या जवळचे एक वस्त्र त्या बाळाचे खाली घातले आणि बाळाचे रडणे थांबले. ही घटना भटोबासांना जेंव्हा समजली तेंव्हा सर्वांनाच आश्चर्य व आनंद वाटला. राजा रामदेवराव यादव यांची बायको कामाइसा हिचे देखील एक धावते करुण चित्र मनाला चटका लावते. पुत्र

प्राप्तीसाठी ही भटोबासाकडे आली. राजाला न कळू देता ती गडबडीने भटोबासाकडे आली. परंतु त्या गडबडीत तिच्या पायातील बिरुदी हरवते. ते लक्षात येताच ती अधिकच अस्वस्थ होते पण भटोबासानी बिरुदी कुठे हरवली ते सांगताच त्याप्रमाणे ती शोधून आणली परंतु भटोबासांना शरण जावे किंवा नाही हा प्रश्न तसाच शिल्लक राहिला. कामाइसेस भटोबासांनी भिक्षा दिली नाही. म्हणून ती परतली. परंतु कामाइसेला राजाच्या मृत्यूनंतर बळजबरीने सती जावे लागले. अशा तऱ्हेचे कामाइसेचे एक निरागस परंतु करुन चित्र लक्ष वेधून घेते.

## सारांश

स्मृतिस्थळात अनेक स्वभावाच्या धावत्या व्यक्तिरेखा आढळतात. श्रीकृष्ण चरित्रा गायनात विरघळून जाणारे काळे कृष्णभट, पश्चात्तापाने होरपळलेला बंकी (देमाईसेचा गुरु भाऊ) महानुभाव पंथात गाणे गाण्यास बंधन होते तरी पण एकांतात जाऊन चक्रधरांची गाणी गाणारे दामोदर पंडित तसेच मुसलमानांच्या आक्रमणाच्या काळात चक्रधर परिवारास मोठया साहसाने परळी येथे वैद्यनाथाच्या देवळात सुरक्षीत ठेवणारी साधे किंवा चक्रधर व नागदेवाचार्य यांच्यावर प्रसन्न ओव्या गाणारी महादाइसा अशा प्रकारची धावती व्यक्तिचित्रे स्मृतिस्थळात विविधरंग भरत असतात.

थोडक्यात स्मृतिस्थळ ही महानुभाव पंथात आलेल्या चांगल्या वाईट, श्रेष्ट कनिष्ठ, विद्वान व मुर्ख अशा व्यक्तींची एक चित्र शाळा आहे. एक गद्य ग्रंथ म्हणून स्मृतिस्थळाचे मराठी साहित्यात एक अविचल स्थान आहे. लीळाचरित्र प्रमाणेच स्मृतिस्थळातील गद्याचे सौंदर्य माहित करणारे आहे.

## संदर्भ ग्रंथ

१) वा.ना.देशपांडे, 'स्मृतिस्थळ', व्हीनस प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, १९९७
२) प्र.न.जोशी, 'मराठी वाड्मयाचा इतिहास', प्रसाद प्रकाशन पुणे, सुधारलेली दुसरी आवृत्ती, १९७८
३) ल.रा.नसिराबादकर, 'प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन कोल्हापूर, सहावी आवृत्ती, १९९७
४) मोहन शेळके, 'प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
५) श्रीधर कुलकर्णी, 'मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार' राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९५
६) कृ.प. देशपांडे, 'सातीग्रंथ : स्वरुप आणि समीक्षा', सन पब्लिकेशन, पुणे

❖❖❖

# On the prey of Barn owl *Tyto alba* from Yavatmal city, Maharashtra

**Ved Patki[1]* Varsha Zade[2]**

1 Ved Patki, Assistant Professor and Head, Department of Zoology, Indira Mahavidyalaya, Kalamb, District Yavatmal. Tel No. +919960153188, Email: *vedpatki@gmail.com*

2 Dr. Varsha S. Zade, Associate Professor, Government Vidarbha Institute of Sciences and Humanities, Amravati, India. 444 604, Tel No. +918275395793, Email: *zvarsha27@gmail.com*

* Corresponding Author: Ved Patki

**ABSTRACT -**

The diet of barn owl was studied in Urban habitat of Maharashtra to find out the food habits. The study was carried out in central region considered to be heart of Yavatmal city during winter 2013. Regurgitated owl pellets were analyzed to understand their dietary composition. Owls showed varied diet depending upon availability of the preys which showed that owls are opportunist.

**KEYWODS -** Barn Owl, Yavatmal, Owl Pellet, Osteous, Chitinous, Owl Prey.

## INTRODUCTION:-

The Barn Owl Tyto alba is well adapted to the subtropical and the temperate areas of the world. [1] This landbird species is most widespread in the world, occurring in every continent except Antarctica. Its range includes all of Europe (except Fennoscandia and Malta), most of Africa apart from the Sahara, the Indian subcontinent, Southeast Asia, Australia, Pan Pacific Islands, North, Central and South America[2].

It inhabits among the Grasslands, roosts in the agricultural fields, old and tall trees and pastures [3-6]. It is considered to be sedentary, and indeed many individuals, having taken up residence in a particular location, remain there even when better foraging areas nearby become vacant [2].

This owl preys primarily on small mammals, and occasionally on other vertebrates and/or insects [7-9]. These owls feed on wide variety of prey and their preference varies from place to place [10].

Owl pellets are accumulations of the undigested portions of prey which are regurgitated and ejected through the mouth in compact units. Strigidae (typical owls) prey mainly upon small rodents or insects and usually prey of a suitable size is swallowed whole. Their ability to digest bone is poor and pellets contain a good skeletal record of the small mammals consumed. Owl pellet analysis serves two primary purposes. Foremost, pellet analysis serves as a nondestructive means of diet determination. Obtained diet information can include prey species eaten [11-18], preferences of prey species [13-15] and estimates of contributions of prey biomass. Owl pellet analysis also is a useful method for gaining additional insight into small mammal communities and distribution [19-21].

Published reports on this bird are limited to descriptions prey of preferences near human habitations. However, no study has been done to evaluate the prey preferences of these owls from Yavatmal city area. Hence this study tries prey preferences in above mentioned habitat.

## MATERIALS AND METHODS-

The present study was carried out in an area which is situated in the heart of the Yavatmal city, Maharashtra. The Yavatmal district consists of masses of hilly country broken by broad valleys and partially surrounded by plain. The geographical location of Yavatmal city is between +20° 24' 21.38", +78° 5' 27.47" to +20° 22' 9.88", +78° 9' 15.51".

The Barn Owl Roost was sited on the *Polyalthia longifolia* tree(GPS location- +20° 23' 11.40" latitude and +78° 7'49.36" longitudes), and total of 15 pellets of Barn Owl *Tyto alba* were collected from the roosting site. The pellets of the owl were collected in Winter 2013.

Pellets were collected, bagged and kept in an oven at 70° for 24 h in order to kill infesting insects and then stored. Later, the pellets were subjected to NaOH treatment and the osteous and chitinous pellet contents were separated and then washed for further identification [22]. Different food remnants like bones, feathers and insect parts were cleaned under a dissecting microscope from a disentangled content of owl pellets.

The skull, cranial bones and the dentary bones were used to identify the small mammals upto the species level. The identity of small mammals was further confirmed by one of the author (SST). The Insect identification was carried out with the help of their chitinous remnants found in the pellets of spotted owlet.

Prey Biomass - The importance of each prey species is more realistically expressed by bulk rather than by number [23] The average body weight of each of the mammalian prey was estimated [24].

Magurran [29] was followed to assess and compare the diversity in the diet of two owl species by using species richness (S), Shannon's index (H) and Evenness index (E).

**RESULTS –**

The average pellet length of the Barn owl from urban habitat was found to be 4.45 ± 1.05 cm and width 3.1± 0.4. The average dry weight of the pellet was found to be 3.25± 0.65 gm. The regurgitated pellet consisted of hair, small pieces of vertebrate bones.

However some of this material was so crushed that it was very difficult to identify the taxa to which they belonged. Vertebrate bones found in the Owl pellet, formed the basis of identification of small mammals. The taxa of small mammals viz. *Suncus murinus, Rattus rattus, Bandicota bengalensis, Mus booduga, Mus musculus and Aves* species could be recorded. ( Fig 1 and 2).

The diversity indices from urban habitat showed index value (1.2) which is considered to be low. (Figure 3)

FIGURE 1 – Pie chart showing % relative abundance of prey species.



FIGURE 2 – Pie chart showing % biomass of the prey species.




FIG 3 - Comparative prey diversity and evenness.




(H –Shannon's Index, Hmax - Maximum diversity possible, E - Evenness.)

**DISCUSSION –**

The average length and width of the pellets of Barn owl from urban and agricultural habitat were similar to those reported by Patki et al [26]. However the average pellet length and width from the owls inhabiting forest habitat showed smaller size similar to the readings recorded by Santhakrishnan et al (1990).

The pellet analysis of the barn owl from all the three habitats showed presence of small mammals as major constituents in the diet. This was according to the Marti (1974)[27]. Numerically, Suncus murinus dominated the prey composition as observed by Mohammad and Santhankrishnan (2012)[28]

The presence of insects in the diet of the Barn Owls has been described by many authors in different locations [29], However in the present study only in agricultural habitat, insects were observed in the diet of barn owl.

The proportion of the of mammals in Barn owl diet differed greatly, of which only species viz. *Mus booduga*. An unidentified Aves Species was exclusively found in the diet of owl.

It is observed in the present study that diet of owls is concentrated on mammal prey which is in corroboration with Patki et al, 2015 which caused overall low evenness index. The low diversity indices in barn owl show that the diet was based upon the small number of small mammal species most of which were rodents. These results are in corroboration with those of Travaini et al. (1997)[29].

**ACKNOWLEDGEMENT :-**

Authors are thankful to Department of Science and Technology, Government of India for Providing Funding to the PhD program in the form of INSPIRE fellowship and to Officer-in-Charge of Zoological survey of India, Jabalpur, for their kind cooperation in identification of mammalian species from the owl pellet. Authors are also thankful to the Chief Conservator of Forests, Melghat Tiger reserve, Amravati for the necessary permission.

**REFERANCES -**

[1] Muhammad Sajid Nadeem et. Al. (2012) : A comparative study of the diets of barn owl (Tyto alba) and spotted owlet (Athene brama) inhabiting Ahmadpur East, Southern Punjab, Pakistan Animal Biology 62 (2012) 13–28.
[2] Shawyer, Colin. (1994) : The Barn Owl. Hamlyn. ISBN 0-600-57949-2.
[3] Ali, Salim and S. Dillon Ripley. (1969) : Handbook of the birds of India and Pakistan together with those of Bangladesh , Nepal , Bhutan and SriLanka . Vol. 3. New Delhi : OxfordUniversity Press.
[4] Marti , C. D., P. W. Wagner and K. W . Denne. (1979) : Nest-boxes for the management of Barn Owls. Wildife. Soc. Bull. 7: 145- 148.
[5] Kahila, G., S. Aviel and E. Tchernov. (1994) : Reproductive cycle of the Barn Owls (Tyto alba) in nesting boxes. Israel J. Zool. 40: 100.
[6] Pande, S., S. Tambe, C. Francis and N. Sant. (2003) : Birds of Western Ghats, Kokan and Malabar, including Birds of Goa. Mumbai: Oxford University Press and Bombay Natural History Society.
[7] Jaksiæ, F. M., R. L. Seib, and Herrera. C. M. 1982. Predation by the Barn Owl (Tyto alba) in Mediterranean habitats of Chile, Spain and California: A comparative approach. Am. Midl. Nat 107: 151–162.
[8] Marti, C. D. 1988. A long-term study of food-niche dynamics in the Common Barn-Owl: Comparisons within and between populations. Can. J. Zool 66: 1803–1812.
[9] Bellocq, M. I. 2000. A review of the trophic ecology of the Barn Owl in Argentina. J. Raptor Res 34: 108–119.
[10] Vanitha, V. and Kanakasabai, R. 2009. Prey selection by the owl Tyto alba (Scopoli,1769) in captivity. Journal of threatened taxa 1(7):361-365
[11] Jones, J. and K, Jr. 1952. Notes on the food habits of the great horned owl in Cherry County, Nebraska. Neb. Bird Rev 20: 10-11
[12] Reed, E.B. 1957. Mammal remains in pellets of Colorado barn owls. J. Mammal 38: 135-136.
[13] Rickart, E.A. 1972. An analysis of barn owl and great homed owl pellets from western Nebraska. Prairie Nat 4: 35-38.
[14] Marti, C.D. 1973. Ten years of barn owl prey data from a Colorado nest site. Wilson Bull 85: 85-86.
[15] Marti, C.D. 1974. Feeding ecology of four sympatric owls. Condor 76: 45-61.
[16] Czaplewski, N.J. 1976. Vertebrate remains in great homed owl pellets in Nebraska. Neb. Bird. Rev 44: 12-15.
[17] Epperson, C. 1976. Food remains from a barn owl nest in Nebraska. Neb. Bird Rev 44: 54-57.
[18] Dinsmore, S.J. and Clark. W.R. 1991. Food habits of the northern saw-whet-owl in central Iowa: effects of roost location. J. Iowa Acad. Sci 98: 167-169.
[14] Fichter, E. 1941. The role of owl pellet analyses in faunistics. Neb. Bird Rev 9: 26-30.

[15] Hedrick, P.W., Gaines, M.S. and Johnson, M.L. 1989. Owl feeding habits on small mammals. Occas. Pap. Mus. Nat. Hist. Univ. Kans 133: 1-7.
[16] Gubanyi, J.A., R.M. Case and Wingfield, G. 1992. Diet and nesting success of barn owls breeding in western Nebraska. Am. Midi. Nat 127: 224-232.
[17] Long, C.A. and Kerfoot, W.C. 1963. Mammalian remains from owl-pellets in eastern Wyoming. J. Mammal 44: 129-131.
[18] Choate, J.R. 1971. Notes on geographic distribution and habitats of mammals eaten by owls in southern New England. Trans. Kans. Acad. Sci 74: 212-216.
[19] Jain, A.P. and Advani, R. 1983. Winter food of Spotted Owlet. Journal of Bombay Natural History Society, 80(2): 415-416.
[19] Long, C.A. and Kerfoot, W.C. 1963. Mammalian remains from owl-pellets in eastern Wyoming. J. Mammal 44: 129-131.
[20] Choate, J.R. 1971. Notes on geographic distribution and habitats of mammals eaten by owls in southern New England. Trans. Kans. Acad. Sci 74: 212-216.
[21] Jain, A.P. and Advani, R. 1983. Winter food of Spotted Owlet. Journal of Bombay Natural History Society, 80(2): 415-416.
[22] Hibbert-Ware, A. 1938. Report of the Little Owl Food Enquiry. Brit. Birds 29: 302-5.
[23] Buckley, J., Goldsmith, J.G., 1975. The Prey of barn owl T.a.alba in east Norfolk, Mammal Review. 5:13-16.
[24] Mohammad Mahmood UL Hassan, Mirza Azhar BEG., Muhammad Mushtaq-ul-Hassan., Shahnaz Ahmed Rana., (2007), Food Habits of spotted owlet Athene brama in Central Punjab, Pakistan, Acta Zoologica Sinica., 53(1);64-68,
[25] Magurran, A.E. (1988). Ecological Diversity and Its Measurements. Croom Helm Ltd, London.
[26] Patki V, Zade V, Talmale S, Wadatkar J. ( 2015) : Prey preferances of Barn owl *Tyto alba* from Melghat Tiger Reseerve, District Amravati, Maharashtra, India. , International Journal of Researches in biosciences, agriculture and Technology. 2015; 7 (2):353-356.
[27] Marti, C.D. (1974): Feeding ecology of four sympatric owls. Condor 76: 45-61.
[28] Mohamed, S.A., Santhanakrishnan, R. 2012. Diet Composition of the Barn Owl *Tyto alba*(Aves: Tytonidae) and Spotted Owlet *Athene brama*(Aves: Strigidae) Coexisting in an Urban Environment. *Podoces* 7 (1/2): 21-32
[29] Travaini A., Donazar J.A., Ceballos O., Rodriguez A., Hiraldo F. and Delibes M. 1997.: Food habits of common Barn-owls along an elevational gradient in Andean Argentine Patagonia. Journal of Raptor Research 31(1), 59– 64.

❖❖❖

# जागतिकीकरण आणि मराठी कवयित्रींच्या कविता

प्रा. डॉ. ममता इंगोले
सहयोगी प्राध्यापक तथा विभागप्रमुख भाषा
डॉ. एच. एन. सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय,पातूर, जि. अकोला
भ्रमणध्वनी ९८२३३९२९५३

उत्पादन, उपभोग, वस्तुंचा व्यापार, आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थनीतिचा पाया असलेली मालमत्ता यांच्या बदलत्या स्वरुपामधून उदय पावलेल्या आर्थिक,सामाजिक,तंत्रज्ञानात्मक,राजकीय आणि सांस्कृतिक संरचना प्रक्रियांचा संच म्हणजे जागतिकीकरण होय अशी व्याख्या जागतिकीकरणाची केली जाते. खाजगीकरण, उदारीकरण, व्यापारीकरण, विकेंद्रीकरणाचा समावेश जागतिकीकरणात होऊ लागला. जागतिकीकरणामुळे आर्थिक सुधारणांचे पॅकेज मिळेलच असे स्वप्न सर्वचजण रंगवत असले तरी त्याचा जबरदस्त परिणाम सर्वच क्षेत्रावर होऊ लागला आहे. त्यामुळे मानवी जीवन अक्षरशः गुदमरुन जात आहे. जागतिकीकरणाने जग जवळ येऊ लागले आहे. खेडे बनु लागले, परंतु खेडयातील आत्मीयता, प्रेम, जिव्हाळा त्यात दिसत नाही. उलट स्वार्थीभावना, व्देषभावना मात्र बोकाळली आहे. परस्पराप्रतींच्या संवेदना बोथट होत आहे. मानवता हरवत चालली आहे. भौतिक सुख सुविधा मिळवण्याच्या नादात मूल्ये वेगाने ढासळू आहेत. झपाटयाने होणा—या औद्योगिकीकरण, भांडवलशाहीने विदेशी कंपण्यांचा शिरकाव, बिल्डरांची अरेरावी, यामुळे सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे. त्याच्या मुलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत भांडवलीशाही, सामंतशाहीमुळे शेतकरी, कामगारांचे प्रचंड शोषण सुरु आहे. शेतकरीत आत्महत्येकडे वळतो आहे. जगातील मुठभर लोकांची चंगळ आणि बहुसंख्य लोकांची फरकट यालाच जागतिकीकरण म्हणायचे का ? असा प्रश्न पडतो आहे. या जागतिकीकरणाच्या परिणाम आबालवृध्दांवर होत आहे. त्यात सर्वात मोठा परिणाम झाला तो 'स्त्री—वर'.

जागतिकीकरणातील व्यापारी प्रवृत्तीमुळे स्त्रीयांकडे पाहण्याची दृष्टी बदलत गेली. फॅशन शो, सौदर्यस्पर्धा, जाहिरातविश्व यांच्या नावाखाली तिला प्रेक्षणीय बनविल्या गेले आहे. या माध्यमातून स्त्रीचे स्त्रीत्व, मातृत्व, तिची अस्मिता, तिची अब्रु, तिचे समाजातील स्थान, तिचे परिवारातील, राष्ट्रातील स्थान, तिचे अधिकार, तिचे कर्तव्ये याबाबतीत आज जोरकसपणे बोलल्या जाऊ लागले आहे. एकीकडे तिच्या स्त्रित्वाचे आधुनिकिकरणाच्या गोंडस नावाखाली पणाला लावणे आणि दुसरीकडे तिच्या स्त्रीत्वाला न्याय मिळावा म्हणून उभा केलेल्या संघर्ष या चक्रात ती अडकली आहे. आज जागतिकिकरणामुळे तिला वेगळया वेगळया समस्यांना आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे.

''स्त्रीवाद्यांच्या मते जागतिकीकरणात पारंपारिक समाजाच्या नकारात्मक गोंष्टींवर मात करण्याची क्रांतिकारक क्षमता आढळत नाही तर नाहीच उलट शोषण आणि दडपशाहीची रुपे आणि प्रकार जागतिकीकरणामुळे वाढीलाच लागले आहेत. नवउदारमतवाद्यांनी, जागतिकीकरणमुळे लिंगभेदजन्य असमानता नाहीशा होतील असे जे भाकित केले होते ते तर प्रत्यक्षात आलेलेच नाही, उलट आर्थिक जागतिकीकरणामुळे त्याला वाईटच वळण मिळालेले आहे. गेल्या पन्नास वर्षात पश्चिमात्य देशातील स्त्रीवादी चळवळीने जे काय थोडेफार पदरात पाडून घेतले आहे ते जागतिक स्तरावर पोचलेले नाही. स्त्रिया आणि मुले हया समाजातील सर्वात पीडित आणि दडपलेल्या घटकांवर तर जागतिकीकरणाचा अधिकच वाईट प्रभाव झालेला दिसून येत आहे. पुरुषांच्या मानाने स्त्रियांना कारखान्यांमध्ये कमी दराच्या मजुरीवर, अधिकच वाईट परिस्थितीत काम करावे लागते, धार्मिक आणि सांस्कृतिक रीतिरिवाज स्त्रियांना कमी लेखत असतात. कायदे स्त्रियांना संरक्षण आणि आधार देण्याऐवजी त्यांच्यावर अधिक अन्यायच करीत असताना दिसतात. अशा स्थितीत स्त्रीवाद्यांची भूमिका जागतिकीकरणाला विरोधच करताना दिसते. स्त्रीवाद्यांच्या मते जागतिकीकरण हे लिंगभावयुक्त घटित आहे. स्त्रिया आणि पुरुष यांच्यावर ते भिन्नप्रकारे प्रभाव टाकते. लिंगाधारित अन्यायाची नवनवी रुपे आणि तोटे जागतिकीकरणामुळे समोर येत आहेत. अलिकडच्या काही वर्षात स्त्रीवादी चळवळींनी त्यांच्यावर भेदक प्रकाश टाकलेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कोटयावधी रुपयांची उलाढाल अव्याहतपणे सुरु असते परंतु समाजाच्या आर्थिकदृष्टया सर्वात खालच्या स्तराला या उलाढालीचा काहीही उपयोग नसतो किंवा त्याचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांचा काही फायदाही त्यात नसतो. या परिस्थितीचे स्त्रियांवर अधिक नकारात्मक परिणाम घडून आलेले दिसतात, स्त्रिया अधिक अवनत अधिक गरीब होत जातात, ज्यांचा स्त्रियांना काहीही मोबदला मिळत

नाही अशी कामे त्यांना अधिक करावी लागतात. जागतिकीकरण हा अप्रगत देशांचा विकास आणि आधुनिकीकरण यांच्या नावाखाली सुरु असलेला नवा साम्राज्यवादच आहे, त्याचा मुखवटा बाजूला केल्यानंतर वासाहतिक आणि साम्राज्यवादी श्शोषणाचा खरा चेहरा दिसून येतो.''[१] जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या समस्यांचा गरीब आणि शोषित घटकांशी थेट संबध आहे. स्त्रियांचा समावेश याच वर्गात होतो.

जागतिकीकरण ही व्यवस्था स्त्रियांचे वस्तुकरण करण्याच्या मागे आहे. एकीकडे स्त्रीमुक्ती, स्त्रीसक्षमीकरण, स्त्रीसबलीकरण अशा भाषेचा उपयोग करत स्त्रीला मुक्तीचे प्रलोभन दाखविणे सुरु असतांनाच दूसरीकडे मात्र प्रत्यक्षात ही व्यवस्था स्त्रियांचे हतबलीकरणच करीत आहे. सिनेमासृष्टी मॉडलींगचे क्षेत्र, बारमधील नृत्यांगणा, रिॲलिटीतील स्त्रियांचे वास्तव यातुन स्त्रिला आम्ही स्त्रीसक्षमीकरणाकडे घेवुन जात आहोत असे फक्त चित्र रेखाटल्या जाते. मात्र स्त्रिचे मानसिक,शारिरीक शोषणाच्या अनेक गोष्टी पुढे आल्याने त्यातील फोलपणा स्पष्ट होते कवयित्री 'पदमा गोळे'म्हणतात.,'' सीतेसाठी ओढली रेषा लक्ष्मणाने। आणि घडले रामायण । आमच्यापुढे दाही दिशा लक्ष्मणरेषा । आम्हाला ओलांडाव्याच लागतात आणि राक्षसांना सामोरे जावे लागते.'' स्त्री एक वस्तु आहे असे ही या जागतिकीकरणाने ठरविले. परिणामी तीच्या शोषणाचे नविन मार्ग निर्माण केल्या गेले. तीच्या गुणवत्तेपेक्षा तीच्या देहाला किंमत आली. उपभोग्य वस्तु म्हणून स्त्रिचा वापर केल्या जावू लागला. तीचे वेगवेगळया साधनांच्या मदतीने शारिरीक, मानसिक,लैगींक,भावनिक,आर्थिक शोषण होवु लागले. 'स्त्री' सौदर्याचे बाजारी मूल्य वाढले. कार्पोरेट जगतात तीचे वेगवेगळया पध्दतीने शोषण केल्या जावु लागले. एकीकडे जागतिकीकरणाने स्त्रियांसाठी नविन संधी निर्माण केल्या, या संधीचे काही स्त्रियांनी सोने केले, त्याचा परिणाम समाज,कुटूंब, व्यक्तीवर झाला.

जागतिकीकरणाचा प्रभाव सर्वच क्षेत्रावर पडलेला आहे. ''ग्लोबलायझेशन ही संज्ञा १९८२ पर्यंत ऑक्सफर्ड डिक्शनरींत देखींल सापडत नाही. म्हणजे २०–२५ वर्षातच या संज्ञेने व तिने बोध होणा–या प्रक्रियेने या भूतलावरील हजारो वर्षाच्या सभ्यता व संस्कृतिच्या पायावर उभ्या असलेल्या समग्र मानवी समाजाला मूळापासून हादरवुन सोडणारा असा त्याच्या कब्जा घेतलेला आहे.''[२] या पार्श्वभूमीवर संपूर्ण जगाची अनेक पातळयांवर फेरमांडणी होत आहे. २१ व्या श्शतकाला सामोरे जाताना समाजालाही फेरमांडणीचा विचार करावाच लागेल. ''विसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकातील समाजप्रवृत्ती व साहित्यप्रवृत्ती या स्वतंत्रपणे अभ्यासनीय ठरतात. या प्रकारच्या बदलामागे जागतिक परिस्थितीचीही पार्श्वभूमी आहे. नवे निसर्ग, पर्यावरणीय भान, निसर्गसंपत्ती व मनुष्यसंख्या यात निर्माण झालेला घातक असमतोल, वाढता बेबंद हिंसाचार, धार्मिक मूलतत्ववादाची नवी हिंसक रुपे, जिवनमूल्यांचे नाममात्र उरलेले तारण, विज्ञानयुगाच्या अफाट प्रगतीच्या टप्प्यांवर प्रकर्षाने जाणवणारे भ्रमनिरासाचे वैफल्य, वैभुतिक नेतृत्वाचा अभाव , संकुचित अस्मितांचा बुजबुजाट, मनुष्यसुष्टींचे नकळत होत चाललेले खेडेकरण, प्रसारमांध्यमांचा विस्तार यांसारख्या कितीतरी गोष्टींचा प्रभाव संवेदनशीलतेवर व सर्जनशीलतेवर अटळपणे पडत आहे. आंतरीक जागतिकीकरणाची ही प्रक्रिया व प्रभाव कोणत्याच समाजाला यापुढे रोखता येणार नाही.''[३] मराठी साहित्यावरही जागतिकीकरणचा प्रभाव पडला आहे. जागतिकीकरणच्या प्रभावात आलेल्या कविमनाने या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून पुढे येणा–या समाजमानवाचे, अंतर्विरोधाचे, मानसिकतेचे दर्शन आपल्या कवितांतून दृगोचर केले आहे. जागतिकिकरणाच्या अनुषंगाने मराठी कवयित्रींनी जागतिकीकरणाचे, या युगातील बदलांचे, मानवी अनुभवांचे, त्यांच्या होणा–या घुसमटीचे वास्तव टिपले आहे.

पुराण काळापासून स्त्रियांना धर्मशास्त्राच्या विषम लेखनाने मुख्य प्रवाहात येऊ दिले नाही, प्राचिन काळात सक्षम असलेल्या स्त्रिला 'चुल आणि मूल' या कार्यक्षेत्रात जखडून टाकले.नितीमूल्यांत बांधून टाकले. सर्वच स्त्रियांना'भस्त्रां'ची (कातडयांची पिशवी ) अशी उपमा दिली. एवढेच नव्हे तर तिचे माणूसपणही हिरावून घेतले. स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे उलटून गेल्यावरही तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फारसा फरक पडलेला नाही. जागतिकीकरणाच्या युगात फॅशनच्या, जाहिरातीच्या नावाखाली तिला उपभोग्यच ठरवले जात आहे. नीरजा, अश्विनी धोंगडे, मीनाक्षी पाटील, कल्पना दुधाळ, आसावरी काकडे, प्रज्ञा लोखंडे, मलिका अमर शेख, सिसिलिया कार्व्हालो, विमल वाघमारे, ज्योती लांजेवार, उषा किरण आत्राम, हिरा बनसोडे, विजयालक्ष्मी वानखडे, प्रा. संध्या रंगारी, यामिनी रानडे, गौरी भोगले, पुष्पा कांबळे या कवयित्रींच्या कवितेतून जागतिकीकरणाची जाणीव व्यक्त होते. 'अश्विनी धोंगडे' यांच्या 'स्त्रीसूक्त' या काव्यसंग्रहातील 'स्त्रीमुक्ती' ही कविता जागतिकीकरणाच्या आगमनाची सूचकपणे मांडणी करते,''इथे फॅशन शो होतात । मॉडेल्स सम्राज्ञीचे मुकुट। सर्वांगसुंदर युवतीच्या

शिरावर विराजतात। इथे टिव्ही वरच्या जाहिरातीतून। सौंदर्याबरोबर माल खपवितात। साडया प्रसाधनांच्या प्रदर्शनांतून। स्त्रीत्वसुध्दा विक्रीला ठेवतात।''('स्त्रीसूक्त', १९९७, पृष्ठ क्र. १२)

जागतिकीकरणात स्त्रियांच्या वाटेला आलेल्या या दु:खाची जाणीव कवयित्री 'प्रज्ञा लोखंडे' यांना आहे. म्हणूनच मानवतेची वागणूक स्त्रियांना मिळावी, तिचा माणूस म्हणून विचार व्हावा एवढीच माफक अपेक्षा त्या व्यक्त करतात..''पुराणकाळाच्या ग्लोबलायझेशनपर्यंत । आलटुन पालटून यच्चयावत गृहीत धरण सहजिवन संभोग समभाव । समानता स्वातंत्र्य । समाजाबाहेर सोयीस्कर ढकलण ''प्रज्ञा लोखंडे' हया समग्र स्त्रीविश्वाची जाणिव व्यक्त करीत आहेत. जागतिकीकरणाच्या युगात स्त्रीयांना शोषणाला सामोरे जावे लागते. आधुनिक काळात वेगवेगळया मार्गांने स्त्रीयांचे जे वस्त्रहरण होत आहे आणि वस्त्र पुरविणारे हात मात्र संस्कृतीकडे गहाण आहेत. व्यवस्थेचे कटकारस्थान उघडे पाडण्यासाठी कवयित्री 'ज्योती लांजेवर' स्त्रियांना जागृत करताना म्हणतात,''हर युगात। तुझे वस्त्रहरण। निमित्त वेगवेगळे। वस्त्र पुरविणारे हात। संस्कृतीकडे गहाण। तुझी थोरवी । स्वर्गाहून महान।'' (अस्मितादर्श विशेषांक, २००४, 'उलथापालथ)

जागतिकीकरणच्या चक्रव्युहाने मानव व मानवी जीवनव्यवहारांना सर्व बाजुंनी कवेत घेतले आहे. मानवी जीवनातील सर्व मूल्य व जीवनमूल्ये अक्षरश: कोलमडून पडली आहे. याचे प्रभावी चित्रण कवयित्री 'स्नेहलता चिटणीस' यांच्या ''आकाशस्पर्श'' (२००६) मध्ये आले आहे''आजकाल सगळं। विचित्रच घडतंय । माणसातले मोठेपण कमी होतंय। का ते कळत नाही ।..पण माणस बदलली। माणसातल 'मी' पण वाढत चाललंय । घेणं पुरत नाही । देणं सुचत नाही । चंगळवादात सार बिघडलंय। घरादाराला ग्रहण लागलंय ''('आकाशस्पर्श' आजकाल सगळं, २००६, पृष्ठ क्र.८)

जागतिकीकरणामुळे स्त्रिया, पुरुष द्विधा मन:स्थितीत आहेत. जुन स्विकारावं कि नवीन स्विकारावं अशी त्याची दोलायमान अवस्था आहे. नवीन स्विकारावं तर ते जीव घेणं, घातक, फसव, मूल्यहीन, तकलादू आहे ही जाणीव असूनही व्यवस्था त्यांना ते स्विकारण्यासाठी बाध्य करते. आपण कसे जगावे? हे जागतिकीकरणाची भांडवली संस्कृती सांगते म्हणून कवयित्री 'गौरी भोगले' म्हणतात, ''असे जगावे कसे जगावे ।असा त्यांचा प्रश्न आहे । आपण मात्र त्यांच्या दुनियेत। आऊटसायडर झालो आहे.'' ('पृष्ठ क्र. ७४) देशात कोणकोणत्या हिंस्त्र शक्तीचे पिकं पिकवली जातात या सद्यपरिस्थितीवर भाष्य करताना कवयित्री 'पुष्पा कांबळे' लिहीतात,''काळया रंगाचा अनवाणी पाऊस। काळी पीक, पांढरी बेकारी। संप मोर्चे, बंद गुंडागर्दी। भले की ते देशद्रोही नसतील।परंतू मानव द्रोही नक्कीच आहेत। बेकारीच अमाप पीक। नवसासाठी स्त्रीचा बाजार व्यापार आहे।''
('विषारी विचार' पृष्ठ क्र. २९) जागतिकिकरणामुळे दहशतवाद फोफावत आहे यासंबंधी भाष्य करताना कवयित्री 'मलिका अमर शेख' म्हणतात,''हिंसेला दिलेली अनेक छान – गोड नाव। आम्ही करतोय हिंसेच बारसं । हिंसाच आमची माता .... हिंसेच उत्तर मात्र एकच होतं प्रत्येक युगात.... एक ढळढळीत सर्वनाश मानवीयतेचा'' ('मलिका अमरशेख')

जागतिकीकरणाचा प्रभाव कुटुंबव्यवस्थेवर सुध्दा पडला आहे मोबाइलच्या रेंजमध्ये काम करणारे आई–वडिल, तसेच कुटूंबातील सर्वच घटकातील सुसंवाद हरवत चालला आहे. मुलांचे बालपन पार कासून गेले आहे. आई–वडिल दोघेही नोकरीनिमीत्त बाहेर सोबत खेळायलाही कोणी नाही अशा वेळी ही मुल घरात असलेल्या कॅम्प्युटरवर खेळत राहतात याचे वास्तव चित्रण 'खेळ' या कवितेतून 'प्रज्ञा लोखंडे' यांनी केले आहे. ''बंद खोलीत कम्प्युटरवर। खेळताहेत। एक एकटी मुलं। अख्खच्या अख्ख जग त्यांच्या पुढयात। एकावर एक वेष्टनांची । चळत लावून उभं। त्यांच्यासाठी आतडं तिळतिळ तुटण्याची । वेळच आता संपून गेलीय'तर ''बाल्य हरवलेली । पण बालिश होऊ इच्छिणारी। आजची पिढी। मोबाइलचे खुळखुळे हाती घेऊन। रस्त्यावर हिंडते आहे। चॉकलेटची चोखणी तोंडात घालून।बुळबुळीत वास्तव चघळीत शिकते आहे।''('दारातल्या रांगोळीचे रंग',२००७, पृष्ठ क्र.२०) या शब्दात 'सिसिलीया कॉव्हालो' यांनी नविन पिढीची वेदना मांडली. जागतिकीकरणामुळे जीवनाला गती आली त्यामुळे जगण्याच्या अर्थ ही पिढी हरवून बसली. हया भेंडोळयातून बाहेर पडण्याचा मार्ग नविन पिढीला सापडत नाही. यावर कवयित्री नीरजा भाष्य करताना लिहीतात,'' काळकामवेगाचं चुकलं आहे त्यांचं गणित.। जागतिकीकरण आणि त्यासोबत वस्तीला आलेली गती, ।अर्थ लागत नाही त्यांना कशाचाही. । प्रश्न पडू नयेत कोणतेच म्हणून प्रार्थना म्हणताहेत ती एकसारखी । उत्तराचे पर्याय गोंधळून टाकताहेत त्यांना। मुलांना सापडत नाहीत सोपा मार्ग। हया रस्त्यांच्या भेंडोळयातून बाहेर पाडण्याचा। ('निरर्थकाचे पक्षी,' पृष्ठ क्र. ११७)

जागतिकीकरणामुळे भाषा, संस्कृती, कुटुंब याची पार वाताहत झाली हे सत्य प्रा. संध्या रंगारी यांनी रेखाटले आहे.

''कवितेतून चित्रित करताना। माईची मॉम झाली। स्कर्ट घालून कॅफेत गेली. बाचा पॉप झाला। टाय लाऊन पॉप म्युझीकवर।

शेपूट हालवू लागला। पोरग पाळणाघरात। मायबाप वृध्दाश्रमातकृ। ('संध्यारंग',२०१०, पृष्ठ क्र.६७) जागतिकीकरणाचा तडाख्यातून मातृत्वही सुटले नाही. शास्त्रीय संशोधनाने 'सरोगेट मदर' अस्तित्वात आली. स्त्रीला भावनिक आवाहन करुन 'सरोगेट मदर' व्हायला भाग पाडले. तिनेही ते स्विकारले. आर्थिक नड यामुळे भागते आहे हे तिच्या लक्षात आले परंतू पुढे ''सरोगेट मदर होण्यासाठी तिलाही वाटले, काय हरकत आहे? थोडी नड भागेल। तिच्या बेसावध होकारानंतर। ती मशीनच झाली गर्भ सांभाळून पैसे मिळवणारी...।'' ('मिळून सायाजणी' सप्टे.२०१३'बाईपण',पृष्ठ क्र.४३)अशा शब्दात स्त्रिची व्यथा 'यामिनी रानडे' आपल्या कवितेतून मांडतात. 'सरोगेट मदर'च्या रुपाने आईच्या मातृत्वाचीच बोली जागतिकीकरणात लावल्या गेली. स्त्रिगर्भाचा उपयोग अर्थप्राप्तीच्या लालसेने सतत होत राहीला तर तिच्या आरोग्याचे काय होणार? याचा विचारही तिच्या मनात आला नाही. तिच्या साथीदाराने मात्र अधिक आर्थिक हव्यासापोटी या शरीररुपी मशीनची काळजी घेणे सुरु केले..

''आता घरात सुकामेवा फळफळावळ। येऊ लागली फक्त तिच्यासाठी। दोन्ही वेळा दुध घेतले का? नवरा आवर्जुन विचारु लागला। ('मिळून सायाजणी' सप्टे.२०१३'बाईपण',पृष्ठ क्र.४३) सरोगेट मदर, स्त्रीबीजांची निर्मीती व विक्री, शरीरविक्रय यासारख्या शरीराशी संबंधीत घटकांची बडजबरी जागतिकीकरणाच्या रेटयात स्त्रीला सहन करावी लागते आहे.

जागतिकीकरणाने प्रगत राष्ट्राचा विकास होत आहे. तर विकसनशील राष्ट्र भकास होत आहे. ही भकासपणाची परिणीती केवळ अर्थव्यवस्थेपुरतीच नाही तर मानवी मनं, संस्कृती, समाज, नैतिक मूल्य यांनाही तिने कवेत घेतले आहे. या संदर्भात 'सिसिलीया कॉर्व्हालो' म्हणतात.,''कुठे जळतय सदन। साजरे होतेय मरण। ''('दारातल्या रांगोळीचे रंग, २००७, जागरण') औद्योगिक क्रांती, चंगळवाद जागतिकीकरणामुळे मानवी जीवनाची वाताहत होतेय हे सांगतांना त्या म्हणतात.. ''कुठे फुटतात फटाके। कुठे फुटतात कवटया। ऐकू येत नाही फटाका। फुटणा—या काळजाचा।''('दारातल्या रांगोळीचे रंग',२००७, काजळातात दिवे, पृष्ठ क्र.६१)

जागतिकीकरणाने सर्वच क्षेत्राला तडाखा दिला आहे. त्यातून शिक्षणक्षेत्रही सुटले नाही .शिक्षणक्षेत्रातील मूल्यव्यवस्था पार ढासळून गेली. तिचेही बाजारीकरण झाले आहे. ग्लोबल व्हिलेजात माणूसकी गमावण्याचा धोका आपल्या समोर आहे. माणूसपणा गमावण्याचे भयानक परिणाम आगामी काळात भोगावे लागू शकतात. हा विचार या कवितेच्या माध्यमातून त्यांनी मानवजातीला दिला आहे''जाहिरात करावी लागते। असणा—या नसणा—या स्कीलची। शिक्षणाच झालय बाजारीकरण। शाळा करताहेत धंदा संस्था म्हणजे दुकान।''('संध्यारंग',२०१०, पृष्ठ क्र.८६) जागतिकीकरण,उदारीकरणालाही त्या ठणकावतात,

'सेझ' ची 'क्रेझ' आणून आमच सरण रचू नका.। खाऊजा खाऊजा म्हणत। आम्हालांच खाऊ नका...''

('संध्यारंग',२०१०, पृष्ठ क्र.१६१)

जागतिकीकरणाचा प्रभाव जसा मानवी जीवनावर झाला तसाच तो निसर्गावरही झाला याचे चित्रण अत्यंत प्रभावी शब्दात कवयित्री 'प्रज्ञा लोखंडे' करतात, ''आपल्या हातून। सुटल जंगल। सुटल पाणी। सुटली जमीन। सुटली नाती।

ग्लोबल व्हिलेजात सापडेल आपल्याला। आपली अस्सल कातडी।'' ('तिच्या जगण्यातला वेणा, ग्लोबल व्हिलेज',२०१०, पृष्ठ क्र.६५) ग्लोबल व्हिलेजात माणूसकी गमावण्याचा धोका आपल्या समोर आहे. माणूसपणा गमावण्याचे भयानक परिणाम आगामी काळात भोगावे लागू शकतात. हा विचार या कवितेच्या माध्यमातून त्यांनी मानवजातीला दिला आहे जागतिकीकरणामुळे माणूस विनाशाकडे वाटचाल करतो आहे. यामुळे निसर्गसुध्दा धास्तावला आहे असेही कवयित्री 'स्नेहलता चिटणीस' यांना वाटते. '' सारा निसर्गच धास्तावला आहे। कुठल्याच गोष्टीत तृप्त न होणारा । हा मानव प्राणी । विश्वाचा नाश जवळ आनतो आहे।''(''आकाशस्पर्श', झाकोळलेला सूर्य, २००६ पृष्ठ क्र.१२)

जागतिकीकरणामुळे शहर आणि खेड यांच्यात शीतयुध्द सुरु झाल्याची नोंद प्रा.संध्या रंगारी यांनी आपल्या कवितेतून घेतली आहे. ''ग्लोबल व्हिलेजच्या विरुध्द लढतयं माझ खेडं इंडिया विरुध्द भारत। चाललंय एक शीतयुध्द.।'' ('संध्यारंग',२०१०, पृष्ठ क्र.१७१) जागतिकीकरणामुळे मोजक्या लोंकांच्या हातात प्रचंड पैसा,

परिणामी चंगळवाद फोफावलला तर लाखो लोक बेकार झाले. जागतिकीकरणात माणसांच्या गरजा हया निर्माण केल्या जातात माणसाच्या हिताच्या नसल्या तरी तिच व्यवस्था राबविले जाते. हे समकालीन वास्तव चित्रण कवयित्री 'प्रज्ञा लोखंडे' यांनी केले आहे.'गच्च ओसंडून वाहतो आहे।शॉपिंग मॉल। गच्च रिकामेच रिकामे आहेत भुकेले हात। कुठल्या काउंटरवर ठेवलीय माझी कविता? डिस्काउंटमध्ये विक्रीला।''('मी भिडवू पाहते समग्राशी डोळा',२००९, पृष्ठ क्र.४३) कवयित्री 'अश्विनी धोंगडे'यांच्या कवितेतून जागतिकीकरणातील माल खपविण्याचे तंत्राचे चित्रण येते... ''एकावर एक फ्री।त्वरा करा त्वरा करा। हवा तो माल उचला।''

जागतिकीकरणामुळे खेडे बदलत चालले आहेत. आर्थिक सुबत्ता आली. परंतू पितृसत्ता, जातसत्ता, वर्गसत्ता, या व्यवस्थांना मात्र जागतिकीकरण हात लावू शकली नाही उलटपक्षी या व्यवस्थांना बळकटी मात्र येत आहे हे वास्तव कवयित्री 'प्रज्ञा लोखंडे' रेखाटतात..''कॅलडरची पान फडफडताहेत। मॉलमध्ये परिवर्तित होताहेत गावकुस।पितृसत्ता जातसत्ता वर्गसत्तेच्या। जिवंत सांगाडयाला। फुटताहेत नवनव्या असहया अमानुष पेशी।''('आरपारलयीत प्राणांतिक',२००९, पृष्ठ क्र.४३) जागतिकीकरणाच्या परिणामाने शेतकरी पार हवालदिल झाला. त्याची ससेहोलपट 'कल्पना दुधाळांनी' रेखाटली आहे.'मी टाकलेली मेथी आणि कोथिबीर..। ..मागतेय माझ्याकडं। युरियाच खाऊ....। आणि लुसलुशीत व्हायचं .....स्पेअर। रखरखीत झाडाच्या सालीनं। मॉइश्चरायझरचा हट्ट धरलाय.....।..आणि माती अडून बसलीय। 'सिझर' कर म्हणत। मी काय करु?।'' ('सिझर कर म्हणतेय माती',२०१०, पृष्ठ क्र.१७१) ग्रामिण भागातील स्त्रीया आजही दारिद्रय, अज्ञान, जातीव्यवस्था, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांच्या चिखलात रुतल्या आहेत. व्यवस्थेने तिचे वस्तुत रुपांतर केले. जागतिकीकरणात भरडणा—या स्त्रीवर्गाचे विदारक चित्र 'हीरा बनसोडे' यांच्या कवितेत येते. ग्रामिण भागातील लघुउद्योग,कुटिरोद्योग,वस्त्रोद्योग, मासेमारी इत्यादींवर नव्या आर्थिक धोरणांमुळे गदा आली. परिणामी या उद्योग धंदयाच्या माध्यमातून स्त्रियांना मोठया प्रमाणावर मिळणारा रोजगार त्या गमावुन बसल्या. कुटुंबासाठी, संसारासाठी अहर्निश कष्ट उपसणारी स्त्रीची ''पाऊल स्थिर ठेवावे। असा जमिनीचा वितभर तुकडा। राहिला नाही माझा म्हणून''('खरं सांगा',२००९, पृष्ठ क्र.५७) ही व्यथा बोलकी आहे. शेवटच्या श्वासापर्यंत लढणारी स्त्री 'तु कधी दिसली नाही'या कवितेतून'ज्योती लांजेवार' रेखाटतात.

जागतिकीकरणामुळे स्पर्धा प्रचंड वाढली, निवडणूकीच्या वेळी वाकून पाया पडणारी वृत्ती निवडून आली म्हणजे ५वर्षे ढुंकूनही पहात नाही म्हणूनच कवयित्री विजयालक्ष्मी वानखेडे आपल्या 'इशारा' काव्यसंग्रहात म्हणतात ....''सावधान, १८ वर्षाच्या मतदात्यांनो सावधान। जाणवू द्या त्यांना आपले अस्तित्व,। सांगा त्यांना ठणकावून। आम्हाला कुणी फितवू शकत नाही.।साम, दाम, दंडाने झुकवू शकत नाही। कळसुत्री बाहुल्याप्रमाणे नाचवू शकत नाही, तरुण रक्ताला,। धर्म नसतो,। जात नसते,। पक्ष नसतो,। त्यांच्या ध्वजाला विशीष्ट रंगही नसतो,।एकमात्र जाणीव असते अस्मितेची.।''(''इशारा'',पृष्ठ क्र.४४) जागतिकीकरणामुळे समाज असुरक्षित मानसिकतेत जगत असतो. संवादाची अनेक माध्यमे असतानाही मानुस एकाकी बनत जातोय. जागतिकीकरणामुळे अस्वस्थतता,असुरक्षितता,अर्थशून्यता, वाढते आहे हे बदललेले समाजवास्तव्य कवयित्री 'आसावरी काकडे' यांनी टिपले आहे. ''नवनवीन आजाराच्या भितीने। धास्तावलेल्या। की कम्युनिकेशन्सच्या। अनावर साधनांनी।बाहेरुन सर्वांशी जोडलेल्या। आणि आतून। अगदी एकाकी झालेल्या।''('मी एक दर्शनबिंदु,' पृष्ठ क्र.९०)स्त्रिवादी विचारधारा आणि जागतिकीकरणाचा सहसंबंध त्या उलगडतात जातो , जागतिकीकरणामुळे पुरुष स्वत:च कधी वस्तू झालाय हेच त्याला कळले नाही. पुरुषांचे होणारे वस्तुकरण कवयित्री 'मिनाक्षी पाटील' यांनी भेदकतेने मांडले आहे...''बाईला वस्तू— साधन समजणारा पुरुष। स्वत:च कधीच झालाय वस्तू। हेच कळू द्यायचं नाही त्याला। हाच मोठा आंतरराष्ट्रीय कट।.'' ('इज इट इन युवर डीएनए,' पृष्ठ क्र.६७)

स्वातंत्र्यानंतरही स्त्रीयांवरील बंधन वाढत आहेत. तिचे बाजारीकरण सुरुच आहे. मॉल सारख्या नवनवीन संस्कृतीत कोंडलेल्या स्त्रीयांच्या मुक हुंदक्यांची नोंद कवयित्री 'प्रज्ञा पवार' घेतात...''शुगर लॉबी, सहकार, दुध उत्पादक संघ। झेडपीसुतगिरण्या,।एम.आय.डी.सी., महामंडळ। बाईला नाचवणा—या। दौलतजादा करणा—या।सत्तेच्या आणि मत्तेच्या। चिरेबंदी वाडया।''('आरपारलयीत प्राणांतिक',२००९, पृष्ठ क्र.४४) जागतिकीकरणाच्या तडाख्यात स्त्रीने स्वत:ला सांभाळून तिच्या स्त्रित्वाला हानीकारक गोष्टींना विरोध केला पाहीजे अशी सुचना कवयित्री उषाकिरण आत्राम देतात,''सावध हो पोरी..। हो! सुर्यसळी। हो! नागकमळी। हो! सुर्यफुल। हो! तांबडी पळसाची लाल अंगार। तरच उठून दिसल। या बाजारफुक्याले तुहा श्रुंगार।'' ('म्होरकी',१९९७, पृष्ठ क्र.२५)

स्त्रीजीवनाचे यथार्थ दर्शन, पुरुषप्रधान संस्कृतीवर प्रखर प्रहार आणि जागतिकीकरणातील समकालीन वास्तव 'प्रज्ञा लोखंडे'नी त्यांच्या कवितेतून मांडले आहे.पुढील कवितेतून त्या अखिल स्त्रीमनाची जाणीव व्यक्त करतात, ''खरंच मला नकोय।फक्त स्वत:पुरतीच अनुकूलता। मला नकोय परिघाबाहेरची शाश्वत अश्वासतता। मला हवीय। खूप सुख भोगल्यानंतरची। शांतता। मला हवीय। खूप दु:ख भोगल्यानंतरची। शांतता। ''('मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा',२००७, पृष्ठ क्र.४८)

प्रस्थापित जाणिवेला छेद देत स्त्रीया नव्य व्यवस्थेतून नव्या आशाफुलवतात असे स्वप्न पाहीले कवियीत्री'विमल वाघमारे' यांनी.

''कवितेच्या गर्भार ओठांवर। मानवतेच्या कोवळया देठांवर। असू दे उद्याचा सूर्य...। भक्कम अवजड बुरुजांवर, तटांवर।

सा—या उवघट, दुर्गम घाटांवर। असू दे उद्याचा सूर्य...। खवळणा—या सागराच्या बेफाम लाटांवर। स्कृतीच्या अंधा—या काळीज काठांवर। असू दे उद्याचा सूर्य....। '' ('प्रकाशाची वाट',२००१, पृष्ठ क्र.८)

## समारोप

कवयित्रीच्या निरनिराळया वृत्ती—प्रवृत्ती, त्याच्या काव्य व जीवन विषयक भूमिकातील भिन्न परी लक्षात घेता या कवीता कोणत्याही एकाच विशिष्ट काव्यसंवेदनाचा प्रत्यय देणारी आहे असे म्हणतात येत नाही. आत्मनिष्ठ भावकवितेचे वर्तमानानुसार बदलते रुप आणि समकालीन पर्यावरणाला,जगण्याला कमी अधिक तीव्रतेने दिलेल्या प्रतिक्रिया असे दोन ठळक काव्यप्रवाह या कवितांतून जाणवतात. स्त्रियांना जगतांना वाटयास आलेली वंचना, भेडसावणा—या समस्या, होणारी घुसमट, एकटेपणा, जगण्याच्या अर्थपूर्णतेने शोध, वाढती असंवेदनशिलता, महानगरातील संस्कृतीच्या अपरिहार्यतेने आलेली अतिगतीमानता, आत्मकेंद्रितता यावर प्रकाश, व्यापारी वृत्ती, खेडयाचे वाढते बकालपण, शेतीशेतक—यांची होत असलेली वाताहत,कृषीजनसंस्कृतीच्या परिघात होत गेलेली पडझड, जागतीकीकरणाने आणलेल्या नव्या अर्थसंस्कृतीने घडविलेला मूल्य—हास, त्याबद्दलची उद्दिग्नता, बदलत्या कालमानानुसार धर्म,जात,संस्कृती,राजकारण यांची प्रत्ययास येणारी विसंगत रुपे अशी अनेकांगी आशयसूत्रांचा अविष्कार करणारी ही कविता आहे.

या कवयित्रींच्या कविता पारंपारिक स्त्रिदर्शनापेक्षा आधूनीक जगाशी समरस होवुन नव्या काळाचे आव्हान पेलणा—या स्त्रिची अभिव्यक्ती म्हणुन साकारते. स्त्रिचे खास असे अनुभव, देहधर्माच्या मोकळया अशा अविष्कारासोबत त्याला नाकारण्यासाठी सरसावल्यामुळे प्रत्येयास येणारी तिच्या संवेदन विश्वाचे निराळेपण, पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या दुटप्पी भुमिकेने नव्या काळात, नव्या संदर्भात उभ्या केलेल्या आव्हानांना दिलेली प्रतिक्रिया यांचा प्रत्यय कवितेतुन येत असला तरी ब—याचशा कवयित्रींच्या कविता अजुनही आत्मरत आणि पूरुषकेंद्री आहे.

स्त्रीयांच्या कवितेतून जागतिकिकरणामूळे निर्माण झालेले समाजवास्तव उभे राहते. जागतिकिकरणामूळे स्त्रीयांच्या जिवनावर झालेले परिणाम ही कविता अभिव्यक्त करते. महानगर तथा ग्रामिण जिवनावर जागतिकिकरणामूळे मानवी मूल्यांची झालेली घसरणही या कविता अधोरेखित करतात. प्राचिन काळापेक्षा वेगळीच नविन गुलामगिरी स्त्रीच्या वाटयाला येत आहे, याचेही चित्रण या कवितेतुन येते. स्त्रीयांच्या विविध अवयवांचे वस्तूकरण करुन चालणारा व्यापार हे या जागतिकिकरणाची देणं आहे. हे सर्व कोण? कधी थांबविणार? यांचे चित्रण या काव्यामधून तितकेसे येत नाही. कुटुंब, नातेसंस्था, व्यवस्था, संस्कृती, शेती या भोवतीचा फेर या कवितांमधून दिसतो. 'कल्पना दुधाळ' यांच्या व्यतिरिक्त 'शेती' विषय अद्याप दुर्लक्षित आहे. श कार्पोरेट जग, लैगिक पर्यटन केंद्रे, झोपडपट्टी यांसारखे अनेक विषय अद्याप दुर्लक्षित आहेत. जागतिकिकरणातील अवास्तवाच्या पार्श्वभूमीवर वास्तवतेच्या अधिक जवळ जाणारी, अस्वस्थ, अर्तमुख करणारी कवितेकडे कवयित्रींनी वाटचाल करावी हे एवढे मात्र निश्चित.

## निष्कर्ष

१) जागतिकिकरणामुळे स्त्रीयांचे शोषन कसे होत? याचे प्रकटीकरण या कवितेतून होते.

२) जागतिकिकरणामुळे मानव जिवन समाज जिवन भकास होत चालले याची चर्चा या कविता करतात.

३) जागतिकिकरणामुळे मानवी मुल्ये —हास पावत आहेत, स्त्रियांचे,मातृत्वाचेही बाजारीकरण होत आहे हे दृष्टीपथात येते.

४) जागतिकिकरणामुळे निर्माण झालेल्या कौटुंबिक सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धर्मिक,परिणामांची चर्चा या कविता करतात.

५) कवयित्रींच्या कविता पारंपारिक स्त्रिदर्शनापेक्षा आधूनीक जगाशी समरस होवुन नव्या काळाचे आव्हान पेलणा—या स्त्रिची अभिव्यक्ती म्हणुन साकारते.

६) स्त्रियांच्या नविन गुलामगीरीवर या कविता भाष्य करीत नाहीत.

७) 'कल्पना दुधाळ' यांच्या व्यतिरिक्त 'शेती' विषय अद्याप दुर्लक्षित आहे.

८) कार्पोरेट जग,लैंगिक पर्यटन केंद्र, झोपडपट्‌टी अशा अनेक विषयांना या कवितांनी स्पर्श केला नाही.

९) जागतीकीकरणाच्या प्रभावाची भिषणता अधोरेखित करणारी वास्तवाशी भिडणारी कविता निर्मीती होणे आवश्यक आहे.

## संदर्भ टीपा


१) गणोरकर प्रभा, :—'जागतिकरण आणि स्त्रीवाद',' आमची श्रीवाणी,वर्ष १६ अंक—१,ऑक्टो २००८ ते जानेवारी २००९, पृ.४२,४३

२) डॉ. जोशी त्रीपाद भालचंद्र :—'जागतिकीकरण,संवादमाध्यमे आणि केरमांडणीचे नवे आव्हान, स्वरुप प्रकाशन,औरंगाबाद पृ.१४

३) कोतापल्ले नागनाथ (संपादन) :— 'स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कला,साहित्य व समाजसाहित्य आणि समाज'' प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७, पृ.१२९


❖❖❖

# STRESS MANAGEMENT FOR LIBRARY PROFESSIONALS

**Dr. Vibhavari Balaji Hate**
Librarian
Karmavir Mahavidyalaya, Mul
Email:vibha.hate@rediffmail.com
Mob: 9881189290

## Abstract:

Exploring the world of 'Stress and Healing ways for coping with it' is really required for the library Professionals today. They have to handle the new advanced technology, old generation of up line management & down line i.e. library staff, as well as the new Net Generation especially in a College Library. Moreover, status and Position of the Librarian is always an issue. As a result, present library professionals need more stress management techniques to be taught than ever. The 'Stress', it's various definitions, physical symptoms of stress, patterns of stress. Stressors, type of stressor, basic steps to prevent stress, how to manage it and cope with it using stress management techniques, styles of stress management, coping skills or healing ways and main stressors which affect the Professionals with special reference to the College Library Professionals and their work.

**Keywords:** Stress, Stressors, stress Management, College Library professionals.

## Introduction:

When library professional face the situation he cannot handle, they feel stressed. Even when they are overburdened or overworked, then also they feel stressed out. Secondary data collected from various reference books and web resources. Stress is the situation from which we want to come out. We can't stay in that situation for a long time. We need relief from it. 'Stress generally defined as response to concrete or mentally induced threats to a person's bodily homeostasis Library Professionals & teaching them some technique to heal positively from their increased professional stress. Aversive stress responses occur when a person fails to respond effectively to mental, emotional, of physical demands. These threats can be real or imagined. From a functionalist perspective, stress services as a survival mechanism to evoke physiological changes needed to escape a threat. According to Merriam-Webster Dictionary, 'Stress is a constraining force or influence. It is a force exerted when one body or body part presses on, pulls or pushes against, or tends to compress or twist another body, a physical chemical or emotional factor that causes bodily or mental tension and may be a factor in disease causation.

## Excessive stress can affect a librarian's health by:

- Reducing productivity
- Contribution to premature ageing
- Worsening

## Mental and Emotional stressors:

For many librarians public speaking is a mental and emotional stressor. Presenting in front of an audience is a mental stressor not only to the library professionals but to the teachers also in many cases. Librarian doesn't have practice of speaking on the stage like teachers. Given that task, performance is required. This provides a logical explanation as public speaking being reported as a significantly stressful event.

## Tension:

Librarian can take tension of the situation he/she facing and be stressful.

## Perfection:

Librarians, who are perfectionist, may be more stressful than others. They can take stress because of their smallest mistake.

## Stressors of today's Library Professionals:

## General Problem:

- Qualifying NET / SET Exam.
- Difference in the Pay Scales though qualifications are the same.
- Difference in working hours, workload & responsibilities.
- Career Advancement through increasing the API points
- Writing Research papers.

### Stressors for many College Librarians:

- Lack of library staff
- Lack of Funds
- Office staff
- Principal
- Management
- Library staff is used for other work outside the library
- Institutional Politics.
- Many Library professionals are ladies & they have to balance themselves with work at workplace as well as at home.

## Being prepared:

If we feel a stressful situation with coworker, family member or friend take a deep breath, relax, and begin speaking in a warm, pleasant manner instead of yelling or raising your voice. Advance preparation for stressful events will help you deal with the situation better in the long run.

## Positive Attitude:

Take a deep breath, relax, center your thoughts, and maintain a positive attitude. What you send out to universe comes back to you. When stressful situations occur in your life, send out positive vibes of energy and the same will return to you.

## Social support:

Stress is often worsened when we have no outlet or means of discussing our issues. Make time to socialize and stay in touch with the family and friends If you feel overwhelmed, talk to someone who you can trust, Sometimes simply talking about your feelings can give you renewed strength to tackle goals.

## Conclusion:

Library Professionals are really stressed out in present scenario. There are many different .types of problems the library professionals have to face at this hour. Whatever is the cause, he/she has to often handle the problem alone. This profession is in dispute many times. In the academic setup it is seen that there are many disparities about this professional's role as well as these professionals.

## Reference:

Richard S., Stress and Emotion: A New Synthesis Google Books, 2011.
Stress Management App from Samsung App, on Samsung Galaxy, Handle Stress At Work. 2013.
Florence Scovell Shinn, The Game of Life and how to play, 2007.
Merriam, Webster Online: Dictionary and Thesaurus, 2003.

❖❖❖

# महात्मा बसवेश्वर समाजवादी संत

प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला
महाविद्यालय, दर्यापूर
Email Id :- dr.herole@gmail.com
Mob. 9423427063

## सारांश

महात्मा बसवेश्वर हे समाजवादी समाजरचनेचे अध्वर्यू होते. महात्मा गौतम बुध्द, भगवान महावीर वर्धमान यांच्यानंतर इतिहासात कृतीशील सुधारक संत म्हणून महात्मा बसवेश्वरांचे स्थान अग्रगण्य समजले जाते. किंबहुना १२ व्या शतकात सरंजामशाही व्यवस्थेचे आणि धर्मवादी कर्मकांडाचे अवास्तव स्तोम माजले होते. त्याला आवाहन देणारा श्रेष्ठ क्रांतीकारक म्हणुन बसवेश्वरांचे कार्य समजून घेतले पाहीजे.

एक महान क्रांतीकारक आणि सुधारक संत महात्मा बसवेश्वरांचे समग्र जीवनच क्रांतिकारी होते. मागासलेल्या समाजजीवनाला नवे संजीवक सामर्थ्य देण्याचे ऐतिहासिक कार्य महात्मा बसवेश्वरांनी पुर्णत्वाला नेले. धर्माच्या नावाखाली चाललेल्या कर्मठपणाला व बुवाबाजीला कडवा विरोध करीत, खरा धर्म काय आहे हे सांगण्याचे तसेच जातिभेद, अस्पृश्यता, उच्च–नीचभाव यासारख्या समाजघातक रूढींना मुठमाती देउन समाजात समता प्रस्थापित करण्याचे, स्त्रियांना समाजात समानतेचे, प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्याचे, कायकवे कैलास (श्रम हाच कैलास) असा उपदेश करून समाजाला उद्योगशील बनवण्याचे, भक्तींचे व साहित्याचे दालन समृध्द करण्याचे समता–स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या मूलभूत सुत्रावर आधारलेली अनुभव मंटप या नावाची आदर्श संस्था स्थापन करण्याचे मौलीक कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले.

महात्मा बसवेश्वरांचे जन्मस्थान बागेवाडी (जि. बागलकोट, कर्नाटक) येथून जवळच असलेल्या कृष्णा आणि मलप्रभा नद्यांच्या संगमावरील कुंडल संगम, हे अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र समजले जाते. या क्षेत्रात संगमदेव मुनींचा आश्रम होता. महात्मा बसवेश्वरांच्या बालपणीच त्यांचे आई–वडिलांचे छत्र हरपल्याने तेंव्हा संगमदेव मुनींनी आपल्या आश्रमात बसवेश्वरांना आश्रय देउन त्यांचे पालनपोषण केले. महात्मा बसवेश्वरांनी देखील संगमदेव मुनींच्या आश्रमात १५ वर्षे वास्तव्य करून वेद, पडदर्शन, इतिहास, पुराणे आदी हिंदू धर्मशास्त्रांचा तसेच बौध्द व जैन धर्मग्रंथाचाही गाढा अभ्यास करून त्यात प्राविण्य संपादन केले. संस्कृत आणि कन्नड या भाषेवरही प्रभुत्व सिध्द केले. त्यांनी विविध धर्मपंथाच्या आचारपणाचे, समाजव्यवस्थेचे सुक्ष्म निरीक्षण केले. त्यानंतर ते सर्वधर्म समभावाकडे आणि सामाजिक समतेकडे प्रभावीत झाल्याचे दिसून येते.

बीज शब्द — समाजवाद, संस्कृती, अस्पृश्यता, कर्मकांड, श्रम

## प्रस्तावना

बाराव्या शतकात जेव्हा स्पृश व अस्पृश्यतेच्या भावना अधिक तीव्र होत्या तेव्हा वेगवेगळ्या जातीधर्मातील लोकांना एके ठिकाणी आणून धार्मिक, सामाजिक, आध्यात्मिक चर्चा घडवून आणण्याचा अभिनव प्रयोग महात्मा बसवेश्वरांनी प्रत्यक्षात आणला. ज्ञानाची कवाडे सर्व जातीधर्मातील लोकांसाठी खुली करण्याचा, उच्च–नीचतेच्या पारंपारीक कल्पनेला तडा देण्याचे कार्य त्यांनी केले. देव एकच असून त्याची नावे अनंत आहेत असे त्यांचे मत होते. खऱ्या शिवभक्ताला जातपात स्पर्श करत नाही. कुंडल संगमदेवाचे वचन मानणारा अत्यंज असला तरी तो कुलवंतच होय, असे ते मानीत असत. अस्पृश्य कोण, त्याचे स्पष्टीकरण करतांना हिंसा करणारा तो अस्पृश्य, माता–पित्यास हिणकस वागणूक देणारा अस्पृश्य होय, असे विश्लेषण महात्मा बसवेश्वरांनी केल्याचे दिसून येते. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात रूजविलेले विचार आजही पुन्हा विकसित करण्याचे आव्हान बसवेश्वरांच्या अनुयायांनी स्विकारले पाहिजे. लौकीक अर्थाने महात्मा बसवेश्वरांचे अनुयायी न होता डोळसपणे त्यांच्या विचारांचा कार्याचा वारसा जतन करण्याची खरी गरज आहे. महात्मा बसवेश्वरांनी श्रम हाच

स्वर्ग, असल्याची प्रचिती वेळोवेळी दिली आहे. महात्मा गांधीजींनी मांडलेला 'श्रम ही है श्रीराम हमारा' हा विचार महात्मा बसवेश्वरांच्या विचारांशी साधर्म्य दाखवणारा आहे. हे आवर्जून लक्षात ठेवले पाहिजे. नीतीमुल्यांसह उद्योग आणि श्रमाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने ईश्वराची उपासना होते. तेव्हा प्रत्येकाने उद्योग करूनच पोट भरावे कोणीही भिक्षा मागू नये. उद्योगाचे व श्रमनीष्ठेचे महत्व कार्ल मार्क्सच्या अगोदर सुमारे ७५० वर्षापूर्वी प्रतीपादन करणारा जगाच्या इतिहासातील पहीला सर्वश्रेष्ठ तत्वव्यत्ता म्हणुन महात्मा बसवेश्वरांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी अनुभव मंडप नावाची आदर्श संस्था स्थापन केली. रंजल्या गांजल्याना व पददलीतांना समानतेच्या सुत्राात बांधणारे केंद्र म्हणजे अनुभव मंडप होय. स्त्रीयांची गुलामगीरी नष्ट करून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने समान स्थान मिळाले पाहीजे म्हणजेच ९०० वर्षापुर्वी महात्मा बसवेश्वरांनी समाजवादी समाजरचनेचा पाया घातला होता.

आज समाजवादाचा, मानवतावादाचा सर्वत्र बोलबाला होतो परंतु त्यास प्रत्यक्ष कृतीव्दारे साकार करण्याचे महान कार्य बसवेश्वरांनी केले. त्यांचे तत्वज्ञान रूढी क्रीये नसुन ते आधुनिक विचार सरणीशी जुळणारे तक्रशुध्द समानता माननारे तत्वज्ञान आहे. अनुभव मंटपाच्या माध्यमातुन धार्मीक, नैतीक, सामाजीक, आर्थीक, राजकीय आणि वाङ्मयीन सांस्कृतीक क्षेत्रात सप्तक्रांती घडवून आणली समानतेसाठी आंतरजातीय विवाह लावले. जयप्रकाश नारायण यांच्या संपुर्ण क्रांतीशी जुळणारे विचार त्यांनी ९०० वर्षापुर्वी मांडले होते. कर्मकांडाच्या मगरमीठीतुन धर्माची मुक्तता करण्यासाठी तसेच त्याला व्यावहारीक व लोकशाही व विश्वधर्माचे स्वरूप देण्यासाठी महान ऐतिहासीका कार्य केले.

महात्मा बसवेश्वरांनी ९०० वर्षापूर्वी, सामाजीक, आर्थीक जिवनात अभुतपुर्व क्रांती घडवून आणली, लोकांना आपल्या कृतीशील जीवनपध्दतीतुन त्यांनी सत्कर्माचा सात्वीकतेचा, मांगल्याचा, समतेचा, न्यायाचा अमृत कुंभ दिला. बसवेश्वरांचे डोळस अनुयायी त्यांच्या जीवनातील चैतन्याचा स्पर्श खऱ्या रूपाने कृतीमध्ये उतरवतील. भगवान बौध्द आणि महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची समतेची दिंडी, महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समर्थपणे खांद्यावर घेतल्याचे दिसून येते.

## समारोप

तथागत गौतम बुध्दानंतरचा समतेचा निनाद म्हणजे महात्मा बसवेश्वर होय. अमानवी मूल्य परंपरा नष्ट करून, स्वत:ला अभिप्रेत असलेली मानवतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि तिला टिकविण्यासाठी म. बसवेश्वर सतत धडपड करत राहिले. विचार शून्यतेने चालणारी रूढीग्रस्त, जातीवादी अंधश्रध्दा अज्ञान आणि कर्मकांड यांच्या तावडीत सापडलेली त्यावेळची समाजव्यवस्था होती. सहिष्णूता, न्याय, समता यांचे नाव काढण्याचीही हिंमत कुणी करू शकत नव्हते. मात्र बसवेश्वरांनी हे आव्हान स्विकारले पूर्णपणे प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी परिवर्तनाचे कार्य नेटाने पुढे रेटले यज्ञवेदीवरील पशूहत्या त्यांना पाहवल्या जात नव्हती. भूकेलेली, निर्वस्त्र मूले पाहिली की, त्यांचे मन कळवळून उठत असे, दास्याच्या हीनतय अवस्थेपर्यंत ढकलल्या गेलेल्या, अस्पृश्यांची अवस्था पाहून त्यांना फार वाईट वाटत होते. विहिरित पडलेल्या अस्पृश्य मुलाची तडफड गावातील लोक दुरून पाहत होते, तो मृत्युचा खेळ म्हणजे त्यांच्यासाठी अघोरी मनोरंजन होते, अशा मूलाला म. बसवेश्वरांनी स्वत:हून वाचविले त्यासाठी त्यांना समाजातून बहिष्कृत व्हावे लागले. परंतु ते डगमगले नाहीत. उलट अस्पृश्यांना उदारपणे आश्रय देण्याची व त्यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा घेउन त्यांनी गाव सोडले, म. बसवेश्वर हे वीरशैव लिंगायत कुळातील होते, त्यावेळी अनेक जातीतील लोक गळ्यात जानवे, घालायचे मुंज करायचे, त्यामुळे आपली योग्यता वाढते असा समज त्याकाळी होता. म. बसवेश्वराच्या कुळातही ही परंपरा होती परंतु त्यांनी या परंपरेचा कडाडून विरोध केला.

## निष्कर्ष

१. महात्मा बसवेश्वरांनी तत्वाविरूध्द तडजोड केली नाही. म्हणूनच ते परिवर्तनवादी लढ्याचे अग्रदूत ठरतात.
२. यज्ञवेदीवरील पशूहत्या थांबविण्यासाठी त्यांनी निकराचे लढे दिले.
३. शिवानुभव मंटप या परिवर्तनवादी चळवळीचे आणि साम्यवादी विचारसरणीला स्वीकारणारे ते एक अभिनव केंद्र होते.
४. श्रम केल्याशिवाय कुणालाच जगण्याचा अधिकार नाही ही त्यांची रोखठोक शिकवण होती.
५. महात्मा बसवेश्वरांनी काळाला कलाटणी देउन एकाकी लढा दिला आणि धर्माकडे पाहण्याचा एक विशाल दृष्टीकोन या जगाला दिला.

## संदर्भ ग्रंथ

१. अभय मनोहर कलावार, 'दक्षिणेचा प्रबुध्द महात्मा बसवेश्वर'
२. डॉ. नयना धवड, यांचा आत्मोन्नती मधून लेख दि. ७ एप्रिल २०१६
३. प्राचार्य, डॉ. सोमनाथ रोडे, समाजवादी समाजरचनेचे अध्वर्यू महात्मा बसवेश्वर 'कॅन्व्हास' दिव्य मराठी दि. ६ मे २०१६
४. कॅनव्हास दैनिक दिव्य मराठी, प्रा. डॉ. सोमनाथ रोडे यांचा लेख दि. ६ मे २०१६, पृ. क्र. ७

❖❖❖

# समाजवास्तवाचे भान ठेवणाऱ्या आधुनिक कविता

प्रा.डॉ. शोभा रोकडे
इंदिराबाई मेघे महाविद्यालय, अमरावती
Profshobharokade@gmail.com

## प्रस्तावना :–

आजच्या एकूणच काव्य अभिव्यक्तीकडे गांभीर्याने व चिंतनशीलतेने लक्ष घातले तर समाजाच्या बिघडलेल्या पोताचे सूक्ष्म निरिक्षण करुन कवींची कविता समोर आलेली दिसते. विविधांगी मतप्रवाह, विचारविवेचन आणि शैलीबंधाच्या अंगाने आधुनिक मराठी कविता नवनवे स्वरुप साकारतांना दिसते. समाजाची स्थिती–गती, अधोगती, उन्नती याबाबतची चर्चा या कवितांमधून मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेला इथला माणूस, त्याचे जगणे, त्याचे प्रश्न आणि एकूणच त्याची मानसिकता या अनुषंगाने विचार केल्यास हे सर्व विषय आधुनिक मराठी कवितेचे विषय झालेले दिसतात. अनेक बाजूंनी विकलांग होत चाललेल्या समाजाला आपल्या कवितेतून बळ देण्याचा प्रयत्न नव्या दमाने कवी करीत आहेत. जाहिरातबाजी, प्रसिध्दी, मानधन या गर्तेतही एक विशिष्ट वर्ग मात्र शाश्वत जगण्याचे भान आपल्या कवितेतून जोपासतांना दिसतो. कवितेबाबतची सवंगताही मोठ्या प्रमाणात वाढत चाललेली दिसते. अशावेळी कवितेचं सत्व जोपासून कविता लिहिणारे फार कमी कवी दिसतात. वास्तवप्रश्नांना बगल देतं चिंतनशील कविताही एकीकडे मोठ्या प्रमाणात समोर आलेली दिसते. प्रामाणिकपणे काव्य लेखन करणाऱ्या कवींच्या कवितेत समाजभान आणि स्व–भान एकाचवेळी अंकुरित होतांना दिसते. जीवनजाणिवा, जगण्याचे भान आणि सूक्ष्मनिरिक्षण यातून प्रसवलेली आधुनिक मराठी कविता रुपबंधाच्या अंगानेही कमनीय होतांना दिसते. आंतरिक सौंदर्याबरोबर बाह्य सौंदर्याचेही भान या कवितेला असल्याचे निदर्शनास येते. कवितेची सकसता आणि सकसतेचे योग्य मूल्यमापन यावर कवितेबाबतचे सामान्य रसिकांचे व अभ्यासकांचे मन निश्चित व्हायला निश्चितच मदत मिळते. अलीकडच्या कवींच्या कवितेतील जीवन वास्तवही याच अनुषंगाने अखोरेखित करता येते. आधुनिक कवितेच्या प्रांतात महेश केळूसकर, अशोक बागवे, प्रशांत असनारे, अजीम नवाज राही, पी.विठ्ठल, प्रज्ञा दया पवार, नीरजा, आसावरी काकडे, अनुराधा पाटील, अस्मिता गुरव, संजीवनी कुळकर्णी, नीलिमा गुंडी, कल्पना दुधाळ यासारख्या नव्या दमाच्या कवींच्या कवितेतून हे सामाजिक मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त झाल्याचे निदर्शनास येते. समाजामध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेली आत्मकेंद्रित वृत्ती, स्वार्थलोलुपता, असंवेदनशीलता या बाबी या कवींनी सामर्थ्यानिशी टिपलेल्या दिसून येतात.

पी. विठ्ठल हे आपल्या 'माझ्या वर्तमानाची नोंद' या कविता संग्रहात एके ठिकाणी म्हणतात.

खोल खोल एवढे खोल, तळही लागत नाहीत
आपणच..... आपल्याला, कोणत्याही गुहेत....
कसं बरं सापडत नाही

(दु:खाचे महावस्त्र, पृ. ५५)

अंतर्मनाशी चाललेला हा युगायुगापासूनच आक्रोश कवी तळमळीने व्यक्त करतात. अस्वस्थ्य जगण्याची सारी प्रतिबिंब या कवितेत उतरलेली दिसतात. आत्मशोधाची एक निखालस कविता म्हणूनही या कवितेचा उल्लेख करावा लागेल. बाईच्या जगण्याला लगडून येणारा व्यवस्थेविरुध्दचा लढा प्रज्ञा दया पवार यांची कविता अत्यंत ताकदीने उभा करते.

बाईच्या जिवंत मेंदूतून
या सनातन लाडक्या प्रारुपाला
मी ओलांडते
.... कितीही निघोत फतवे....

(चैतन्यभूमीला साक्षी ठेवून, पृ. १०)

अशी निकराची भाषा त्या वापरतात. रुढिप्रिय संहितांना ओलांडून विचारनिष्ठ संहिता उभी करतात. कुरुंदवाड चे तरुण युवा कवी साहिल शेख यांची समाजसमानतेची तळमळ लक्षणीय आहे. असमानतेच्या पेचात

सापडलेला समाज त्यांना कमालीचा अस्वस्थ्य करतो. या समाजकल्लोळात माणसाची मानसिकताही कमालीची खालावलेली दिसते. आपल्या 'फॉर्मलेस' या कवितासंग्रहात ते म्हणतात.

एकूण काय?
साऱ्या क्षणांना फसवायचे, पचवायचे
निमित्त्य करुन घोट रिचवायचे!

(मित्रा, पृ. ३१)

स्त्रित्वाविषयीच्या तिरस्कारातून स्त्रीवर सत्ता गाजविण्याची समाजाची मानसिकता कवयित्री संध्या रंगारी समर्थपणे मांडतात. तडजोडीला फाटा देऊन अस्तित्त्वाचा लढा निकराने लढण्याची ताकद स्त्रियांना शब्दातून बहाल करतात. परकेपणाची आणि पोरकेपणाची जीवघेणी जाणीव हद्दपार करण्याची योजना आखतात.

स्वातंत्र्य, स्वातंत्र्य म्हणत
आपण भ्रमात दंग
जगण्याला किती, पारंपरिक रंग
बाई वाटली जाते कामात... माणसांत...
तुकड्या तुकड्यांत....
हेही खरं आहे ... बाई कुठे असते.
माणूस...?

(संध्यारंग, पृ. ४४)

हक्क मागताच .... विरोध करतांना स्त्रीला अजूनही यातना भोगाव्या लागतात हे कटूसत्य कवयित्री मांडते. दु:खाचे भांडवल करुन कवितेचे उदात्तीकरण करणे हाही एक फार्स मोठ्या प्रमाणात आधुनिक कवींमध्ये दिसून येतो. कवितेतून मानवी वैश्विक प्रतिनिधित्त्व बहाल करणारे जे मोजके कवी आहेत त्यात भगवान निळे हे महत्त्वाचे आधुनिक कवी होत.

'पण इथे तर
माणसाभोवती रेघोट्या मारुन
त्याच्या विस्तारत्यालाच ,
ठेवले जाते जखडून ....

(मनाचा कोंडवाडा, पृ. ९७)

अशी या समाजव्यवस्थेने केलेली माणसाची गोची ते मांडतात तर "आणि हो,.... विषमतेच्या या मायावी दुनियेत सर्वस्व गमावलेला तू एकटाच नाहीस याचं भान ठेव तुझ्यासारखे रणात झुंजणारे जखमी योध्दे आपापल्या परीने या अंधार युगाशी झुंजत असणार"

(आणि उड्डा, पृ. १२५)

अशी सार्वकालीक, सार्वजनिक दु:खाची जाणीव कवितेतून करुन देतात.

एकंदरीत आधुनिक कवींच्या कविता या बऱ्याचप्रमाण समाजवास्तवाची मूस सांभाळणाऱ्या, उपेक्षितांचे, दलितांचे, नाकारलेल्यांचे आणि विशेषत: स्त्रियांचे दु:ख सचोटीने मांडतांना दिसतात.

आधुनिक मराठी कवितेमध्ये उच्च:निच, श्रेष्ठ–कनिष्ठ अशा भेदांनी पोखरलेल्या समाजाचे प्रतिबिंबही अधिक ठळकपणे पडलेले दिसते. विकासाच्या, उन्नतीच्या वाटा मुक्त होण्याची धडपड ही कविता करते. सभोवतालचे सामाजिक, राजकीय, भाषिक, सांस्कृतिक व शैक्षणिक भानही यातून विस्तारीत करण्याचा प्रयत्न करते. एकूणच आधुनिक कवींच्या कविता या समाजवास्तवाचे भान जोपासणाऱ्या आहेत हे निर्विवाद!

## संदर्भग्रंथ सूची

१. येवले विनायक, मराठी साहित्याचे समकालीन संदर्भ, अक्षर वाङ्मय प्रकाशन पुणे,. २०१५.
२. डॉ. निशिकांत मिरजकर, काव्यबंध आणि मर्मवेध, आकांक्षा प्रकाशन, नागपूर.
३. निळे भगवान–सांगायलाच हवंय, असं नाही...., सृजन प्रकाशन– २०१५.
४. रंगारी संध्या, संध्यारंग, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. २००१
५. शेख साहिल–फार्मलेस– निशब्द प्रकाशन, मिरज २०१६

❖❖❖

# हिंदी में स्त्रीवादी साहित्य लेखन

प्रा. चौधरी ए. व्ही.
जी. के. जोशी (रात्रीचे)
वाणिज्य महाविद्यालय, लातूर
Mob.No.9765222225
choudharyanita20101989@gmail.com

स्त्री लेखन की अपनी दूनिया होती है। पुरुष लेखन के दूनिया से समांतर चलती है। आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष सतीप्रथा का कानुनी विरोध, जॉन स्टुअर्ट मिल का ब्रिटिश पार्लमेंट में स्त्री मतअधिकार का प्रस्ताव और ताराबाई शिंदे का स्त्री पुरुष तुलना एवं महादेवी वर्मा के श्रृंखला की कड़िया इन घटनाओं के परिणाम स्वरुप नारी विमर्श का चिंतन होने लगा जिसका प्रभाव बीसवीं शताब्दी के आठवे दशक के उपन्यास पर होने लगा। जैसे – इसी दशक में मन्नु भंडारी का आपका बंटी, कृष्णा सोबती का सुरजमुखी अंधेरे में, इसके पहले रुकोगी नही राधिका प्रकाशित हुआ। यह नारी विमर्श के प्रारंभिक दौर के प्रस्तुत उपन्यास हैं।

मन्नु भंडारी ने अपने कथा साहित्य में नारी जीवन की समस्याओं को अंकित किया है। 'आपका बंटी' उपन्यास १९७१ में प्रकाशित हुआ। इस देश में जब स्त्री पहलीबार शिक्षित होकर आत्मनिर्भर हो रही थी। इसी दौरान शिक्षित पती–पत्नी ने अपने अपने अंहम की टकराहट होना स्वभाविक सा हुआ। प्रस्तुत उपन्यास में टकराहट का फल शकुन और अजय तलाख लेते है। किंतु दोनों पती–पत्नी के बीच बंटी बुरी तरह से पिसता रहता है। इसमें शकुन तीन स्थल पर जीती है। मॉ, स्त्री तथा अपनी जिदंगी। इन सभी का टकराहट 'आपका बंटी उपन्यास' में है।

कृष्णा सोबती एक सशक्त उपन्यासकार के रुप में पहचानी जाती है। उनका 'जिदंगीनामा' 'दिलोदानिश' में जहॉ एक ओर  गॉव चित्रित है तो दुसरी ओर सुरजमुखी अंधेरे की उपन्यासों में स्त्री विमर्श प्रखरता से दृष्टीगोचर होता है। जिंदगीनामा उपन्यास में पजांब का गॉव चित्रात्मक रुप में व्यक्त हुआ है। डर से बिछुडी, मित्रो मरजानी, सुरजमुखी अंधेरे की तीनों उपन्यास आकार की दृष्टीसे लघु है लेकिन तीनों उपन्यास में यौवन समस्या की अभिव्यक्ती अंकित है। इसमें तन की प्यास का अतिरेकवादी उत्साह मन की भूमिका को नगन्य ठहरा देता है। अर्थात लेखिका स्त्री विमर्श को जैविक रुपमें स्वीकारती है।

उषा प्रियवंदा के उपन्यास में स्त्री के भीतर का अकेलापण व्यक्त हुआ है। उषा प्रियवंदा अधिकतर अमरिका में रहनेसे उनके व्यक्तित्व पर, लेखनी पर पाश्चात्य प्रभाव दृष्टीगोचर होता हैं। 'रुकोगी नही राधिका' उपन्यास में स्त्री भारतीय एवं अमरिकी मूल्यों के भीतर एक टकराहट है जिसमें भारतीय स्त्री मछली की भॉती तडपती है। मुल्यों के नाम पर राधिका प्रेमसंबंध को काटती है किंतू उनके मन मे दुसरे ही क्षण में उस प्रेम को जोडने की कशीश की कोशीश अंकित है। वह इस दूविधाग्रस्त मानसिकता में विवाह भी नही कर पाती है।

मृदुला गर्ग के उपन्यास साहित्य जैसे पाश्चात्य यौवनाचार अभिलेख लगता है। पश्चिमी स्त्रीवादी चेतना से स्त्री मुक्ति का मुद्दा उठाया है। उन्होंने जैनेन्द्र का फार्म्यूला लिया है। जैसे. जिससें प्रेम करो उससे विवाह मत करो। इस फार्म्युले को स्त्री मुक्ति के साथ जोड़ा है। इनके तीन उपन्यास है उनके हिस्से की धुप, चितकोवरा, मैं और मैं। इन उपन्यासों में विवाहेत्तर संबंध अंकित है। उसके हिस्से की धुप की मनिषा दो विवाह करती है फिर भी पराये पुरुषों से संबंध रखती है। चितकोवरा उपन्यास की मनु मॉ–बाप, नैतिकता–अनैतिकता, अडोस–पडोस से मुक्त है।

नासिरा शर्मा अपने उपन्यासो में पहलीबार मुस्लिम स्त्री को प्रतिबिंबित किया है। जिंदा मोहावरे उपन्यास में प्रमुख विषय भारत विभाजन है। किंतु 'ठिकरे की मॅगनी' उपन्यास में मुस्लिम स्त्री की मुक्ति की चाह है। नासिरा शर्मा धर्म से बंदिस्त स्त्री को विद्रोही तेवर के साथ व्यक्त करती है।

जया जादवानी तत्वमशि उपन्यास प्रेमकी विसंगत–संगत है। प्रस्तूत उपन्यास तीन भागों में बॅटा हैं। पहाड, जंगल और नदी। इस उपन्यास में स्त्री पुरुष संबंधो को देखना और समझना यही मुलसंवदना है।

प्रभा खेतान की पीली अंधी, छनमरजा आवो बेबे  घर चले, तालाबंदी अदि उपन्यास में तीन–तीन पीढी की औरमों का संघर्ष उल्लेखित है। प्रभा खेतान मारवाड़ी समाज की है। वह पुराने पीढ़ी के स्त्री के बारे में कहती हैं।  ''उनके यहॉ पुरानी औरत खुद अपने हाथों से अपना सीर काटनेवाली औरत होती है। प्रभा कहती

है, स्त्री को हमेशा सेठानी राज से दूर रहना चाहिए। न दोस्ती न दुश्मनी। राज किसी का कभी नही हो करता। इस उपन्यास में कहा है, स्त्री–पुरुष संबंध में चिख सबको जींदा रखती है वह प्रेम की चिख से परेशान है।

स्त्रीवादी साहित्य लेखन में कहानी साहित्य में भी हुआ है। अर्थात कथा साहित्य में हुआ है। मन्नु भंडारी, मालती जोशी शिवानी, उषा प्रियवंदा आदी प्रारंभिक दौर की महिला, कहानीकार है। मन्नु भंडारी अपनी कहानी के जरीए स्त्री के दर्द की समस्याओं को सुक्ष्मता से जानने का प्रयास करती है। उन्होंने स्त्री के मुकवेदना की वाणी दी है। किंतू नारी विमर्श के जो मुख्य तेवर दिखाई देते है उसप्रकार की नारीवादी कहानियॉ लिखी किंतू नारी के विभिन्न पहलुओ को समझने का सफल प्रयास किया है।

मालती जोशी की स्वयंवर, स्नेहबंध, पहलीबार, कोहरे के पार, बकुला फिर आना आदि कहानीयों मे सबसे प्रसिध्द कहानी 'ढ़ाई अखर प्रेमके' कहानी हैं। नारी मन की तहतक उतरती लेखिका ने पारिवारीक जीवन में व्याप्त विभिन्न समस्याओं को सहजता से प्रस्तुत किया है। उनके कहानी की सबसे बड़ी खासियत पात्रों के स्वभाव की सहजता परिवार, स्त्री, प्रेम इन तीन विषयों पर मालती जोशी ने अधिक लेखन किया हैं।

मेहरुन्निसा परवेज के कहानियों में ऑचलिक परिवेश का चित्र मिलता है। मध्यमवर्गीय स्त्री का दर्द तथा मुस्लिम समाज की स्त्री के भी चित्रित किया हैं। सिर्फ एक आदमी, चमड़े का पाके, अपने होने का एहसास, उसका घर, विद्रोह, जाने कब, अकेला गुलमोहर आदी इनकी कहानियॉ प्रसिध्द है। उनके कहानियों की भाषा उर्दु मिश्रीत है। सर्वे शब्दों में अभिव्यक्ति कौशल्य तथा वर्णनात्मक तो कहीं–कहीं आत्मकथात्मक शैली मिलती हैं।

मृणाल पांडे शिवानी की बेटी है। हिन्दी कहानियों में उनका अलग महत्व है। मुन्नु चाकी अजब कहानी जो १९९२ में धर्मयुग पत्रिका से प्रकाशित हुआ। साथ ही इस कहानी में मन्नुचा पात्र विदेश जाता है। वहॉ पत्नीका स्वर्गवास होता है। उस समय के क्रिया कर्म को कहानी में चित्रित किया है। कगार की कहानी दाम्पत्य जीवन में अनमोल होने से इस कदर जीवन बोझासा लगता है। उसी के कहानी में चित्रित किया है। मृणाल पांडे की भाषा में पाठक को पकडकर रखने की बक्यूबी दिखाई देती है।

कुसुम अंसल Bold प्रकार की कहानियॉ लिखती है। Speed Breaker कहानी में Sex को जैविक रूपमें माना है। यादो के सहयात्री कहानी मे अलिगढ का परिवेश चित्रित है। इस कहानी में प्रेम को चित्रित करते समय लेखिका कहती है – प्रेम ऐसा गुण है जो झुकता है और बदले में कुछ नही चाहता। महात्रे मकान कहानी में विधवा नारी चित्रित है। उनकी कहानियों में हिन्दू, मुसलमान के बीच सांप्रदायिकता चित्रित है।

मंजुला भगत नई पिढी की लेखिका है। नये पीढी के लोग भौतिक सुखोको अपनाते हुए आत्मकेंद्रीत बनते जा रहे है। बावन पत्ते और एक जोकर तथा डेडलाईन कहानियॉ अधिक प्रसिदध है।

स्त्रीवादी कवितामें आत्मगरिमा, आत्मसमर्पण का स्वर प्रधानता से है। स्त्रीवादी कविता बौदिधक और सामाजिक चेतना का प्रतिबिंब है। वैसे स्त्रीवादी कविता १९७० के बाद प्रकाशित होने लगे जिसमें 'स्व' की पहचान, मुक्तिकी चाह, मिथक तोड़ने की चाह, स्त्री परंपरागत परीवार का पिंजरे को तोडती है। स्त्री कविता के केंद्र में है।

सोने के पिंजरे में बंदिस्त स्त्री की व्यथा – परीवार एक गुलामी का पिंजरा जैसा है ऐसा नारीवादी स्त्रीको लगता है। जिसमें पुरूष हर समय दावपेच खेलता है। अपने ही सपनो को तबदिल करनेवाली लड़की एक कवयत्री कहती है –

'' एक आरशे बाद देखती है
सपनो की गुनगुनाहट में
तल्लीन लडकी का तबदील होना
उचाट गृहस्थी के दावपेच है
बेतरह उलझे।''

हर बार नया सूत्राधार पर प्रश्नचिन्ह पुरूषवादी मनोवृत्ती के कारण स्त्री कटपुतली जैसे हुई है। केवल सुत्रधार बदलते है कभी बाप, कभी भाई तो कभी पति का शिकार हुई है। केवल चेहरे में बदलाव होता है भूमिका तो सबकी समान है। शशी सहगल कहती है–

''ससुराल की दहलीज पर कभी
तेरा पिता खडा था
वहॉ तुम खडे हो

और वही खडा होगा तुम्हारा दामाद
सोचती हुँ मैं, क्या फर्क पडता है
पीढ़ीयो के बदलने से।''

स्त्रीको अधीन रहना ही पुरूषो की मानसिकता है। वह आकसीयम कुत्ते की तरह अपने ही अहंम की तुष्टी करता है। रमनीय गुप्ता कहती है — क्या कभी बरगत के नीचे के का छोटा पौधा बरगत से क्या बडा होगा?

''बरगत के नीचे
हम छोटे छोटे पौधे
पैदा होते ही मर जाते है
हमारे सुरक्षा का ढ़ोंग रचता''

द्वंद्व और समझौता से नकार वर्तमान स्त्री को समर्पण के बदले में अपना सबकुछ खो बैठना सही नही लगता है। इस कारण उसके भीतर द्वंद्व नही समझौता नही और नही अपराध बोधा रमनियका गुप्त कहती है। में सूरत नही या मुर्ति नही। मैं तो मुर्त हूॅ। कवयत्री के शब्दो में —

''तुम्हारे मोड में उतरती चढती
देवी और कुल्टा बनती
एक बेजान लौंदा
प्रानहीन तस्वीर बनकर
नही रह सकती
मैं स्वयं मुर्त हूॅ — मुरत नही हूॅ।''

प्रेम खेलने की चीज नही है स्व:की पहचान है— जैसे भारतीय समाज में ऐसा व्यवहार किया जाता है। वैसे प्रेम और विश्वास पर ही घर निर्भर होता है। प्रेम स्त्री के जीवन का सबकुछ होता है।

वह पुरुष के जीवन का एक भाग होता है, बल्की प्रेम खेलने की चीज नही हैं। शकुंतला माथुर के शब्दों मे—

''प्रेम शब्द और उसके समस्त अर्थीको
मैने अस्वीकार कर दिया हैं।''

मुक्त हवा की चाह — अपने समाज में और परिवार में दोनो जगह स्त्री असुरक्षित सी महसुस करती है अब वह ऐसी जगह सॉस लेना चाहती है जहॉ मुक्त हवा हैं। कात्यायनी के शब्दों में —

'' इस जन्य अरण्य से दुर
मुझे उन फसलो तक जाने दो
अपने यौवन का अमृत्व प्रदान
करने कटने के लिए।''

इसप्रकार हिंदी में स्त्रीवादी साहित्य लेखन किया गया है। उपन्यास, कहानी तथा काव्यों में स्त्री का रुप, दर्जा, स्थान किसप्रकार है यह बताने का प्रयास भी इन लेखिकाओंने अपने अपने साहित्यों में किया हैं। स्त्री के प्रती विचारों को नमुद किया गया है।

❖❖❖

# मुक्तिबोध की विश्वदृष्टि

प्रा. नयन भादुले—राजमाने
जी. के. जोशी (रात्रीचे)
वाणिज्य महाविद्यालय, लातूर
Mob.No.8805426071
bhadulenayan13@gmail.com

''साहित्य में प्रकट भावदृष्टि उस ज्ञानधारा या विचारधारा से अनुप्राणित और अनुशासित होती है कि जिस धारा को हम उस लेखक की विश्वदृष्टि कह सकते है।'' इसप्रकार मुक्तिबोध 'आधुनिक कविता की दार्शनिक पार्श्वभूमि' शीर्षक लेख में व्यक्त होते हैं। इस तरह वे विचारधारा और विश्वदृष्टि को एक—दूसरे का पर्याय मानते थे। उनकी दृष्टि में कवि की विश्वदृष्टि उसकी विचारधारा पर आधारित नहीं होती, बल्कि उसकी भावदृष्टि, उसकी विश्वदृष्टि पर आधारित होती हैं।

मुक्तिबोध ने विचारधारा अथवा विश्वदृष्टि की विकास प्रक्रिया को द्वंद्वात्मक माना है। यही उनके चिंतन की विशेषता है। प्रत्येक युग में कुछ ऐसे बुनियादी तथ्य होते हैं, जो न केवल हमारे निजी जीवन पर गहरा असर डालते हैं, बल्कि देश के वर्तमान और भविष्य का भी निर्माण करते हैं। मुक्तिबोध का कहना है कि आज बहुत—से कवियों के अंत:करण में जो बेचैनी, ग्लानि, अवसाद और विरक्ति के भाव हैं, उसका एक कारण उनपें एक ऐसी विश्वदृष्टि का अभाव है, जो उन्हें आत्मिक शक्ति प्रदान कर उनकी अगतिकता को दूर कर सके। कवियों में विश्वदृष्टि के अभाव को उन्होंने उनके और साहित्य के लिए नहीं, देश के लिए भी 'हनिप्रद' बतलाया है। यहॉ उनकी विश्वदृष्टि को विकसित करनेवाली बात विशेष रुप से ध्यान देने योग्य है।

'रचनाकार का मानवतावद' शीर्षक निबंध में मुक्तिबोध ने विश्वदृष्टि अथवा अनुभवात्मक ज्ञान—व्यवस्था के लिए 'जीवन—ज्ञान—व्यवस्था' शब्द का प्रयोग किया है और उसके संबंध में कोई महत्त्व की बातें कही हैं। सबसे पहले वे उसका संबंध लेखक के वर्ग से जोडते हैं। चूंकि लेखक की वास्तविक जीवन—प्रणाली एक विशेष वर्ग से ही संबद्ध होती है, इसलिए उस वर्ग में प्रचलित सामान्य भाव—धारा भी उसके विकास में योग देती है। परिणामत: उस मूल्य—भावना तथा दृष्टि के विकास में जितना अपना हाथ होता है, उतना ही पारिवारिक तथा वर्गीय क्षेत्रों का भी। एक ओर लेखक स्वयं जीवन—जगत की व्याख्या चाहता है, तो दूसरी ओर साहित्य—क्षेत्र में विभिन्न प्रकार की विचारधाराएँ और दर्शन जीवन —जगत की व्याख्या को लेकर उपस्थित रहते हैं।

इस प्रकार लेखक के अंत:करण में उपस्थित संवेदनात्मक —अनुभवात्मक जीवन—ज्ञान—व्यवस्था के साथ जीवन—जगत की दार्शनिक व्याख्या का समन्वय हो जाता है, और वह दार्शनिक धारा लेखक को 'आत्म—विस्तार' के रूप में दिखाई देती है। उन्होंने ऐसा भी कहा है कि यह आवश्यक नहीं है कि लेखक जिस जीवन—ज्ञान—व्यवस्था को लेकर चलता है, उसमें कोई विकास न हो अथवा वह जिस दार्शनिक धारा को लेकर चलता है, उसमें वह अपनी ओर से कोई नवीन तत्त्व न जोड़े। इसके विपरित यह स्वयं तो अपने आपको उस दार्शनिक धारा से परिपृष्ट करता ही है, दार्शनिक धारा की भी वह अपकी विशेष दृष्टि से व्याख्या करता हुआ उनमें नवीन अर्थ भर देता है। मुक्तिबोध की विश्वदृष्टि मार्क्सवादी होते हुए भी इतनी आत्मीय और सृजनात्मक क्यों है? उन्होंने उसे अपने भीतर अपने अनुभवों और ज्ञान के साथ—साथ असंदिग्ध रूप से मार्क्सवाद में भी नवीन अर्थ भर दिया था।

यहॉ मुक्तिबोध के दो पत्रों का हवला देना जरुरी है। ३० अक्तूबर, १९४५ को उन्होंने नेमिचंद्र जैन को लिखा था:, ''आपने एक व्यक्ति के साथ नाजुक खेल खेला है। उसे कम्युनिस्ट बनाया, दुर्धर्ष घृणा के उत्ताप से पीड़ित।'' उसके थोड़े ही दिनों बाद नेमिजी में ही जब उन्हें मार्क्सवाद को लेकर संदेह के लक्षण दिखाई पड़े, उन्होंने ७ नवंबर, १९४५ के पत्र में उन्हें लिखा कि, ''हमें कम से कम कुछ बुनियादी सिध्दांतो के बारे में निराशावादी नहीं होना चाहिए और हमें निश्चय ही अपने काम से अपने अंतिम लक्ष्य और विजय में ऐसा विश्वास आरोपित करना चाहिए, जिसमें किसी प्रकार के संशोधन की आवश्यकता न हो।'' उन्होंने यह भी लिखा है कि, ''प्राथमिक बुनियादी सिध्दांतों को लेकर मैं कभी आपको भ्रम का शिकार न होने दूँगा।'' 'बुनियादी सिध्दांतो से यहॉ मतलब मार्क्सवाद के बुनियादी सिध्दांतों से हैं। उनमें मुक्तिबोध की आस्था हमेशा अडिग रही। ''जिस भी क्षेत्र में मै हूँ, वह स्वंय अपूर्ण है और उसका ठीक—ठीक प्रकटीकरण भी नहीं हो रहा है'' इसका

संबंध मार्क्सवाद से है, जो इस बात का सूचक है कि उन्होंने न तो मार्क्सवाद को पूर्ण ज्ञान के रूपमें ग्रहण किया था, न वे उसके कार्यान्वयन को बिलकुल ठीक मानते थे। मार्क्सवाद उनके लिए विकासमान ज्ञान था और आज यह बात ज्यादा स्पष्ट है कि स्तालिन–युग में उसका ठीक–ठीक प्रकटीकरण भी नहीं हो रहा था। जहॉं तक उनके अपने असंतोष और अशांति की बात है, उस पर उनके जिस पत्र का पहले हवाला दिया गया है उसी का यह वाक्य प्रर्याप्त प्रकाश डालता है: 'मैं एक अशांत आत्मा लेकर पैदा हुआ हूँ – अशांत, अपने युग की सर्वोच्च आकांक्षाओं और अपने समय की सबसे बड़ी कमजोरियों की वजह से।'' युग की सर्वोच्च आकांक्षाएं–शोषणमुक्त समाज की रचना के स्वप्न, और समय की सबसे बड़ी कमजोरियॉं–व्यक्तिवादी समाज के दुर्गुण। मुक्तिबोध में यदी इन दोनों के बीच संघर्ष की स्थिती है, तो यह उनके मार्क्सवाद की कमजोरी नहीं, शहजोरी है, उसे अधिकाधिक प्रामाणिक और जीवंत बनानेवाली वस्तु। उसे उन्होंने द्वंद्वात्मक विधी से ग्रहण किया था, बने–बनाए रुप में उसे स्वीकार नहीं कर लिया था। उन्हीं के शब्दों में कहें तो उसने उनका सिर्फ ज्ञान–विस्तार नहीं, बल्कि 'आत्म–विस्तार' किया था।

'कामयानी' की आलोचना के प्रसंग में उन्होंने लिखा है कि वास्तविक जीवन की समस्याएँ सामने आती हैं, तो भाववादी दर्शन काम नहीं देता, न पाश्चात्य, न पौर्वात्य। पूंजीवादी युग वैचारिक अराजकता युग होता है। चूंकि इस युग में पनपनेवाले दर्शनों का व्यवहार से अनिवार्य संबंध नहीं होता, इसलिए उनमें अंतर्विरोध और असंगतियों का होना आम बात होती है। मुक्तिबोध की मान्यता यह थी कि भाववादी दर्शन हृदय के घाव भर सकता है, पर समाज की खाइयां नहीं पाट सकता। वह तब तक संभव नहीं है, जब तक कि दर्शन बाह्य जीवन–जगत से निकला हुआ, यानी भौतिकवादी न हो। स्वभावत: उन्होंने हर प्रकार के भाववादी दर्शन का खंडन किया और अपने लेखों और कविताओं से भौतिकवादी दर्शन के द्वंद्वात्मक रूप की स्थापना करने का प्रयास किया।

'कामयानी' की विश्वदृष्टि की आलोचना मुक्तिबोध की अपनी विश्वदृष्टि का इजहार है। उन्होंने स्पष्ट शब्दों में कहा है कि ज्ञान, क्रिया और इच्छा के सामंजस्य का प्रश्न व्यावाहरिक जगत और मानव–मन दोनों का प्रश्न है, जिसे रहस्यवादी ढंग से हल नहीं किया जा सकता वह केवल बुध्दिजीवियों, कवियों, दार्शनिकों और सांस्कृतिक जनों का प्रश्न नहीं है, वह मनुष्य–मात्र का प्रश्न है। उसका संबंध मनुष्य के व्यक्तित्व के आंतरिक संगठन तथा व्यावहारिक जगत के संगठन से है, जो कि सामाजिक, राजनीतिक और मानवीय संघर्ष में संपूर्ण योग के बिना असंभव है।

'कामायनी' में अभिव्यक्त 'प्रसाद' की विश्वदृष्टि अद्वैतवाद का ही एक नया संस्करण है। ''उत्तरप्रदेश के मध्यवर्ग सांस्कृतिक चेतना के वह अनुकूल ही था, इसलिए कि वह मध्यवर्ग स्वयं सामंती सांस्कृतिक छायाओं में ग्रस्त रहा– यदयापि अखिल भारतीय पैमाने पर पूंजीवाद का ही विस्तार हो रहा था।'' इसी आलोचना में 'प्रसाद' का वर्ग–चरित्र निर्धारित करने के क्रम में मुक्तिबोध ने यह सामान्यीकरण प्रस्तुत किया है कि चरित्र अंतर और बाह्य के परस्पर संघर्ष से, इच्छा की पूर्ति के, और बाह्य से सामंजस्य की स्थापना के, द्विविध और द्वंद्वात्मक किंतु एकीभूत प्रयत्नों की प्रक्रिया में, निर्मित और विकसित होता है।

गांधीवाद बीसवीं शताब्दी के भारत का प्रमुख भाववादी दर्शन है। उन्होंने इस पुस्तक में अनेक स्थलों पर इस दर्शन पर प्रहार किए हैं। एक स्थल पर इसी दर्शन की ओर संकेत करते हुऐ वे कहते है: ''यह बात अब स्पष्ट हो जानी चाहिए कि समाज के दुख–दैन्य–कष्ट को मात्र दया–माया–ममता से नहीं, वरन वैज्ञानिक–सामाजिक उपायों से दूर किया जाता है, आध्यात्मिक धरातल पर उन्हें मिटाया नहीं जा सकता, शोषक का हृदय–परिवर्तन नहीं किया जा सकता। व्यक्तिवाद, दार्शनिक क्षेत्र में आत्मा को प्रधानता देकर भाववादी तरीके से संसार की ओर देखता तथा उसकी व्याख्या करता है। इसलिए वह किसी भी मूलभूत सामाजिक समस्या का सदा–सर्वदा के लिए निराकरण नहीं कर पाता।''

इस कविता में मुक्तिबोध ने ईश्वरवाद पर मानववाद की स्थापना की है, जो उनकी इन मार्मिक पंक्तियों में प्रत्यक्ष है:

सई सांझ
कदंब वृक्ष पास
मंदिर–चबूतरे पर बैठकर
जब कभी देखता हूँ तुझको
मुझे याद आते हैं

भयभीत आंखों के हंस
व घावभरे कबूतर
मुझे याद आते हैं मेरे लोग
उनके सब हृदय–रोग
घुप्प अंधेरे घर,
पीली–पीली चिंता के अंगारों–जैसे पर ....

उन्हें यह भौतिकवादी विश्वदृष्टि, यह समाजवादी मानवतावाद, यह ''आग्नि विवेक की'' कहाँ मिली?

अंततः हम कह सकते है कि मुक्तिबोध ने विश्वदृष्टि केवल पुस्तकों से नहीं प्राप्त की थी, उसमें उनके जीवनानुभव और जीवन–चिंतन का बहुत ज्यादा हाथ था। जो व्यक्ति अपनी विश्वदृष्टि जिदंगी के कठ़िन अनुभवों से प्राप्त करेगा, वही मानवीय संवेदनाओं से पूर्ण और संकल्प की दृढता से युक्त होगा। उसे वाकई ईश्वर–जैसी किसी चीज की जरुरत न होगी।

## संदर्भ :


- नई कविता और अस्तित्वाद – डॉ. रामविलास शर्मा
- मुक्तिबोधः ज्ञान और संवेदना – डॉ. नंदकिशोर नवल.
- कामायनी एक पुनर्विचार – मुक्तिबोध


❖❖❖

# तिसऱ्या सहस्रकाची कविता: आस्वाद आणि आकलन

## (दशरथ मडावी, सुदाम सोनुले, प्रसेनजीत गायकवाड आणि हेमंतकुमार कांबळे यांच्या संदर्भात)

डॉ.सिध्दार्थ भगत
सहयोगी प्राध्यापक
कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव
ईमेल– nisin7123@rediffmail.com, मो.नं.९८२२७१२३८०

मराठीमध्ये भिन्न भिन्न प्रकृतीधर्माची कविता लिहिली गेली आहे. लिहिली जात आहे. आंबेडकरी, ग्रामीण, आदिवासी आणि इतर अनेक प्रवृत्ती आणि प्रवाहांनी मराठी कवितेचे दालन समृद्ध केले आहे. प्रस्तुतच्या शोधनिबंधातून दशरथ मडावी, प्रसेनजीत गायकवाड, हेमंतकुमार कांबळे आणि सुदाम सोनुले या चार कवींच्या कवितांचा विचार करायचा आहे.

### दशरथ मडावी/टाहरा (२०११)

दशरथ मडावी हे आदिवासी साहित्य चळवळीतील एक अग्रगण्य नाव. 'टाहरा' हा त्यांचा काव्यसंग्रह २०११ मध्ये प्रकाशित झालेला आहे. आगामी काव्यसंग्रह 'लढे उजेडाचे' प्रकाशनाच्या वाटेवर आहे. 'महानायक बिरसा', 'थ्री नॉट थ्री', 'संवाद एक मातीशी', 'माझेही ऐका हो', 'अंतर्मनाची साद' अशा नाट्यकृतींचे लेखन त्यांनी केलेले आहे. नाट्यकृतीही लवकरच प्रकाशित होतील अशी आशा आहे. आदिवासी साहित्य चळवळ आणि आदिवासींची राजकीय चळवळ हे दोन्ही अत्यंत जिव्हाळयाचे विषय मानणारा हा कवी आपल्या कवितेमधून–

'आमचीही संमेलने होतात
त्यांचीही संमेलने होतात
त्यांच्या संमेलनात गुलाबासारख्या
लाल चुटुक ओठांची चर्चा होते...
आमच्या संमेलनात पाठीला लागलेल्या
रिकाम्या पोटाची चर्चा होते' [१]

असा अभिव्यक्त होतो, तेव्हा सामाजिक विषमतेने बरबटलेल्या आपल्या देशाचे एक चित्र मानसपटलावर अंकित होते. ही विषमता समाजाच्या सर्वच स्तरामधून प्रत्ययाला येते. शिक्षण, आरोग्य, उद्योग, नोकरी यांमध्ये तर ती आहेच. परंतु साहित्य संमेलना सारख्या मानवी मने समृद्ध करणाऱ्या प्रांतातही भेदाभेद पाळला जावा, ही बाबच अत्यंत निंदनीय आहे.

महाराष्ट्रात अनेक साहित्य संमेलने होतात. अ.भा.मराठी साहित्य संमेलन हे सर्वसमावेशक असावे अशी अपेक्षा होती. परंतु तेथे केवळ पारंपरिक पद्धतीने विचार करण्याच्या तथाकथित साहित्यिकांचा पगडा असल्याने, दलित, आदिवासी, ग्रामीण, शेतकरी, कामगार इ. साहित्य संमेलने उदयास आली. आणि मराठी साहित्य जगताला त्यांनी आपली दखल घेण्यास भाग पाडले. हे या वाङ्‌मयीन चळवळींचे मोठेच यश आहे. प्रस्थापित मराठी साहित्य आणि आदिवासी अथवा इतर साहित्य यांत मूलभूत काय फरक आहे तो कवीने अत्यंत मार्मिक पद्धतीने व्यक्त केला आहे. यादृष्टीने 'सोडचिठ्ठी' ही सबंध कविताच अभ्यासनीय आहे.

आदिवासी संस्कृती ही मुळातच वेगळी आहे. तिचा हिंदू संस्कृतीशी काहीएक संबंध नाही. परंतु हिंदू संस्कृतीने आदिवासी संस्कृतीवर केलेले आक्रमण, आणि त्यामुळे इतिहासाकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन कवी आपल्या निदर्शनास आणून देतो. होळी, गुढीपौर्णिमा, दसरा, दिवाळी हे सण मूळ आदिवासी संस्कृतीत नव्हते. ते हिंदू संस्कृतीने आदिवासींवर लादले. सांस्कृतिक संक्रमणाच्या या प्रक्रियेत आदिवासी आपली प्रेरणास्थानेच हरवून बसला, ही बाब कवीला प्रचंड अस्वस्थ करणारी वाटते.

'हे सण म्हणजे
त्यांच्या विजयाचा उत्सव
उन्मादाचा महोत्सव...!
तुझा पराभव म्हणजे त्यांचा विजय
त्यांचा विजय म्हणजे तुझा पराभव
एवढे साधे आणि स्पष्ट समीकरण आहे...

तुला कळत नाही काय...?
त्यांचे साडेतीन मुहूर्त म्हणजे
तुझ्या पराभवाच्या नोंदी आहेत...!' [२]

असे सडेतोडपणे कवी प्रतिपादन करतो. हे प्रतिपादन करण्याची ताकद कुठून आली असेल? आदिवासी तर वर्षानुवर्षे नागवलेला, पीडलेला, गरीब, निरुपद्रवी! आपली प्रेरणास्थाने कोणती याचा शोध तो घेतो आणि त्यांनी सांगितलेला मार्ग अवलंबितो. प्रकर्षाने एक नाव त्याच्या डोळयासमोर येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर! त्यांना अभिवादन करण्याची पद्धतीही आगळीच.

'अंधारलेल्या वस्तीत...
तू सूर्य बनून आलास...
आणि सारी वस्तीच प्रकाशमान झाली...
तेव्हा... परंपरागत अंधाराच्या...
समर्थकांची धरती...
शेषाच्या मस्तकावरून सरकू लागली...! [३]

नेमके काय घडले असावे याचा अंदाज बांधणे कठीण नाही. गुलामीचे बंध खळाखळा तुटून पडले. अंधार याचा संपून उजेडवाटा प्रकाशमान झाल्या, तेव्हा सनातन संस्कृतीचे पाईक हादरून गेले. पुन्हा कशाप्रकारे छलकपट, कारस्थाने करून आपला कोसळता डोलारा कसा सावरता येईल यावर त्यांचा खल सुरू झाला.

आदिम वंशातील हा कवी परिवर्तनाची लढाई लढायला कायमच सज्ज असल्याचा प्रत्यय 'टाहरा' या काव्यसंग्रहातून येतो.

## सुदाम सोनुले/सूर्यफूल आणि काळोख (२०१०)

सूर्यफूल आणि काळोख हा काव्यसंग्रह २००२ ला प्रकाशित झाला. २०१० मध्ये या काव्यसंग्रहाची दुसरी आवृत्ती निघाली. कवी सुदाम सोनुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणित समता सैनिक दलाचे पदाधिकारी आहेत. कवी आणि कार्यकर्ता अशी त्यांची तारेवरची सतत कसरत सुरू असते. एकदा कविता लेखन नाही जमले/झाले तरी चालेल परंतु स्वत:तील कार्यकर्त्यावर कोणत्याही प्रकारे अन्याय होऊ नये याची कायमच दक्षता घेत असलेला हा कवी गझल देखील तेवढयाच ताकदीने लिहितो. अन्याय अत्याचाराच्या विरोधात बंड करून उठणे हा कवीचा पिंड असला तरी समोर आलेल्या प्रतिकूल परिस्थितीचा व्यूह कसा भेदायचा याचे चिंतनही हा कवी करताना दिसतो. भीषण, भेसूर अशा समाजवास्तवात आपले अस्तित्व अधोरेखित करता करता इतरांनाही या प्रवाहात सामील करून घेण्याची उदारता आंबेडकरी कार्यकर्त्यात असतेच. कवी त्याला अपवाद नाही.

जीवनाच्या सर्वच आघाड्यांवर झालेले/होत असलेले पराभव पचविणे सोपे नसते. प्रश्न फक्त पराभव पचविण्याचाच नाही तर घटितामधून आपल्या उज्ज्वल आयुष्याच्या मंगलकामना जोपासत असतानाच ताठ मानेने पुन्हा उठून उभे राहण्याचा आहे. कवी या कसोटीला पुरेपूर उतरतो.

'आतापावेतो इथल्या
निर्जन रस्त्यावरील निष्पर्ण झाडांना
समता स्वातंत्र्याची हिरवी पालवी कधी
फुटलीच नाही रे!' [४]

हे निरीक्षण नोंदवून कवी नुसताच थांबत नाही. त्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या असे लक्षात येते की, स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झाली तरी सामान्य माणूस काल तिथे होता तिथेच आहे. त्याच्या कोणत्याही आशा, आकांक्षा, अपेक्षांची पूर्तता झालेली नाही. व्यवस्थेच्या दमनचक्रातून त्याची सुटका झालेली नाही. स्वतंत्र, सार्वभौम लोकशाही राष्ट्राचे पाईक म्हणवून घेणे वेगळे आणि लोकशाहीच्या मार्गाने मार्गक्रमण करणे वेगळे. सत्ताधाऱ्यांच्या कथनी आणि करणी यांमध्ये जमीन अस्मानचा फरक असल्याचे कवीला जाणवते. म्हणूनच तो सावधानतेचा असा इशारा देतो –

'उजेडाचे शहर तुमचे
त्यांच्या संगिनीच्या टोकावर' [५]

अंधारवाटा तुडवून, प्रयत्नांची पराकाष्ठा करून, जाणीवपूर्वक वसवलेले उजेडाचे शहर कायम प्रकाशमान राहीलच याची शाश्वती नाही. आपण कधी बेचिराख होऊ याचा भरवसा नाही. त्यामुळे डोळयात तेल घालून आपण आपले पहारे कायम जागते ठेवले पाहिजेत.

स्वतंत्र भारताच्या इतिहासात शेतकरी, कामगार, मजूर, दलित, आदिवासी, भटके हे कायम उपेक्षित राहिलेले आहेत. मात्र या सर्वांपेक्षा अधिक उपेक्षा कोणाच्या वाट्याला आली असेल तर स्त्रीच्या. ती कायम उपेक्षित राहिली आहे. समाजघटकाच्या कोणत्याही वर्गातील, जातीतील अथवा धर्मातील स्त्री असो, तिचे जीवन अंधाराच्या दाट पडद्याने झाकोळले गेले आहे. तिच्या भावना, तिच्या इच्छा, तिच्या आकांक्षा याचा विचारच केला जात नाही. मुलगी, बहीण, पत्नी, माता या नात्यांनी ती जखडली गेली आहे. मात्र या सर्वांपेक्षा कशाचे अधिक ओझे तिला वहावे लागत असेल तर ते स्त्रीपणाचे! एकिकडे देवता/देवी म्हणून तिचे पूजन करायचे, माता म्हणून तिचा गौरव करायचा आणि मुलगी जन्माला येऊ नये म्हणून गर्भातच तिची हत्या करायची. अशा मानसिकतेचा हा काळ आहे.

'ती बंदिस्त होती
उपाशी आतड्यांच्या कुशीत
जर्जर आयुष्याला किंचाळून सांगत होती
दरेक दिवसाचा अमानुष संदर्भ...
रिकाम्या उतरंड्या, मिणमिणता दिवा
भुकेच्या जखमांवर कुठली दवा?
अंधुक प्रकाश, कवेत बाळ
क्षणोक्षणी जोजवते वेदनांचे एकेक बाळ' [६]

आजही स्त्रीच्या आयुष्याला असलेले मादीपणाचे संदर्भच केवळ विचारात घेतले जातात, हे अत्यंत वाईट आहे. माणूस म्हणून स्त्रीला आजही वागणूक मिळत नाही. तिचे स्थान कायम दुय्यम किंवा तिय्यम आहे. तिसऱ्या सहस्रकातही स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या/अधिकारांच्या बाबत आपल्याला बोलावे लागते ही बाबच स्त्रियांचा दर्जा आपल्या समाजात काय आहे, हे सांगणारी आहे.

कवी आंबेडकरी चळवळ जगणारा कार्यकर्ता आहे. साहजिकच चळवळ हा त्याच्यासाठी अत्यंत संवेदनशील असा विषय. या विषयावर बोलायला/भाष्य करायला त्याला कुणा विद्वान वक्त्याची आवश्यकता भासत नाही. चळवळी संदर्भात त्याचे स्वतःचे स्वतंत्र असे आकलन आहे.

'अंगणातील पिंपळ खंगत आहे अदृश्य उधळीने
निळ्या टोपीतील चिंतातूर म्हातारा
खोकत आहे पोरांच्या पोरखेळाने' [७]

तरुण पिढीच्या खांद्यावर राष्ट्राची धुरा असते, असे म्हणतात. तद्वतच चळवळीची धुराही तरुण पिढीच्या खांद्यावरच असायला हवी. तरुण पिढीने चळवळ आपल्या हाती घेतली. परंतु चळवळीचे नेमके स्वरूपच तो विसरून गेला. सत्तेत सहभाग असण्याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. पण लाचारी पत्करून, तत्त्वांशी तडजोड करून सत्तेत भागीदार होणे हा आंबेडकरद्रोह होय हे कवी जाणतो. जुणी जाणती पिढी नव्या पिढीच्या या पोरखेळाकडे हताश होऊन पाहात आहे. समाजवास्तवाचे अचूक भान आणि वैचारिक चिंतनशीलतेचा अत्यंत उत्कट संगम सुदाम सोनुले यांच्या कवितेत बघायला मिळतो. म्हणूनच 'आंबेडकरी अस्तित्वाच्या सूर्यबलाची कविता' [८] असा डॉ.अशोक पळवेकर यांनी केलेला उल्लेख समर्पक वाटतो.

## प्रसेनजीत गायकवाड/शून्य काळातील कविता (२००८)

'शून्य काळातील कविता', 'कवितेच्या गर्भातून' हे दोन काव्यसंग्रह, 'तीला सूर्य गवसला तेव्हा' आणि 'अभंगाचे डोही' हे दोन संपादित काव्यसंग्रह आणि 'झंडीमुंडी' हा कथासंग्रह एवढी साहित्यसंपदा कवी प्रसेनजीत गायकवाड यांच्या नावावर आहे. काही दर्जेदार गझलाही त्यांनी लिहिल्या आहेत.

'दलित साहित्य' ही संकल्पना उदयास आली, आणि संकल्पनेने अनेक लिहित्या हातांना प्रेरणा दिली. अनेक कवी उदयास आले, परंतु सुरुवातीच्या काळातील नकार, वेदना, विद्रोह एवढयाच मर्यादेत न राहता 'आंबेडकरी' असे नामाभिधान धारण करून विध्वंसाऐवजी नवी रचनात्मक मांडणी त्यांनी करायला सुरुवात केली. प्रसेनजीत गायकवाड हे अशा कवींमधील महत्त्वाचे एक नाव. 'शून्य काळातील कविता' लिहिण्याआधी अनेक वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिकांमधून त्यांची कविता नियमित प्रकाशित होत राहिली. 'जीवनाच्या व्यापकतेला कवेत घेण्याची ऊर्मी असणारी ही कविता एकाच वेळी स्वतःची व स्वतःच्या समूहाची देखील अभिव्यक्तीची कोंडी आपल्या अव्यभिचारी निष्ठेने फोडण्याचा शांतपणे प्रयत्न करीत असताना दिसते', [९] असे जे निरीक्षण डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी नोंदविले आहे ते योग्यच आहे.

'एरवी
माझ्या घरी चहा पिताना

किंवा
माझ्यासोबत जेवताना...
एकंदरीत
जातीयतेवर खलबते करताना
तू छान दिसतोस,
पण दोस्ता,
माझी योग्यता
सिद्ध होत असताना
मला दिसू लागते
तुझ्या डोळयात स्पष्ट होणारी
जातींमधली सीमारेषा' [१०]

शिक्षणाच्या वाढलेल्या प्रमाणामुळे आणि भारतीय संविधानाने बहाल केलेल्या अधिकारामुळे तसेच वेळोवेळी करण्यात आलेल्या कायद्यांमुळे जातीयतेची तीव्रता कमी झाली आहे, हे नाकारता येत नाही. तथापि सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवर अशा काही घटना घडताना दिसतात की आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा व कायद्याचा काडीचाही उपयोग नाही असे वाटू लागते. गावपातळीपासून तर महानगरांपर्यंत जातियता कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपले अस्तित्व अध्येमध्ये दाखवून देतेच. नोकरी असो, निवडणुका असोत, आरक्षणाचा प्रश्न असो की एखादे आंदोलन असो. जातीनिहाय समूह कार्यरत झालेले दिसतात. कालपर्यंत गुण्यागोविंदाने नांदणारी माणसं एकमेकांचा तिरस्कार करायला लागतात, एकमेकांच्या जीवावर उठतात. हे भीषण भयंकर वास्तव कवीने अत्यंत संयतपणे मांडले आहे. कुठेही आक्रस्ताळेपणा न करता आपली बाजू बळकट करून शांतपणे मांडण्याची कवीचीही शैली वाखाणण्याजोगी आहे.

शिक्षणाने, अभ्यासाने प्रश्नांचा गुंता सुटायला मदत होते. उगाच नाही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला वाघीणीचे दूध म्हटले. आंबेडकरी समुदायातील तरुणांनी शिक्षण क्षेत्रात फार मोठी झेप घेतली आहे. असे क्षेत्र नाही, की जेथे उच्चविद्याविभूषित आंबेडकरी तरुण पोचला नाही. समकाळातील प्रश्न त्याला समांतर चालणाऱ्या शिक्षणाने सोडविले असले तरी भविष्यातील प्रश्नांची उकल वर्तमानातील शिक्षण पद्धतीने होऊ शकत नाही. त्यासाठी कायमच 'अपडेट' राहावे लागणार आहे.

'या मातीत
प्रश्नच उगवतात आपोआप
हिचा गुणच असा, की
इथे प्रश्नांची झाडे
तेरात्रिकाल प्रश्नांचा बहर
प्रश्नांचीच फुले
आणि प्रश्नांचीच फळे' [११]

समस्यांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नात नवीनच प्रश्न तयार होतात. त्यांना सामोरे जाणे ही अपरिहार्यता असते. थांबता येत नाही. कारण प्रश्नापाशी जेवढे अधिक रेंगाळलो तेवढे अधिक प्रश्न निर्माण होतील. म्हणून प्रश्नांशी थेट भिडले पाहिजे. उत्तरे शोधली पाहिजेत. अन्यथा येणारा काळ प्रश्नांच्या आवर्तातून आपल्याला बाहेर पडूच देणार नाही याची जाणीव कवी करून देतो. सहज सोप्या शब्दांमधून 'मी' चा आधार घेत समूहमनाच्या वेदना मुखरित करणारी ही कविता काळाच्या कसोटीवर नक्की उतरेल असा विश्वास वाटतो.

## हेमंतकुमार कांबळे/गाव (२०१५)

'आयुष्य नांगरतांना' या दीर्घकाव्याने प्रसिद्धीस आलेले कवी हेमंतकुमार कांबळे यांची 'गाव' ही दुसरी दीर्घकविता. चौसष्ट पृष्ठांच्या या दीर्घकाव्यात गावांच्या अनुषंगाने अनेक विषय हाताळलेले आहेत. एखाद्या काव्यसंग्रहात कवीला जेवढे म्हणून विषय हाताळावेसे वाटतात तेवढे विषय या प्रस्तुतच्या दीर्घकवितेमध्येही आहे. 'गाव' ही मध्यवर्ती संकल्पना घेऊन कवीने गाव, राष्ट्र, सत्ता, संघर्ष, संस्कृती, जागतिकीकरण, महासत्ता, बुद्ध, बाबासाहेब, कारखानदारी, जमिनदारी, गुलामगिरी इ.इ. विषय लीलया पेललेले आहेत.

'सारेच गावाला नाडतात
अन् आकाशाकडे पाहून
दोन्ही हात जोडतात.

सरकार, कारखानदार, बुवा
बाबा, राजकीय पक्षही
गावच्या शोषणासाठी
सदैव दक्ष आहे' [१२]

औद्योगिक क्रांतीनंतर गाव ही संकल्पना 'स्वयंपूर्ण गाव' या अर्थाने मोडीत निघाली. गाव आणि त्याचा अंतर्गत व्यवहार गावगाडा या संकल्पनेने आपण ओळखतो. गाव, गावगाडा या संकल्पना मोडीत निघाल्यानंतर जागतिकीकरणाने तर गावाचे स्वरूपच संपूर्ण पालटून गेले आहे. गावाचे स्वरूप आता निमशहरी असे झालेले आहे. शहरी सुविधांपासून गाव वंचित असले तरी शहरी मानसिकता घेऊनच आता लोक गावात राहतात. खेडी मुख्य रस्त्याला जोडली गेली. किमान तालुक्याच्या गावापर्यंत सहज जाता येईल अशा भौतिक सुविधा गावात उपलब्ध झाल्या. आर्थिक परिस्थिती सुधारली. राहणीमान सुधारले. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार झाला. शेतीत नवनवे प्रयोग व्हायला लागलेत. कास्तकार उत्पन्न वाढवायच्या नादात रासायनिक बी–बियाणे, खते यांचा भरपूर वापर करू लागला. शेतीचा खर्च वाढू लागला. मजुरीचे दर वाढले. त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला. यातून सुटका करण्यासाठी शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखे अघोरी मार्ग पत्करणे सुरू केले.

हे सर्व सुरू असतानाच गावची मानसिकता मात्र बदलली नाही. जातपात, उच्चनीचता, धर्मांधता जशी होती तशीच राहिली. अठराव्या शतकातील मानसिकता घेऊन एकविसाव्या शतकाची भाषा बोलणे हा भयंकर तकलादूपणा आहे.

'अरे, दगडा मातींनी
बांधलेल्या पीठाचे रीठ केल्याने
होत नसतात बेचिराख
सनातन संदर्भ,
त्यासाठी माणसाच्या मेंदूतच
लावावे लागते सूर्यफुलाचे झाड' [१३]

असे जे कवी म्हणतो, त्याचा अर्थ इतकाच की जात, धर्म, पंथ हया बाबी अत्यंत चिवट आहेत. त्या सहजासहजी माणसाच्या मनातून जात नाहीत. त्यासाठी एखादा बाबासाहेब आंबेडकरांसारखा महापुरुषच जन्मावा लागतो. बाबासाहेबांच्या आदेशाबरहुकूम त्यांच्या अनुयायांनी देव, धर्म, जात इ. समाजविघातक बाबींना हद्दपार केले. पण ज्यांची जात बाबासाहेबांची नव्हती त्यांनी तीचा आदेश मानला नाही. परिणामी गावामध्ये एक नवेच दुभंगलेपण जन्माला आले.

बाबासाहेबांना मानणारा बुद्धीवादी, विज्ञानवादी समुदाय आणि धार्मिक कर्मकांडात गुरफटून गेलेला, किंबहुना ठेवला गेलेला समुदाय यांच्यात वारंवार खटके उडू लागले. त्याची परिणती सामाजिक सौहार्द्र बिघडण्यात झाली. केवळ भांडणे होऊ नयेत म्हणून चूप बसणे म्हणजे अन्याय सहन करणेच होय. हा अन्याय आंबेडकरी तरुण सहन करणे शक्यच नव्हते. त्यामुळे 'गाव' कायम धुमसत असायचा. हळूहळू कालप्रवाहाबरोबर वातावरण निवळू लागले. गावाला शत्रू कोण? मित्र कोण? यातील फरक कळायला लागला आणि संघर्षाचे स्वरूप पलटू लागले.

'त्यांनी खुडून टाकलेल्या
रोपट्यांच्या मानेवर
तुला नव्या कलमा बांधायच्या आहेत
फुटलेले धुरे
पुन्हा नव्याने सांधायचे आहेत
मग क्रांतीचा मळा बहरून येईल
अन् पडिक शेती सूर्यफुलांनी डवरून येईल.' [१४]

संघर्ष हा परिवर्तनासाठीच करायचा असतो. आणि संघर्षात समविचारी जनांचा सहभाग असणे, हे तर अनिवार्यच. समविचारी नसतील तर ते तयार करणे आणि मग पुढील पायऱ्या पार पाडाव्या लागतात. तेव्हा कुठे क्रांतीचा मळा बहरून येतो आणि पडिक शेती सूर्यफुलांनी डवरून येते.

'गाव' असे जरी शीर्षक प्रस्तुत दीर्घकवितेचे असले तरी ती माणसांची कविता आहे असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल यात शंका नाही.

## संदर्भ टिपा

१) मडावी दशरथ, टाहरा, लोकायत, यवतमाळ, २०११, पृ.७
२) तत्रैव, पृ.४२
३) तत्रैव, पृ.१४
४) सोनुले सुदाम, सूर्यफूल आणि काळोख, समता संगर, नागपूर, दु.आ.२०१०, पृ.३
५) तत्रैव, पृ.२०
६) तत्रैव, पृ.१५
७) तत्रैव, पृ.३४
८) तत्रैव, डॉ.अशोक पळवेकर, परिशिष्ट १
९) गायकवाड प्रसेनजीत, शून्य काळातील कविता, संकेत, नागपूर, २००१, प्रस्तावना, आठ
१०) तत्रैव, पृ.२२
११) तत्रैव, पृ.४६
१२) कांबळे हेमंतकुमार, गाव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, नागपूर, २०१५, पृ.२८
१३) तत्रैव, पृ.४८
१४) तत्रैव, पृ.६२

## संदर्भ ग्रंथ सूची

अ) साधन ग्रंथ सूची
१) मडावी दशरथ, टाहरा, लोकायत, यवतमाळ, २०११
२) सोनुले सुदाम, सूर्यफूल आणि काळोख, समता संगर, नागपूर, दु.आ., २०१०
३) गायकवाड प्रसेनजीत, शून्य काळातील कविता, संकेत, नागपूर, २००८
४) कांबळे हेमंतकुमार, गाव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, नागपूर, २०१५

आ) सहायक ग्रंथ सूची
१) कांबळे अशोक, आंबेडकरवादी कविता, इंडोव्हिजन, लातूर, २०१७
२) सूर अनंता, दशकाची निवडक काव्यसमीक्षा, सुगन, अमरावती, २०१३

❖❖❖

# मुलांचे आत्मकेंद्रित होणे एक समस्या

प्रा. एस.वाय. लखदिवे
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख,
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
ई मेल : saroj20lakhadive@gmail.com मो.नं. ९४२०१९९४७९

## गोषवारा:

बालकाचा सर्वांगिण विकास होण्याकरिता सकस व पर्याप्त आहार, स्वच्छता, निरोगी व उत्तम स्वास्थ आवश्यक असते. परंतु बरेचदा निरोगी असुनही बालकाच्या शरिरातील काही मानसिक ग्रंथीमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा परिणाम बालकावर होतो व बालकाच्या भावनिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात. व बालक आत्मकेंद्री बनते. या समस्या निर्माण होण्यामध्ये बालकाच्या सभोवतालच्या परिसराला अतिशय महत्वाचे स्थान आहे. कौटूंबिक वातावरण, शालेय वातावरण, सामाजिक व वैयक्तिक वातावरण याचा प्रभाव बालकांवर पडतो. कौटूंबिक वातावरणात आईवडिलांचे परस्पर सबंध, पालक—बालक सबंध, कुटूंबाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती याचा समावेश होतो. घरातील वातावरण आनंदी व समाधानी असल्यास बालकांचा विकास पण चांगला होतो.

## प्रस्तावना :

सध्याची सामाजिक परिस्थिती बघता मुलांमध्ये निराशा, वैफल्य, मानसिक अस्थिरता दिसुन येते. पालक मुलांकडून अवास्तव अपेक्षा करित आहे. त्यात मुले असमर्थ ठरतात व मुलांमध्ये नकारात्मक भावना निर्माण होते व याचा परिणाम त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर होतो. वाढत्या स्पर्धेला तोंड देतांना त्यांची मानसिक क्षमता कमी पडते व कित्येक तरूण व्यसनाधिन होतात, आक्रमक होतात, विध्वसंक कृत्य करतात, व शेवटी आत्महत्यांचा मार्ग अवलंबतात.मुलांच्या जीवनात कौटूंबिक वातावरण अशा वेळेस अत्यंत महत्वाचे असते.कुटूंबातील व्यक्ती म्हणजेच आई—वडील, भावंडे व इतर त्यानंतर सर्व व्यक्तींच्या संबंधातून कौटूंबिक वातावरण निर्माण होत असते. पूर्वी संयुक्त कुटूंब पध्दती होती. नंतरच्या काळात विभक्त कुटूंब पध्दती अस्तित्वात आली याचा परिणाम मुलांवर होत गेला. कौटूंबिक वातावरणाचा मुलांच्या व्यक्तिमत्वावर बराच परिणाम होतो. आई—वडील दोघेही जर नौकरी करणारे असेल अशा वेळेस त्यांच्याजवळ मुलांसाठी वेळ नसतो. बाहेरच्या वातावरणात अनेक समस्या असतात. त्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना कुणाचा तरी आधार हवा असतो. तो आधार त्यांना घरी मिळत नाही. आई—वडील व मुले यांच्यात एक प्रकारची दरी निर्माण होते.

## पालकांवर चिडण्याची कारणे :

आई—वडील व मुले परस्परांना समजून न घेणे, इतरांजवळ सतत तक्रारी करणे, दिवसभराच्या कार्याची सतत चौकशी करणे, मित्रमैत्रिणीची सतत चौकशी करणे, मुलांच्या सांगण्यावर विश्वास न ठेवणे, प्रत्येक गोष्टीसाठी विरोध करणे. घरचे वातावरण अनुकुल नसणे.

## मुलांना उद्‌भवणाऱ्या समस्या :

१) विचारांची अस्पष्टता : नविन परिस्थिती समोर येत असते. अशावेळेस एकदमच विचारांची घालमेल झालेली असते. डोक्यात अनेक प्रश्न निर्माण होतात आणि आता आपले विचार नक्की कोणत्या बाजूने स्पष्ट करावे याबाबत अस्पष्टता निर्माण होते.

२) आईवडिलोंची अपेक्षा : जसजशी मुले मोठी होत जातात आई—वडील त्यांच्याकडून जास्त अपेक्षा करायला लागतात व मुलांवर त्या अपेक्षांच ओझ तयार होते.

३) मोठ्यांशी जुळवून घेतांना अडचण : प्राथमिक शाळेतून मुल समोरच्या शिक्षणाकडे वळायला लागली की आईवडील आपल्या मुलांना सर्रास म्हणतात, अरे आता तु मोठा झालास, लहानांसारखा वागू नकोस. त्यामुळे त्यांच्या मनात संघर्ष चालू होतो की आपण मोठे आहोत की छोटे.

४) पालक बालक सबंध : सुखी समाधानी कौटूंबिक वातावरण बालकाच्या वाढीस पुरक ठरते. त्यामुळे पालक बालक सबंध सुधारण्यास मदत होते. बालकाचे संगोपन करित असतांना पालकांनी आपली जबाबदारी समजून घेतल्यास बालकाना भावनिक समाधान वाटते. अन्यथा बालकांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात.

५) आईवडिलांनी अवास्तव अधिकारवृत्ती व कडक शिस्त: बालकांना चांगल्या सवयी लागाव्यात म्हणून पालक कडक शिस्तीचा वापर करतात. बालकाला मन असते, आवडीनिवडी असतात, भावना असतात याची जाणीव पालक ठेवत नाही. बालकाने स्वत:चे मत व्यक्त करण्याचा प्रयत्न केल्यास अधिकार वाणीने त्यांना चुप केले जाते. अशा बालकांना मनातील भावना मोकळेपणाने मांडण्याची संधी न मिळाल्याने ते मनातल्या मनात कुढत राहातात.

६) इतरांसमक्ष दोषांची चर्चा : बालकांच्या दोषांची इतरांसमोर चर्चा केल्याने बालकांना संकोच वाटतो. स्वत:मधील न्युनतेची जाणीव होऊन त्याच्या सामाजिक समायोजनामध्ये अडथळे निर्माण होतात, इतर लोक थट्टा करते म्हणून तो इतरांमध्ये मिसळत नाही. त्यामुळे त्यांचा स्वभाव एकलकोंडा होणे आत्मकेंद्री होतो.

## समस्या उद्‌भवण्याची कारणे :

१) कौटूंबिक/शालेय सुसंस्काराचा अभाव. २) उदासिनता ३) आदर्शाचा अभाव ४) आई–वडील दोघेही नसणे. ५) वडीलधाऱ्यांकडून रूक्ष व्यवहार. ६) संगत चांगली नसणे. ७) संगतीने निर्माण होणारी व्यसनाधिनता. ८) वडीलधाऱ्यांचा अतिधाक/अति अपेक्षा.

९) कुपोषण १०) संगतीने येणारी असमंजस वृत्ती ११) वडीलधाऱ्यांचे दुर्लक्ष. १२) स्वत:च्या कर्तव्याचा विसर. १३) इतरांबरोबर केली जाणारी तुलना. १४) अशांतता, ताणतणाव. १५) पालकांच्या वागण्यात अनिश्चितता. १६) असमानतेची वागणूक.

## पालकांची जबाबदारी :

१) घरातील वातावरण मोकळे, प्रसन्न व मित्रत्वाचे असावे. २) आईवडिलांची वागणूक आदर्श असावी. ३) रात्री जेवतांना मुलांबरोबर गप्पा मारण्याची सवय लावावी. ४) मुलांना वेळ द्या. ५) घरात आदळआपट करू नका. ६) मुलांना घालून पाडून बोलू नका. ७) मुलांनी केलेली चुक असेल तर त्याला लगेच माफ करा. ८) मुलांसाठी छोट्या छोट्या गोष्टीतुन प्रेम व्यक्त करावे. ९) मुलांसमोर व्यसने करू नका. १०) घरात कोणतीही वस्तु घेतांना मुलांना त्यात समाविष्ट करा. ११) आईवडिलांनी एकमेकांच्या मताचे खंडन मुलांसमोर करू नये.

१२) बालकांच्या दोषांची चर्चा इतरांसमोर करू नये.

## निष्कर्ष :

मुले आत्मक्रेंद्रित होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यासाठी मुलांसोबत संवाद साधने आवश्यक आहे. मुलांसोबत आईवडिलांचे सबंध मैत्रीपूर्ण असायला पाहिजे. म्हणजे तो विश्वासाने आपल्या पूर्ण गोष्टी सांगू शकेल, त्याच्या मनात काय आहे हे माहिती पडणे गरजेचे आहे. आई–वडिलांकडे मुलांने आपल्या भावना व्यक्त केल्या पाहिजे. यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो. व समाजातील समस्यांना तो निर्भयपणे तोंड देऊ शकतो.

## संदर्भग्रंथ

मानवविकास – डॉ. लिना कांडलकर

विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ – डॉ. संगिता घुईखेडकर

❖❖❖

Review Article :

# Ruthenium complexes an emerging field: Application in various fields

**Snehal R.Khandekar[1], D.M.Chavhan[2]**
[1,2]Assistant Professor, Department of Chemistry
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal
Email : snehalkhandekar18@yahoo.com Mob. No. 8698666107

## Abstract:

Above review paper deals with the different ruthenium complex trend and their roles in the application like anticancer drug ,catalysis ,DSSC etc. We are discussing about the various properties of ruthenium complexes by varying the ligands such as Schiff's bases, cyclometalated ligands ,polypyridyl ligand and so on .

**Keywords:** Ru- complexes, anticancer drug, catalysis, DSSC

## Introduction:

Recent research is proceeding towards the enhancement in the properties of ruthenium complexes for their applications in the field of anticancer activity, catalytic property and photophysical and chemical properties. Since couple of years ruthenium complexes is gaining more attention from the researchers because of their various application in life sciences, medicine ,catalytic reaction, nanotechnology and many more areas[1–5].This properties are given by the ruthenium complexes because of their variable oxidation states . By making proper variation in the ancillary ligands, redox properties and ligand interactions we can make varieties of ruthenium complexes with different configuration[6].

## Literature review:

Ruthenium complexes are attracting the attention of researchers because of their more stabitlity and less toxicity over cisplatin and other anti-cancer drugs. To prepare a metallodurgs we can make ruthenium complexes with some macromolecules which will better act on tumor cell[7]. We can change the properties of the ruthenium complexes by changing the ligand .We have a various class of ligands such as polypyridyl ligand ,Schiff's bases ,cyclometalated , thiosemicarbazones and many more[8-14].

Ruthenium polypyridyl complexes targets the tumor cells by DNA-binding interaction. Similarly the Cycloruthenated complexes also shows the anticancer activity. Cycloruthenated complexes containing benzimidazole is used for antiangiogenic therapy in the treatment of cancer[15-16]. Likewise we can search for the cancer treatment by using the ligand such as imidazoles, imidazolines and tetraphenyl-imidazole.

In the search of new changes in ruthenium-based catalysis we have come to known about ruthenium complexes having Schiff's base , thiocarbazones , cyclometalated ligands and many other ligands which can enhance the catalytic properties of the ruthenium complexes. (salen)ruthenium(VI) nitrido complex ,a Schiff's base (salen) containing ligand gives a catalytic property in the conversion of aniline to benzene. Salen is the ligand containing salicylaldehyde as one of the reagent. So we can also check the catalytic property of the ruthenium complexes with Xipamide-salicylaldimine and salicylaldehyde thiosemicarbazone as a ligand [17-18] .

Ruthenium complexes has luminescent application such as DSSC having poly-N-heterocyclic moieties and also shows high energy emissions required for the OLED devices[19].We can find this application by substituting the poly-N-heterocyclic moieties by

using Mannich base ,cefotaxime , 3,4-dihydropyrimidin-2(1*H*)-ones or any other Schiff's base ligand [20-21].

Thus the review paper specially focus on the various application in the medicinal activity, catalytic activity ,photophysical and chemical properties. With the help of above discussed ligands we can synthesized and check the different properties of ruthenium complexes. Hopefully the researchers will get new ideas with respect to the scope in the area of ruthenium complexes.

## References:

1. Storr, T. *Ligand Design in Medicinal Inorganic Chemistry*; John Wiley & Sons, Ltd.: Chichester, UK, 2014.
2. Crabtree, R.H. *The Organometallic Chemistry of the Transition Metals*, 6th ed.; John Wiley & Sons, Inc.: Hoboken, NJ, USA, 2014.
3. Gade, L.H.; Hofmann, P. *Molecular Catalysts: Structure and Functional Design*; Wiley-VCH: Weinheim, Germany, 2014.
4. Wang, D.; Astruc, D. Fast-growing field of magnetically recyclable nanocatalysts. *Chem. Rev.* 2014, *114*, 6949–6985.
5. Prier, C.K.; Rankic, D.A.; MacMillan, D.W.C. Visible light photoredox catalysis with transition metal complexes: Applications in organic synthesis. *Chem. Rev.* 2013, *113*, 5322– 5363.
6. Ileana D., Valerian D. and Albert D. Editorial of Special Issue Ruthenium Complex: The Expanding Chemistry of the Ruthenium Complexes. *Molecules* 2015, *20*, 17244-17274
7. Valente, A.; Garcia, M.H. Syntheses of macromolecular ruthenium compounds: A new approach for the search of anticancer drugs. *Inorganics* 2014, *2*, 96–114.
8. Lai, H.; Zhao, Z.; Li, L.; Zheng, W.; Chen, T. Antiangiogenic ruthenium(II) benzimidazole complexes, structure-based activation of distinct signaling pathways. *Metallomics* 2015, *7*, 439–447.
9. Franco, D.; Vargiu, A.V.; Magistrato, A. Ru[(bpy)2(dppz)]2+and Rh[(bpy)2(chrysi)]3+ targeting double strand DNA: The shape of the intercalating ligand tunes the free energy landscape of deintercalation. *Inorg. Chem.* 2014, *53*, 7999–8008.
10. Huang, H.; Zhang, P.; Chen, H.; Ji, L.; Chao, H. Comparison between polypyridyl and cyclometallated ruthenium(II) complexes: Anticancer activities against 2D and 3D cancer models. *Chem. Eur. J*. 2015, *21*, 715–725.
11. Peña, B.; David, A.; Pavani, C.; Baptista, M.S.; Pellois, J.-P.; Turro, C.; Dunbar, K.R. Cytotoxicity studies of cyclometallated ruthenium(II) compounds: New applications for ruthenium dyes. *Organometallics* 2014, *33*, 1100–1103.
12. Garza-Ortiz, A.; Maheswari, P.U.; Siegler, M.; Spek, A.I.; Reedijk, J. A new family of Ru(II) complexes with a tridentate pyridine Schiff-base ligand and bidentate co-ligands: Synthesis, characterization, structure and *in vitro* cytotoxicity studies. *New J. Chem.* 2013, *37*, 3450–3460.
13. Ljubijankić, N.; Zahirović, A.; Turkušić, E.; Kahrović, E. DNA binding properties of two ruthenium(III) complexes containing Schiff bases derived from salicylaldehyde: Spectroscopic and electrochemical evidence of CT DNA intercalation. *Croat. Chem. Acta* 2013, *86*, 215–222.
14. Archana S. and Ezhilarasi Rosaline J. Synthesis Characterization and Application of Salicylaldehyde Thiosemicarbazone and Its Metal Complexes. Ezhilarasi et al. Int. J. Res. Chem. Environ. Vol.2 Issue 4 Oct. 2012(130-148)
15. Marx, V.M.; Rosebrugh, L.E.; Herbert, M.B.; Grubbs, R.H. Cyclometalated ruthenium alkylidene complexes: A powerful family of *Z*-selective olefin metathesis catalysts. In *Ruthenium in Catalysis*; Dixneuf, P.H., Bruneau, C., Eds.; Springer: Berlin, Germany, 2014;Chapter 1, pp. 1–17.
16. Kobayashi, Y.; Kashiwa, M.; Sonoda, M.; Kirihata, M.; Tanimori, S. Regioselective monoarylation of 2-phenylbenzimidazole via ruthenium-catalyzed C–H bond

functionalization. *Synthesis* 2014, *46*, 3185–3190.

17. Archana S. and Ezhilarasi Rosaline J. Synthesis Characterization and Application of Salicylaldehyde Thiosemicarbazone and Its Metal Complexes Int. J. Res. Chem. Environ. Vol.2 Issue 4 Oct. 2012(130-148)
18. Suman Malik, Suparna Ghosh, Bharti Jain ,Archana Singh ,and Mamta Bhattacharya. Synthesis, Characterization, and Biological Evaluation of Some 3d-Metal Complexes of Schiff Base Derived from Xipamide Drug. International Journal of Inorganic Chemistry Volume 2013, Article ID 549805, 6 pages.
19. Visbal, R.; Gimeno, M.C. *N*-heterocyclic carbene metal complexes: Photoluminescence and applications. *Chem. Soc. Rev.* 2014, *43*, 3551–3574.
20. S.Rathakrishnanb, A. Abdul Jameela & M.Syed Ali Padushaa. Synthesis ,characterization and antimicrobial studies of chiral compounds and its metal complexes.International Journal of Scientific and Research Publications, Volume 4, Issue 7, July 2014.
21. Ahlam Jameel Abdulghani, Rasha Khuder Hussain Synthesis and Characterization of Schiff Base Metal Complexes Derived from Cefotaxime with 1*H*-indole-2,3-dione (Isatin) and 4-N,N-dimethyl-aminobenzaldehyde Open Journal of Inorganic Chemistry, 2015, 5, 83-101.

❖❖❖

# डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या बालसाहित्यातील संस्कार आणि संस्कृती

प्रा. डॉ. नकुल जनार्दन धरमकर
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय
अमरावती मो. ७९७२७६१९६१

बालसाहित्य निर्मितीचा विचार करता दुसऱ्या महायुदधनंतर सुरूवात झाली. त्यानूसार भारतीय बालसाहित्याचा विचार करता रविंद्रनाथ टागोरांनी बालसाहित्याच्या निर्मितीची सुरूवात केली व तेच त्याचे जनक आहेत. तसेच मराठी बालसाहित्याचा विचार करता साने गुरूजींची शामची आई आजही सर्वांना परिचीत आहे. साने गुरूजी, भा. रा. भागवत, मालतीबाई दांडेकर, सरोजीनी बाबर, दिनकर देशपांडे, मीना कारंजेकर यांनी बालसाहित्यावर लेखन केले. त्यांचे बालकथा संग्रह आजही प्रचलित आहेत.

बालकाच्या उत्तम शारीरिक विकासासाठी जशी सकस आहाराची गरज असते, त्याचप्रमाणे त्याच्या मानसिक, बौद्धिक, भावनिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्यावर योग्य वयातच चांगल्या संस्कारांची गरज असते. म्हणूनच पूर्वीच्या काळी लहान मुलांना आजी—आजोबा यांच्याकडून राजाराणी, पशुपक्षी तसेच रामायण, महा ारत अशा देवादिकांच्या कथांबरोबरच शिवाजी महाराज, राणाप्रताप अशा ऐतिहासिक कथाही सांगितल्या जात होत्या. जेणेकरून बालमनावर चांगले संस्कार होतील.

डॉ. श्रीकांत तिडके म्हणतात, बालसाहित्य रंजक वाचनीय असते. निसर्ग, झाडे, पशु—पक्षी, आकाश, माती, पाणी यांच्याशी संवाद साधावा लागतो. बालकांचा वयोगट, शब्दसामर्थ्य, कल्पनाशक्ती, जिज्ञासू मन, आकलनशक्ती, सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक परिस्थिती, समाजव्यवस्था याची जाणीव बालसाहित्यीकांना असणे गरजेचे असते.

प्रतिमा इंगोले यांनी बालकांसाठी साहित्यनिर्मिती केलेली आहे. तिचे स्वरूप फार मोठ्या स्वरूपात ग्रंथ वजा न करता त्यांनी त्याला छोटे रूप दिलेले आहे. जेणेकरून बालावाचकांना ती वाचनीय असेल. त्याचबरोबर त्यामध्ये फार मोठ्या वजनदार अशा विशिष्ट अन्वयार्थ लावणाऱ्या शब्दांचा उपयोग न करता साध्या व सरळ अशा शब्दांचा वापर केलेला आहे. तेथील परिसराशी जवळीक साधणाऱ्या शब्दांचा प्रयोग केला आहे. अंधश्रद्धा, चतुराई, एकीचे बळ, वाघाचे उपयोग आणि त्याचे संरक्षण कसे केले आहे, योचे बोधपर विवेचन केले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन होण्यासाठी साधुबाबाने लोकांना कसे फसविले याचे विवेचन आगळे जंगल या बालकादंबरीतून केले आहे. स्वत कामचुकारपणा करून दुसऱ्याना त्याने धडा शिकविला. ऐदीपणामुळे लवकर श्रीमंत होण्याचा मार्ग पत्करला पण खुनाच्या व चोरीच्या आरोपाखाली पोलीसांनी त्याला व त्याच्या शिष्यांना कसे पकडून नेले हे सांगितले आहे. कथानकाच्या निवेदनावरून अंधश्रद्धा ठेऊ नका, कामचुकार, आळशी बनू नका, कोणत्याही साधुच्या आहारी जाऊन स्वतची फसवणूक करून घेऊ नका असा उपदेश प्रतिमा इंगोले यांनी बालवाचकांना केला आहे.

'अपंगाची करामत' या बालकादंबरीत आंधळा असूनही बाबाजी डोळसपणे व्यवहार करतो, सल्ला देतो ह्याचे उदाहरणासहीत विवेचन केले आहे. आवाज व स्पर्श यावरून माणसाचे, प्राण्यांचे वागणे, त्यांचे वय, वागणूक, चालणे कशा पद्धतीचे आहे हे आपल्या बुद्धीचातुर्याने बाबाजी ओळखतो. उलट निस्वार्थपणे काम करतो. आंधळ्या डोळसपणा कौतुकास्पद तर आहेच पण सुदृढ माणसाला विचार करायला लावणारा आहे.

एकीचे बळ म्हणजेच एकजुटीने राहणे, 'भंडाऱ्याचे गांव' आणि 'करारी आजी' ह्या दोन्हीचा आदर्श त्यासाठी महत्त्वाचा आहे. चांगल्या वाईट कोणत्याही गोष्टींसाठी नवस बोलणे, त्यानिमित्ताने मनातील राग, द्वेष विसरून नव्याने राहणे, शत्रूंशी मैत्री करणे, त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन स्वयंपाक करणे व जेवण करणे हे ह्या भंडाऱ्याचे म्हणजेच महाप्रसादाचे महत्त्व आहे. तशीच करारी आजी आहे. सावत्रपण न दाखविता सर्वांशी एकोप्याने राहणे. सर्वांना समजून घेऊन सांभाळ करणे, वाड्यात चोरी होताना चोरांशी सामना करणे, सर्वांना सुरक्षित ठेवणे व शेवटपर्यंत सर्वांना प्रेम, माया लावणे अशी मनोधैर्य कायम ठेवणारी, आलेल्या संकटांना तोंड देणारी करारी आजीची शिकण बाल वाचकांना मोलाची आहे.

वाघाचे घर – मेळघाट मध्ये वाघाचे, त्याच्या नखांचे, कातडीचे महत्त्व सांगितले आहे. सरकारने व्याघ्र प्रकल्प सुरू करून वाघ्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी उचलली आहे. वाघाचे सौंदर्य, त्याचे ऐटीत चालणे, चपळाईने पळणे कसे आकर्षक आहे हे खुलासेवार स्पष्टपणे रेखाटले आहे.

एकीचे बळ, एकत्रीकरण ह्यामुळे समाजातील तरूण, बाल व वृद्धांना एक संदेश मिळतो. आलेल्या प्रसंगाला न भीता, न डगमगता सामोरे जायला पाहिजे. तसेच माणसा–माणसांमधील वाद, भांडणे संपुष्टात यायला पाहिजेत. समाजात वैर आल्यामुळे माणसांमध्ये सूड प्रवृत्ती जागृत होते. वैर वाढत जाते. अपमान व बदल्याची भावना पाहावयास मिळते. त्यासाठी सर्वांनी मिळून मिसळून कसे राहायचे हे इंगोले यांच्या बालकादंबऱ्यातून जाणवते.

बालकांदबरी सारखीच विविधता इंगोले यांच्या बालकविता संग्रहातूनपण जाणवते. 'लाजाळू' आणि 'सोन्याच बाळ' ह्या दोन्ही बालकविता संग्रहातून त्यांनी आत्मिक व भावनिकदृष्ट्या शिशूगीते, बालगीते रचली आहेत. त्यांनी आपल्या दोन्ही नातींसाठी ही बोधप्रद गाणी रचली आहेत. त्यात बाळाची, मुलींची, बाहुलीची, पक्षी–प्राणी, फळे–फुले, निसर्गवर्णन विषयक गमतीदार गाण्यांचा समावेश केलेला आहे. पशु–पक्षांच्या गाण्यांमधून पक्षांच्या सवयी, त्यांची आंघोळ करण्याची पद्धत, घरटे बांधण्याची पद्धती, पक्ष्यापक्ष्यांमधील साम्य, पक्ष्यांची रबरी खेळणी आणि पक्षांची व माणसांची गुणदोषात्मक केलेली तुलना ह्याचेही वर्णन केले आहे. तसेच प्राण्यांनी दिवाळी साजरी करण्याचे ठरवले होते. सर्वांच्या सवयीने बेत आखून दिले होते. पण पोपटाने त्यावर विपरीत परिणाम होईल म्हणून सर्वांना जंगलातून निघून जाण्याचा सल्ला दिला. यातून लहानमोठे प्राणी कसे असतात ते सांगितले आहे. एकीचे बळ, प्राण्यांचा प्रामाणिकपण याचे विवरण केले आहे. यातून मजेशीर प्रसंग दिसतात तर कधी प्राण्यांमध्ये असणाऱ्या संवेदनशील भावनांचे चित्र स्पष्टपणे रेखाटलेले दिसते. फळे, भाज्या, फुलांच्या गाण्यांमध्ये त्यांचे वैशिष्ट्य व गुणधर्म दिसून येते. तसेच फुलांचे रंग, रूप, सुवास ह्याच्याबद्दल बालकांच्या मनात प्रश्न उद्‌भवतात. आईने उत्तर दिल्यावरही बालक त्यावर अंदाजाने उत्तर शोधतात. याचा प्रत्यय येतो. या सोबतच निसर्गाचे वर्णन करतांना पाऊस, सूर्य, नदी, चांदण्या, वीज, सह्यांद्री पर्वत, माती, वनराई, धबधबा इत्यादी सर्व निसर्गनिर्मित गोष्टींचे वर्णन बालसाहित्यातून केलेले आहे. पाऊस पडताना आपण डोक्यावर छत्री घेतो तसाच पाऊस थांबल्यावर सूर्य डोक्यावर छत्री धरून राहतो. नदीवर पोहण्याची, धबधब्यासारख्या पावसात आंघोळ करायची, मित्रमैत्रीणी, भावंड यांच्यासोबत केलेली मजा ह्याचे विवेचन केले आहे. निसर्गाशी अनुरूप असणाऱ्या गोष्टींचा माणसाच्या दिनचर्येत कसा संबंध येतो याची परिणीती बालसाहित्यातून होते.

बालसाहित्याची निर्मिती ही अगदी अलीकडच्या काळात म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर झाली असे म्हटले जात असले आणि भारतीय बालसाहित्याचे जनक रविंद्रनाथ टागोर हे आहे असे असले तरी पूर्वीपासून देवाच्या, राजा–राणीच्या, थोर पुरूष आणि संतांच्या शूरवीरांच्या कथा व बोधपर गोष्टींच्या स्वरूपात बालकांना समज व संस्कार देण्याचे कार्य पूर्वापार चालत आले आहे. बालकांवर चांगले संस्कार होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा यासठी बालसाहित्याची गरज आहे. त्यासाठी बालकांचे मानसशास्त्र समजून घेऊन योग्य वयात त्यांच्यावर संस्कार होणे गरजेचे असते. कारण बालमन हे फार जिज्ञासू असते, त्यांची आकलनक्षमता चांगली असते त्यातूनच बालक आपल्या जीवनाची सुरूवात करीत असतो. म्हणून बालकांना समजेल, रूजेल अशा साध्या सरळ कथांमधून प्रतिमा इंगोले यांनी सोप्या व साध्या भाषेतील बालसाहित्याची निर्मिती केली आहे. त्यांचे साहित्य उपदेशात्मक व बोधप्रद आहे. त्याचबरोबर संस्कार व संस्कृतीच्या उद्देशाने भावनिक नाते जपल्या जावे यासठी पशु–पक्षी, फळे–फुले, लहान बाळाची निरनिराळी रूपे, गमतीदार गाणी याची निर्मिती केली आहे व ते वाचनीय व्हावे यासाठी बालमानशास्त्राचा विचार करून त्यांनी साहित्यनिर्मिती केली. त्यासाठी त्यांनी निसर्ग, झाडे, पक्षी, आकाश, माती, पाणी यांच्याशी संवाद साधला आहे. हे करत असतांना कधी कधी तोच तोपणा असण्याचे स्पष्टपणे जाणवत असले तरी बालकांच्या वयोगटाचा विचार करून शब्दसामर्थ्य, कल्पनाशक्ती, जिज्ञासू मन, आकलनशक्ती याची जाणीव ठेवून बालसाहित्याचे लेखन केले आहे व ते वाचनिय आहे.

## संदर्भग्रंथसूची –


1. वाघाचे घर–मेळघाट, प्रतिमा इंगोले, लोकशिक्षण प्रकाशन, औरंगाबाद
2. शामतुरा, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
3. आगळे जंगल, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
4. अपंगाची करामत, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर

5. करारी आजी, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
6. सोनपरी, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
7. श्यामगाणे, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
8. भंडाऱ्याचे गाव, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
9. लाजाळू, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
10. सोन्याच बाळ, प्रतिमा इंगोले, सोनल प्रकाशन, दर्यापूर
11. मालतीबाई दांडेकर, बालसाहित्याची रूपरेखा, मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई
12. डॉ. सुलभा शाह, मराठी बालवाङ्मय स्वरूप आणि अपेक्षा, लीलीवती प्रकाशन, धुळे
13. लीलावती भागवत, मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप


❖❖❖

# अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्राचार्य डॉ. व्हि.एच. नागरे
नारायण नागरे महाविद्यालय,
दुसरबिड, जि.बुलढाणा ४४३२०३
E-mail : vhndusarbid@gmail.com Mob.No.9823311684

## प्रस्तावना

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविधांगी आणि बहुविध व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू म्हणजे ते एक दूरदृष्टी असणारे अर्थतज्ञ होते. इ.स.१९१५ मध्ये त्यांनी एम.ए. अर्थशास्त्र या विषयाचा प्रबंध कोलंबिया विद्यापिठात दाखल केला होता. त्यांच्या प्रबंधाचा विषय होता, ‘‘ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त” हा होता. तसेच पीएच.डी. साठी त्यांनी ‘‘ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताचा उगम” या विषयावर कोलंबिया विद्यापिठात प्रबंध सादर केला होता. म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना कोलंबिया विद्यापिठाने एम.ए. व पीएच. डी. ची पदवी अर्थशास्त्र विषयात प्रदान केला होती. तसेच लंडन विद्यापिठाने त्यांना इ.स.१९२४ मध्ये डी.एस. सी. ही पदवी रुपयाची समस्या उगम आणि उपाय या प्रबंधासाठी बहाल केली.

महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेले त्यांचे विविध विषयांवरील लेखन म्हणजे त्या त्या अभ्यास क्षेत्राला दिलेले महत्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या भारतातील अल्पभूधारणा आणि त्यावरील उपाय या इ.स. १९१८ साली इंडियन इकोनॉमिक सोसायटीच्या पत्रिकेत प्रसिध्द झालेल्या लेखात अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या भारतीय शेतीच्या समस्येवर नाविन्यपूर्ण उपाययोजना सुचविली आहे.

प्रा.रॅग्नेर नुकसे यांनी मांडलेल्या छुप्या बेरोजगारीच्या बहूचर्चित संकल्पनेच्या ३८ वर्ष आधिच त्यांनी ती मांडली होती. सिंचन, शेती, आर्थिक नियोजन वीज यासारख्या इतर समस्यांवर त्यांनी विपूल लिखाण केले. त्यांचे या समस्यांचे विश्लेषण इतके अभ्यासपूर्ण व उत्तम, सखोल आणि सर्वव्यापी होते. त्याची निष्कर्ष, निरिक्षणे, शिफारशी भारताच्या सध्याच्या तत्कालीन आर्थिक समस्या सोडविण्याच्या दृष्टिने देखील उपयूक्त आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला मजबूत आणि प्रगतीशील बनविण्यासाठी महान कार्य केले. ते अर्थशास्त्राचे गाडे अभ्यासक होते. डॉ.आंबेडकरांचे स्थान भारतीय समाज जीवनात उच्चप्रतीचे आहे. म्हणूनच त्यांना विसाव्या शतकातले असामान्य, अतुलनीय आणि बहूविध व्यक्तिमत्व म्हणून लौकिक प्राप्त झालेली आहे.

डॉ.आंबेडकरांचा विचार सरणीत भारतीय अर्थ व्यवस्थेला विकास प्रक्रियेकडे नेणे आव्हाणात्मक आहे. त्यांच्या मते, समतेच्या वागणूकी शिवाय नैसर्गिक गुणांचा विकास हात नाही हे जसे खरे आहे तसेच समतेच्या वागणूकीशिवाय अंगी असलेल्या गुणांचेही चीज होत नाही. यास्तव आपला समाज समर्थ करावयाचा असेल तर चार्तूवर्ण व असमानता यांचे उच्चाटन करून समाजाची रचना एकवर्णत्व व समता या दोन तत्वांच्या पायावर केली पाहिजे. डॉ.आंबेडकरांच्या मते भारताचा आर्थिक सामाजिक विकास कुंठित होण्यास देशातील स्थानिक पातळीवरील जटिल प्रश्न कारणीभूत आहेत. जोपर्यंत अशा जटिल प्रश्नांबाबत पूर्णत: समाज जागृत होत नाही तो पर्यंत विकासाचे आर्थिक तत्वज्ञान कलदायी ठरणार नाही.

## भारतीय शेती व्यवसायाचे वास्तव

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शेती प्रधान ग्रामीण जीवन आणि अर्थव्यवस्था हा चिंतनाचा विषय होता. शेत जमिनीचे जेवढे लहान तुकडे पडतात व विखुरतात तेवढे त्याचे दुष्परिणाम होतात. असे दुष्परिणाम टाळण्यासाठी जमिनीचे एकत्रिकरण हा महत्वाचा उपाय त्यांनी सुचविला. ‘‘एकत्रित आणलेल्या जमिनी जर आर्थिक दृष्टिने फलदायी नसतील तर त्यांची काही उपयोग नसतो. असे त्यांना वाटत होते. योग्य तो खर्च दिल्यानंतर स्वत:ला व कुटुंबाला योग्य अशा सुखात राहण्यासाठी ज्या ठिकाणी उत्पन्न निघते ही नेहमीची आर्थिक दृष्टिने फलदायी शेतजमिनीची व्याख्या त्यांनी मान्य केली नव्हती. त्यांच्या मते ही व्याख्या उत्पादनावर अधिष्ठित नसून उपभोगावर अधिष्ठित असते”. अशी टिका त्यांनी केली.

शेतजमिनचा प्रश्न हा उत्पादनावर अधिष्ठित पाहिजे, व त्यासाठी उत्पादनाचे घटक योग्य त्या प्रमाणात एकत्र आणले पाहिजेत. तसेच शेतजमीनीच्या प्रश्नाकडे उत्पादनाचा धंदा म्हणूनच पाहिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. यातील महत्वाचा मुद्दा म्हणजे जमीनीचा आकार ही परिणाम कारकपणे उत्पादन वाढावे यासाठी

निर्णायक बाब नसते. जमिनीचा लहान आकार हा उत्पादनाच्या आड येत असतो. हे चुकीचे गृहितकृत्य असून भांडवल आणि भांडवली शाधने वाढवणे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. एकाच कालकाच्या नावाने जमिनीचे खाते ठेवणे, वारसा कायद्याप्रमाणे ते न फोडणे हेच आवश्यक असते. कारण त्यामुळे योग्य असा आदर्श आर्थिक शेतजमिनीचा तुकडा तयार होईल. यासाठी निराळा पाहणी क्रमांक (Survey Number) आर्थिकदृष्टया स्वावलंबी अशा तुकडयालाच मिळावा अशी योजना डॉ.बाबासाहेबांनी प्रवर्तित केली होती. त्यामुळे हिश्याचे एकत्रीकरण आणि ते टिकवणे अशीच योजना आवश्यक असते. एकावाचून दुस—या विचार करता येत नसतो. कारण जरी हिश्यांचे एकत्रीकरण केले तर ते फुटू न देता टिकवणे हेच महत्वाचे कार्य ठरते.

## वतनदारी आणि शेतकरी

सन १८७४ च्या वतन ॲक्टमध्ये कोणतीही वतनी मालमिळकत असल्यास ती वंशपरंपरेचा हूदा व त्यासंबंधीचे हक्क व अधिकार हे मिळून वतन होतो. अशी वतन या शब्दाची व्याख्या करण्यात आली आहे. वतन या शंब्दामध्ये दोन गोष्टिंचा समावेश होतो. १. वंशपरंपरेचा हूद्दा २. वतनी मालमिळकत जमीन

पूर्वीच्या काळी दर गावास वंशपरंपरेच्या हुद्देरांची संख्या २४ चोवीस असे. त्यापैकी बारा जणांना बलुतेदार व बाकी बारा अलुतेदार असे संबोधण्यात येत होते. पेशवाईत हया संख्येत खुप वाढ झाली होती. इंग्रज सरकारचा अंमल सुरु झाला. तेव्हा या बेसूमार वाढलेल्या तनपध्दतीत काटछाट करण्याचा विचार ठरला व त्याचप्रमाणे या अलुत्य— बलुत्यांचे तीन वर्ग करण्यात आले. १. सरकार आवश्यक वतनी गावकामगार २. रयत—अनावश्यक असे वतनी गावकामगार, यापैकी दुस—या आणि तिस—या वर्गातील वतनदार, जे सरकारला आवश्यक नाहीत अशांना कामाच्या तगाद्यापासून मुक्त करण्यात आले. जेणेकरुन त्यांची स्थिती आणि गावातील रयतेची स्थिती सारखीच झाली व त्यामुळे त्यांना वतन ॲक्ट लागू करण्यात आलेला नाही.

वतनदाराची कामे निश्चित नाही. कोणताही नोकर झाला तरी त्याने करावयाची कामे निश्चित असावयास पाहिजे होती. विशेषत: महार वतना संबंधी ध्यानात ठेवण्यासारखी गोष्टी ही की महारांची कामे मुळीचे निश्चित झालेली नव्हती. इतकेच नव्हे, तर ती मुद्दाम होउन सरकारने अनिश्चित ठेवली होती. सन १८४७ चा वतन ॲक्ट जेव्हा पास करण्यात आल, तेव्हा त्यांच्या १८, ६९ व ८३ या कलमांवर वादविवाद चालु असतांना काही लोकांनी महारांची कामे ठरावीक करण्याच्या दृष्टीने त्या कलमांत फेरफार करण्यात यावा अशी सुचना त्यावेळी कायदे कौन्सिलात आणली होती. परंतु सरकारने आपल्याला महारासारखे काही सांगकामे व हरकामे नोकर पाहिजेत, म्हणून ती सुचना मान्य केली नव्हती. स्वत:ची उन्नती करण्याच्या बाबतीत महार समाजाकडून चाललेल्या प्रयत्नांमध्ये ''महार की वतन" ही एक मोठी आडकाठी होती. वतनदार महारांना भाकरीचे हक्क यांच्या रुपाने त्यांच्या कामाचा मोबला देण्याची जी बहिवाट आहे. तोच महार समाजाच्या असहाय व निकृष्ठ स्थितीचे मुळ कारण होते.

काही समाजात केलेल्या कामाचा मोबदला म्हणून त्यांना थोडीशी जमीन देण्यात येत सओ आणि काही थोडेसे रुपये हे दिलेले वेतन इतके अल्प होते की, त्यात उपजीवीका करणे कठीण होते. त्यात सुधारणा करुन वतनदारीवर होणारा अन्याय दूर करण्यावर आंबेडकरांचा भर होता. १९३७ साली बाबासाहेबांनी मांडलेल्या विधेयकात कोणावरही वतन सोडून देण्याच्या बाबतीत सक्ती करण्याची तरततुद केलेली नसली, तरी वतन नष्ट करावे असेच आंबेडकरांचे मत होते आणि ते त्यांनी वतनदारांपासून लपवूनही ठेवले नाही. वतनात सुधारणा करण्यापेक्षा ते खारीज केलेले बरे, असे त्यांचे मत होते. वतनामुळे वतनदार स्वाभिमानशून्य झाले आहेत. त्यांच्यामधील महत्वाकांक्षा नष्ट झाली होती. सर्वांना ''स्वाभिमानानेच जीवन जगा'' असे सांगणारे व त्याकरिता त्यांना प्रवृत्त करणारे एकमेव दृष्टे डॉ. आंबेडकर होते.

''आपला देश कृषिप्रधान, खेडयांचा, येथील बहूतांशी शेतकरी गरीब व कष्टकरी त्यांची अत्यंत हलाखीची पण खोती पध्दती मुख्यत्वे रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यामध्ये आहे. त्यामुळे तेथील शेतकरी तडक, स्वाभिमान, हिंम्मत इत्यादी गूण गमावून बसला होता.''

खोती पध्दती व सावकारशाही —

पूर्वीच्या मुंबई प्रांतात विशेषत ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या जिल्हयात कमी प्रतीची कनिष्ठ जमिन फसणुकीची पध्दत होती तिलाच खोती पध्दती जात होते. रयतवारी पध्दतीत जो जमीन कसतो त्याच्या कडूनच सरकार प्रत्यक्षयपणे सारा जमीन—महसूल खेत गोळा करीत असे व तो सरकार दरबारी भरत असे. कुळे व सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध येत नसे. छोटया प्रमाणावर ही जमीनदारीच होती. शेतक—यांचे दारिद्रय व पिळवणूक

हा त्या भागातील मोठा ज्वलंत प्रश्नच उभा राहिला होता. कमालीचे श्रम करून देखील मिळकतीचा भाग सावकर आणि सरकारला द्यावा लागतो. विपन्नावस्था हेच शेतक—यांचे आयुष्य खोती पध्दतीत पिळवटून निघालेला शेतकरी संापात्तीक दूरावस्थेचा बळी ठरतो. या भीषणतेमूळेच डॉ. आंबेडकर खोती ही गुलामगीरी आहे असे म्हणतात. अशा अवस्थेत शेतक—यांचा आर्थिक स्तर कसा उंचावणार साधन शेतकरी आणि शेतकमजुरी यातील संबंध शोषक आणि शोषित अशा स्वरूपाचे असल्यामुळे सामान्य शेतक—यांला भवितव्य ते काय असणार खोत हा गावातील एक सुलतान असतो. शेतक—याना त्याचा सर्व प्रकारचा छळ सहन करावा लागतो. कारण शेतक—याच्या सर्व नाडया त्यांच्या हातात असतात.

खोती पध्दती विरूध्द त्यांनी प्रथम आवाज उठवला. रत्नागिरी येथे एप्रिल १९२९ मध्ये भरलेल्या गरिब व दलित वर्गियांच्या परिषदेत ही पध्दत रद्द करण्यासाठी त्यांनी जनतेला हाक दिली. खोती पध्दती रक्तशोषण करीत असून ती नाहिशी करण्यानेच शांतता आणि प्रगती साधेल असे सांगून त्या पध्दती विरूध्द चळवळ करण्याची त्यांनी प्रेरणा दिली.

अनुवांशिक काम करण्याच्या कायद्या प्रमाणे ग्रामीण भागात असणा—या दलितांना रात्रदिवस गावात काम करावे लागते आणि एखादा दलित नोकरदार कामावर जावु शकला नाही तर त्याच्या कुटुंबियांपैकी कोणाला तरी ते सरकारी काम करावेच लागे. अशा कष्टाच्या कामाबदल त्याला जमिनीचा एखादा तुकडा, ग्रामस्थांकडून थोडे धान्य, दर महिन्याला २ आणे ते रूपया—दिड रूपया १९३८ च्या भावात असा मुशाहिराही मिळत असे. या वतनामुळे दलितांचा स्वाभिमान नष्ट झाला होता. अत्यंत क्षुद्र अशा प्राप्तीसाठी करावे लागणारे कष्ट व वतन टिकविण्याची धडपड, त्यामुळे त्यांची महत्वाकांक्षा व कार्यक्षमता विलयास गेली होती.

डॉ. आंबेडकरांनी १७ सप्टेंबर, १९३७ रोजी मुंबई विधिमंडळात खोती पध्दत रद्द करण्या संबंधीचे विधेयक मांडले. जमीन कसणा—यांना कुळाचे वहिवाटीचे हक्क मिळावेत आणि रयतवारी आणावी हे विधेयकाचे साध्य होते. खोतांना योग्य अशी नुकसान भरपाई देण्याचा उद्येशही त्या विधेयकावर बोलतांना कमी करण्याचा प्रयत्न केला. आणि खोती ही प्रवृत्ती शेतक—यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे अशा स्वरूपाचे कायदे केलेत. राष्ट्रयस्तरावर सर्वाच्या फायद्याचे काम करून डॉ.आंबेडकरांनी राष्ट्रीय एकात्मतेत भर घातली. देशातील शेती व शेतकरी यांच्या बाबत डॉ. आंबेडकरांना केवढी कणव होती हे हया वरून दिसून येते.

## सामुदायिक शेती

डॉ. आंबेडकरांनी भुहीन मजूरांचा महत्वाचा प्रश्न सोडविण्यसासाठी एकचमार्ग आणि तो म्हणजे पडीत जमीन लागवडीखाली आणणे आणि ती भूहीन मजूरांना देण. भुहीन मजुरांच्या बाबत जमिनीची भूक ही फार प्रभावी असते. कुळकायद्यामुळे शेतक—यांची जमिनीची भूक भागेल अशी कल्पना होती, पण त्यामुळे भूहीन मजूरांचा प्रश्न सुटलेला नव्हता. जमिनींच हिस्से — एकत्रीकरण आणि कुळकायदा ही अधिकच वाईट व निरूपयोगी असतात, त्यामुळे भूहीन मजूरांचा प्रश्न सुटलेला नव्हता. जमिनींचे हिस्से — एकत्रीकरण आणि कुळकायदा ही अधिकच वाईट व निरूपयोगी असतात, त्यामुळे शेतक—यांची भरभराट होत नसते. फक्त सामुदायिक शेतीमुळेच भूहीन मजुरांचा प्रश्न सुटेल, असे त्यांना वाटत होते.

डॉ. आंबेडकरांच्या मते जमीन कसण्याच्या दृष्टिने विचार करता जमीनदारी पध्दती असमर्थनीय होत चालली होती. ती रद करावी यावरच त्यांनी भर दिला होता. जमीनदारीच उच्चाटन झाल्यानंतर व्यक्तिगत शेतकरी हा मालक न राता सरकार जमिनीचे मालक बनले पाहिजे. जमिनदारांच्या उच्चाटनाचा नैसर्गिक परिणाम सामुदायिक किंवा सहाकरी शेतीत झाला पाहिजे पण आम्ही अजुन फार व्यक्तीवादी आहोत. सहकारी शेती पध्दती ही जरी उपयुक्त व उत्पादनात वाढ करणारी असली तरी शेतक—याला ती त्याच्या हक्कावर आक्रमण केलयासारखी वाटते डॉ. आंबेडकरांनी जमीनदारी पध्दत उच्चाटन करुन पर्याय म्हणुन सामुदायिक शेती सांगितला आहे. अशा पर्यायामधून त्यांची दुरदृष्टी प्रकट होते.

## निष्कर्ष

महामानव डॉ. बी.आर.आंबेडकरांनी भारतातील शेतीबाबत जे विचार मांडलेले आहे. या विचारावरुन जमिन, संसाधने, मनुष्यबळ, वास्तव—मौद्रिक भांडवल, प्रचलित तंत्रज्ञान आणि विकास पुरक घटकांमध्ये परीपूर्ण समन्वय होणे गरजेचे आहे. परंतु त्यासाठी समाज व मानवनिर्मित कृत्रिम अडथळे व विषमता सर्वप्रथम हदपार

करणे देशहिताचे आहे. अशी आर्तहाक त्यांनी राष्ट हितासाठी राज्यकर्त्यांना व देशवासीनयांना दिलेली आहे. डॉ. आंबेडकरांचे प्रगल्भ विचार व पुरोगामी दृष्टिकोन आज वास्तव ठरत आहेत. यातच त्यांची बहूविध व्यक्तिमत्वाची उंची लक्षात येते.

## संदर्भ ग्रंथ

१. पानतावणे गंगाधर – १९९६ पत्रकार डॉ. बी.आर.आंबेडकर, प्रमिमाप्रकाशन, पूणे.
२. पोळ अरविंद – १९८६ डॉ. आंबेडकरांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार, सुगावा प्रकाशन पुणे.
३. लोकराज्य ऑक्टो २००६ – माहीती व जनसंपर्क महा.मुंबई.
४. आर्थिक विचारांचा विकास – डॉ. विजय कवीमंडळ, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

❖❖❖

# बदलत्या वळणावरील उल्लेखनीय वैदर्भीय कादंबरी 'कात टाकलेली नागीण'

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## सारांश

पांडुरंग श्रावण गोरे यांची 'कात टाकलेली नागीण' ही या बदलत्या टप्प्यावरची महत्त्वाची कादंबरी म्हणून गणली जाते. कादंबरीत तीन प्रमुख व्यक्तिरेखा आहेत – मंजुळा, बाळासाहेब आणि रंगराव. मंजुळा कादंबरीची नायिका आहे. मंजुळेच्या आयुष्याची विविध वळणे टिपण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

**बीजशब्द** :— वैदर्भीय, कादंबरी, कात टाकलेली नागीण, मंजुळा, हिरकणी

## प्रस्तावना

साठपूर्व आणि साठोत्तर असे दोन टप्पे वैदर्भीयच नव्हे तर समग्र मराठी साहित्यात महत्त्वाचे म्हणून अभ्यासले जातात. दोहोंना जोडणारा कालखंड बदलाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या टप्प्यावर जे साहित्य निर्माण झाले त्यात स्वातंत्र्योत्तर कालखंडातील समस्या, समाजव्यवस्था, ग्रामीण आणि शहरी जीवनातील चढउतार यांवर अधिक प्रकाश टाकण्यात आल्याचे दिसते.

पांडुरंग श्रावण गोरे यांची 'कात टाकलेली नागीण' ही या बदलत्या टप्प्यावरची महत्त्वाची कादंबरी म्हणून गणली जाते. वैदर्भीय साहित्यिकांत गोरे यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या साहित्यकृतींपैकी या कादंबरीची चर्चा व्यापक प्रमाणावर झाली आहे. वेगळ्या काही वैशिष्ट्यांसह आणि काही उणिवा किंवा दोषांसह ही कादंबरी अभ्यासली गेली, त्याचा लेखाजोखा या निबंधात माडला आहे.

## विषय विवेचन

वैदर्भीय जीवनाचे अस्सल वर्णन ज्या कादंबरीत आढळते ती पां.श्रा. गोरे यांची 'कात टाकलेली नागीण' ही प्रादेशिक कादंबरी १९६१ साली प्रसिद्ध झाली. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात प्रदीर्घ स्वरूपाची ही महत्त्वपूर्ण कादंबरी. दिलदार आणि झुंजार अशा वऱ्हाडच्या वर्णनाने परिपूर्ण अशा या कादंबरीतील मंजुळा उर्फ हिरकणीच्या जीवनातील ऊनसावल्यांचा इत्यंभूत आलेख आलेला आहे. वऱ्हाडची माती, माणसांचे ऋणानुबंध, गावातील बायाबापड्यांचे सुखदु:खाचे जीवन, त्यांचा बोलघेवडेपणा, तिथले वातावरण यांचे अतिशय उत्कटतेने वर्णन लेखकाने केले आहे.

या कादंबरीत मंजुळेच्या कथेसोबतच एक सजीव खेडे वाचकांपुढे उभे राहते. वास्तविक पाहता मंजुळेच्या जीवनातील चढउतार दाखवतानाच तत्कालीन वऱ्हाडातील इजारदार घराण्याची धूळधाण कोणत्या कारणास्तव झाली, याकडेही ही कादंबरी अंगुलीनिर्देश करते. मंजुळा ही निळोण्याच्या बापूसाहेब इजारदारांकडे शेतगडी म्हणून कामाला असलेल्या हिंमतची पत्नी. परिस्थिती गरिबीची असल्याने हिंमत त्याच्या पत्नीला सुखाचे दिवस देऊ शकत नाही, याची जाण त्याला असते. त्यामुळे ता दु:खी असतो. गरिबीमुळे व मंजुळेच्या सौंदर्यामुळे तिला काय त्रास होतो, याचे वर्णन करताना लेखकाची लेखणी काहीशी अधिक खोलात शिरलेली दिसते. 'तिच्या तारुण्याची कळी नुकतीच फुटून पाकळी पाकळी फुलली होती. तिच्या ओठातून व नखातून ओतप्रोत भरलेली ऐन जवानीची गर्द गुलाबी रोशनी सळसळत होती. नवतीची नव्हाळी म्हणजे अगोदरच उतू आलेल्या दुधावरची साय, ती केव्हाही गोडच असणार; पण तिच्यात सौंदर्याच्या साखरेची भर पडल्यावर त्या साखरसायेची गोडी जी अवीट असते, ती मात्र सांगून कळण्यासारखी नसते. पिंडदार पोटऱ्या, घाटदार मांड्या, थेड बेलण्याने लाटल्यासारखे सुडोल दंड, आणि बन्सी गव्हाच्या रंगालाही लाजविणारी शरीराची पिवळी कांती. सारेच काही गोड होते. पाहताना

कोणत्याही जीवाला सहज मोहनवाया करील असा आवळत्या गाठीसारखा अंगाचा कटकर नेटका बांधा तिला अगदी सुंदर खुलून दिसत होता."[१]

पां.श्रा. गोरे यांनी मंजुळेचे असे वर्णन केल्यावर बापूसाहेब इजारदारांच्या मुलाचे म्हणजे बाळासाहेबांचे तिच्या तारुण्यावर लक्ष गेल्यावरच्या प्रसंगांचे चित्रण विस्ताराने केले आहे. बाळासाहेब आपला मित्र रंगराव याच्या मदतीने तिला जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करतो. सुरुवातीला त्याला यश मिळत नाही; परंतु हिंमतचे आजारपण, त्याचा मृत्यू, मंजुळा व तिची सासू निराधार होणे अशा विविध घटनांमुळे परिस्थितीचा फायदा बाळासाहेबाला मिळून मंजुळा अडकते. 'तिच्या शरीराच्या माव्यावर जबरदस्तीने तिच्या कुचाची उशी करून, घटकाभर सुखनिद्रा भोगणारा हा घटकेचा प्रवासी यापुढे मात्र तिच्या सबंध शरीराला व्यापून कायमचा रहिवासी बनतो.'[२] पुढे तिला दिवस जातात आणि दुर्दैवाचे दशावतार तिच्यापुढे उभे ठाकतात. संकटांची चढती कमान तिला चढावी लागते. पापकर्म केले म्हणून गावपंच तिला गावाबाहेर काढतात. यवतमाळला तिच्यावर पोलिसांकरवी बलात्कार होतो. टवाळखोर परधर्मीय तिच्या भोवती घिरट्या घालतात. अशी संकटे येत तिच्या जीवनात काळाशार अंधार दाटत असतानाच तिच्या मावशीच्या रूपाने अचानक सूर्यासारखा प्रकाश तिला दिसू लागतो. मंजुळेच्या जीवनाला कलाटणी मिळते. तिचे यातनापर्व संपून आनंदी जीवनाचा प्रारंभ होतो.

या कादंबरीत तीन प्रमुख व्यक्तिरेखा आहेत – मंजुळा, बाळासाहेब आणि रंगराव. मंजुळा कादंबरीची नायिका आहे. मंजुळेच्या आयुष्याची विविध वळणे टिपण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. सुरुवातीला गरिबीच्या संसारातही समाधानी दिसणारी मंजुळा वाचकांना भेटते. नवऱ्याची समजूत काढणारी आणि प्रसंगी कोंड्याचा मांडा खाणारी मंजुळा हिंमतवान आहे, हेही पटते. नंतरच्या प्रत्येक प्रसंगांतून तिच्यावर संकटांचा भडिमार होताना दिसतो. या सर्व संकटांतून ती बाहेर पडून तिचा पुनर्जन्मच होतो, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पूर्वीची कात टाकून पूर्णत: हिरकणीच्या नव्या रूपात जेव्हा ती वाचकांसमोर येते, तेव्हा तिचे केवळ नावच बदलले नसते तर तिची वैचारिक पातळीही विलक्षण बदललेली असते. हिंदूधर्म, संस्कृती, वेश्याव्यवसाय, जातिव्यवस्था अशा विविध विषयांवर चर्चा करण्याइतपत ती बद्धिवंत झालेली असते. एक स्त्री म्हणून जितकी दु:खे तिच्या वाट्याला येतात, ती सर्व भोगून, सर्व यातनांतून प्रवास करत ती बाहेर पडते. या सगळ्या दु:खद घटनांतून तिचा नवा जन्म होतो. हिरकणीचा अवतार जणू तिला प्राप्त होतो आणि उर्वरित आयुष्य ती समाजातील दु:खी, पीडित लोकांच्या कल्याणासाठी झटू लागते. बाळासाहेबांमुळे तिच्या जीवनात असे दु:ख येते तरी त्यांच्याबद्दल तिला आदरच वाटतो.

बाळासाहेबांची व्यक्तिरेखा लेखकाने उठावदार केली आहे. बापूसाहेब इजारदाराचा मुलगा वडील जिवंत असेपर्यंत त्याच्या दबावाखाली असतो. नंतर मात्र रंगरावच्या सोबतीने जीवनातील सर्व दुर्गुणांचा यथेच्छ उपभोग घेतो. मनाने तो दुष्ट नाही, असे लेखकाचे मत आहे. मंजुळेवरील संकटांना आपण कारणीभूत आहोत, याची जाणीव व खंत त्याला आहे. तिला आर्थिक मदतही तो करतो. मात्र ती मदत तिच्यापर्यंत पोचत नाही. रंगरावमुळे त्याला अनेक निषिद्ध असे षौक लागतात आणि त्यामुळेच त्याच्या सर्वनाशाकडे त्याचे जीवन जाते. त्याच्या पत्नीवरही तो अन्याय करतो आणि जेव्हा या सर्व गोष्टींचा त्याला पश्चात्ताप होतो, तेव्हा दारूत विष घेऊन तो जीवन संपवतो.

मंजुळा आणि बाळासाहेब यांच्या व्यक्तिरेखांइतकीच महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे रंगराव. दुष्ट प्रवृत्तीचे हे पात्र कथानकाला सातत्याने गती देताना दिसते. मंजुळा आणि बाळासाहेबांच्या शोकांतिकेस हेच पात्र कारणीभूत ठरते. वृत्तीने दीर्घ धोरणी, संधीसाधू, पाताळयंत्री, स्तुतिपाठक असा बिलंदर रंगराव लेखक पां.श्रा. गोरे यांनी वर्णन केला आहे. बाळासाहेबांना बाई, बाटली, तमाशा, शंकरपट असे नाद तो लावतो. आपली चैन सदोदित सुरू राहावी म्हणून यवतमाळच्या माणिकशेठकडून तो बाळासाहेबांना कर्जही मिळवून देतो. बाळासाहेब आणि त्यांच्या पत्नीमधील वादाला, वैमनस्याला हा रंगरावच कारणीभूत असतो. तिच्यावर तो वाईट नजर ठेवतो. मंजुळेचाही तो दोन वेळा विनयभंग करतो. बाळासाहेबांच्या कारभारावर लक्ष ठेवणारा असल्याने त्यातून तो स्वत:ची भरपूर कमाई करून घेतो. याची माहिती बाळासाहेबांना होते; परंतु तोपर्यंत तो स्वत:च पूर्ण लुबाडला गेला असतो.

या व्यक्तिरेखांशिवाय लेखकाने बापूसाहेब, गजरा, गिरजा, लक्ष्मी ही पात्रेही वर्णन केलेली आहेत. बापूसाहेब पूर्वीच्या काळातील इजारदाराचा इरसाल नमुना आहे. गावातील लोकांच्या अडचणींचा फायदा घेऊन त्यांना लुबाडणे हेच त्याचे काम आहे. गजरा ही मंजुळेची जिवाभावाची मैत्रीण. तिची स्थिती आणि बाळासाहेबांच्या पत्नीची स्थिती सारखीच आहे. दोघीही समान परिस्थितीच्या बळी आहेत.

## मूल्यमापन

वैदर्भीय खेड्यातले जीवन तंतोतंत उभे करण्यात लेखक पुष्कळच यशस्वी झाले आहेत. खेड्यातील वातावरण, कामधंदे, व्यक्तींच्या बोलण्याच्या रीतीभाती, अघळपघळपणा या बाबी लेखकाने अत्यंत बारकाईने टिपून नेमक्या शब्दांत मांडल्या आहेत. नयदीवर धुणे धुण्यासाठी जमलेल्या मुलींनी एकमेकींची केलेली टिंगल, थट्टा तसेच चंद्रा, मैना, गजरा, तानी या तरुणींच्या आपापसातीली गुजगोष्टी, शेतकामाच्या वेळी मजूर स्त्रियांच्या गप्पा, नारायणने म्हटलेले डोबड्या आणि साजऱ्या बायकोचे गाणे, याला उत्तर म्हणून हरिणीने ऐकवलेली निळकंठ सुलकेची हृदयस्पर्शी कहाणी, श्रीमंतांच्या दबावाखाली कार्यरत असलेली ग्रामपंचायत, इतरांच्या जीवघेण्या दु:खात आनंद मानण्याची आसुरी वृत्तीची माणसे अशा विविधांगी वर्णनांनी ही कादंबरी ओथंबलेली आहे.

मंजुळेच्या आयुष्यातील चढउतार, तिच्यावर झालेल्या अन्यायानंतर तिचे पुन्हा खंबीरपणे उभे राहणे आणि परिस्थितीला सामोरे जात सगळ्या दु:खद घटनांतून तिचा नवा जन्म होतो. हिरकणीचा अवतार जणू तिला प्राप्त होतो आणि उर्वरित आयुष्य ती समाजातील दु:खी, पीडित लोकांच्या कल्याणासाठी झटू लागते. या सर्वांचा विचार करता लेखकाने दिलेले 'कात टाकलेली नागीण' हे शीर्षक समर्पक वाटते.

काही खटकणाऱ्या बाबी अशा — पहिली बाब म्हणजे भाषा. कादंबरीतील मंजुळेपासून तर बाळासाहेबांसह गजरा, सुंदराबाई अशी सर्वच पात्रे इतकेच काय तर लेखकही निवेदन करीत असताना ठसकेदार, लयबद्ध भाषेतच बोलताना दिसतात. संभाषण लयीत आणण्यासाठी लेखकाने शब्दांच्या जोड्या जमवण्याचा खटाटोप केल्याचे दिसते. कादंबरीच्या प्रारंभापासून अखेरपर्यंत ठसकेदार वाक्यांचीच लयलूट आढळते. सुरुवातीला या गोष्टीचे कौतुक वाटते, मनोरंजन होते; पण नंतर सुखाचा प्रसंग असो की दु:खाचा, सर्वच ठिकाणी अशी भाषा आल्याने ती कृत्रिम वाटते. शब्दांच्या नादात घोटाळत राहिल्याने त्यातील चैतन्य हरवते व वाचकांच्या हृदयाचा ठाव घेण्यात लेखक कमी पडतात.

दुसरी खटकणारी बाब म्हणजे कादंबरीतील अनावश्यक चर्चा. कादंबरीतील कथानकाला चर्चेने अवरुद्ध करू नये, असे म्हटले जाते. केवळ माहिती पुरविण्यासाठी चर्चा पेरल्या गेल्या तर आस्वादक्षमतेला धक्का पोचतो. या कादंबरीतील काही प्रकरणे गोष्टीवेल्हाणपणात किवा वादविवादाच्या कारणातून चर्चेत रमल्याचे दिसते. तिसऱ्या प्रकरणात सोनबा—तानबाची प्रदीर्घ चर्चा, सतराव्या प्रकरणातील बापूसाहेब—भाऊसाहेबांची चर्चा, एकोणिसाव्या प्रकरणातील गिरिजा—गजरा यांचे संभाषण, सत्ताविसाव्या प्रकरणातील बाबासाहेब—हिरकणी यांच्यातील संवाद हे सर्व बघितले की जाणवते की केवळ चर्चेसाठी हा खटाटोप आहे. कादंबरीतील कथानक विकासात त्यांचा किती सहयोग आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. या सर्व चर्चा वरवरच्या वाटतात. स्त्री—पुरुष संबंधांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन, वेश्यावृत्तीची कारणे, वेश्यांची समाजाला गरज, जाती समस्यांवर उपाय, कर्मकांडात अडकलेला धर्म, चातुर्वर्ण्य व्यवस्था अशा कितीतरी विषयांवरील चर्चा ह्या वाचकांना कंटाळा येईपर्यंत वर्णन केल्या आहेत. हिरकणीचे मूलभूत प्रश्न अतिशय आलंकारिक म्हणून कृत्रिम बनून आपली स्वाभाविकता गमावून बसताना आढळतात. तेहतिसाव्या प्रकरणात ती रत्नापूर खेड्यातील आगग्रस्तांच्या मदतीसाठी जातानाचे वर्णन आहे. त्यावेळी ती एक वाक्य उच्चारते, 'बाबासाहेब, उपेक्षेने गंजून चाललेले अक्षम्य, अनास्थेने उकिरड्यावर उघडे पडलेले, हे मानवजातीचे दिव्य अलंकार आपल्या मूलभूत दीप्तीने केव्हा झळकणार?' अशा वाक्यांमुळे स्वाभाविकता हरवल्यासारखी वाटते.

## समारोप

या कादंबरीतील दोष म्हणजे सातत्याने ठसकेदार, लयबद्ध भाषेतच बोलताना दिसणारी सर्व पात्रे, लेखकाने शब्दांच्या जोड्या जमवण्याचा केलेला खटाटोप आणि गोष्टीवेल्हाणपणात किवा वादविवादाच्या कारणातून अनावश्यक चर्चेत रमलेली पात्रे. या कारणांनी आस्वादक्षमतेवर परिणाम होतो. सुरुवातीला नायिकेच्या सौंदर्यवर्णनात व काहीशा शृंगारिक वर्णनात रमलेली लेखकाची लेखणी नंतर समस्याप्रधानतत्त्वाकडे वळली आहे. या कादंबरीची वैशिष्ट्ये म्हणजे खेड्यातील वातावरण, कामधंदे, व्यक्तींच्या बोलण्याच्या रीतीभाती, अघळपघळपणा या बाबी लेखकाने अत्यंत बारकाईने टिपून नेमक्या शब्दांत मांडल्या आहेत. तिच्यात आलेले वऱ्हाडचे वर्णन, वैदर्भीय बोलीत नसली तरी बऱ्याच वैदर्भीय शब्दांची रेलचेल, मुक्त हस्ताने केलेला म्हणी व वाक्प्रचारांचा वापर आणि उत्तम अशी तत्कालीन समस्याप्रधान कादंबरी म्हणून तिची गणना करता येईल. वैदर्भीय वाक्प्रचार आणि म्हणींचा हा ज्ञानकोश आहे, असे गौरवोद्‌गार डॉ. भाऊ मांडवकर यांनी काढले होते.

एकंदरीत बदलत्या वळणावरील एक उत्कृष्ट कादंबरी म्हणून पांडुरंग श्रावण गोरे यांच्या 'कात टाकलेली नागीण'कडे बघता येते.

## संदर्भ


१. गोरे पांडुरंग श्रावण, कात टाकलेली नागीण, प्रथमावृत्ती, १९६१, पृ. १३
२. उनि. पृ. ११८


## संदर्भग्रंथ


१. कुळकर्णी अ.अं., प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६८
२. देशपांडे कुसुमावती, मराठी कादंबरी पहिले शतक, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, प्रथमावृत्ती १९७५


❖❖❖

# राजे विश्वेश्वरराव यांचे सामाजिक व वेगळ्या विदर्भ चळवळीतील योगदान

प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## सारांश

पुरातन काळापासून आदिवासींची राज्यव्यवस्था या देशात आणि विशेषत: विदर्भात अस्तित्वात होती. विदर्भ हा पौराणिक काळापासून आर्थिक, राजकीय, सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असा प्रदेश होता. वेगळ्या विदर्भाच्या संदर्भात आज ज्या बाबींबद्दल बोलल्या जाते, त्या बाबींची कैफियत राजे विश्वेश्वरराव महाराज त्यावेळेपासून मांडत होते. दुर्गम भागातील आदिवासींचा विकास घडवून आणण्यास त्यांनी सतत प्रयत्न केले. सर्वधर्मसमभावाची भूमिका ठेवून त्यांनी समाजकार्य केले. निस्पृह जनसेवा, कुटुंबकल्याण संदेश, दुर्गम भागात पाणी, आरोग्य व शिक्षणविषयक सुविधांची निर्मिती ही काही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये होत. स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी सभा, संमेलने, मोर्चे, निवेदने आणि जेल भरो यात सतत संघर्षात्मक पवित्रा घेऊन लढले. कुणी कितीही आमिषे दाखविली तरीही शेवटपर्यंत त्यांनी वेगळ्या विदर्भाचा ध्यास सोडला नाही. वेगळ्या स्वतंत्र विदर्भाकरिता राजे विश्वेश्वरराव यांनी शेवटच्या श्वासापर्यंत दिलेला लढा, केलेले अतुलनीय प्रयत्न बघितले तर ते या वेगळ्या विदर्भाच्या ऐतिहासिक चळवळीचे महानायक ठरतात, हे सत्य नाकारता येणार नाही. आदिवासी समाजातून पुढे येऊन अहेरीच्या राजघराण्यातील राजे विश्वेश्वरराव यांनी वेगळ्या विदर्भाच्या चळवळीत जे महत्त्वपूर्ण योगदान दिले, त्याला तोड नाही.

## प्रस्तावना

वेगळ्या विदर्भाची गरज काय, असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. महाराष्ट्रात राहूनही विदर्भाची प्रगती होऊ शकते, असे मानणारा विदर्भेतर गट येथील राजकीय नेतृत्वाला विदर्भाच्या मागासलेपणाबद्दल दोष देतो. त्यात काही प्रमाणात सत्य असले तरी राजे विश्वेश्वरराव महाराजांसारखी काही विदर्भनिष्ठ मंडळी या प्रदेशात झाली आणि त्यांनी सामान्य जनांच्या आणि सातशे मैलांवरून शासन चालविणाऱ्यांच्या डोळ्यांत झणझणित अंजन घातले. तसे तर चांगल्या कामासोबत वर्तमानातील जग नसते कारण नवीन कल्पना उचलून धरण्यापेक्षा परंपरांना चिकटून राहणे ही समाजाची वृत्ती असते. म्हणूनच त्या काळच्या वर्तमानात ठार मारल्या गेलेल्या येशू खिस्ताला किंवा ॲरिस्टॉटलला त्या वर्तमानकाळाने नाकारले मात्र भविष्यकाळाने या दोघांनाही एकाला परमेश्वर तर दुसऱ्याला महान तत्त्ववेत्ता म्हणून मान्यता दिली.

असेच काहीसे वेगळ्या विदर्भ चळवळीचे झाले आहे. ह्या चळवळीने नेत्यांना मोठेपण दिले; परंतु विदर्भाचा विकास झाला नाही, किंबहुना तो होऊच नये असा राज्यकर्त्यांचा प्रयत्न दृष्टीस पडतो. संपूर्ण वैदर्भीय जनतेने एकनिष्ठपणे स्वतंत्र विदर्भाची चळवळ चालवून ती निर्णायक अवस्थेत आणली किंवा त्यासाठी प्राणपणाने लढली असे दिसले नाही. मात्र आदिवासी नेते राजे विश्वेश्वरराव महाराजच विदर्भाची खिंड बाजीप्रभूंसारखी जिवंत असेपर्यंत लढवित राहिले आणि विदर्भ चळवळीच्या सर्व नेत्यांमध्ये सच्चे वैदर्भीय राजकारणी म्हणून ओळखले गेले.

बीजशब्द : वेगळ्या, विदर्भ, राजे विश्वेश्वरराव, चळवळ, आदिवासी

## आदिवासींचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग

भारताचा इतिहास बघितला तर लक्षात येते की पुरातन काळापासून आदिवासींची राज्यव्यवस्था अस्तित्वात होती. '१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धातदेखील त्यांचा सहभाग होता. १८५७ च्या युद्धातील शहीद

शिरोमणी शंकरशहा रघुनाथशहा यांनी गोंडवाना क्षेत्रातून इंग्रजांच्या विरूद्ध विद्रोह पुकारला आणि १८ सप्टेंबर १८५७ ला त्यांना इंग्रजी क्रूर शासनाने फाशीवर चढविले.'[१]

क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांची शौर्यगाथा माहिती नाही, अशी व्यक्ती विरळीच. २६ ऑगस्ट १८९५ ला इंग्रज सरकारने त्यांना अटक केली होती.

वीर बाबुराव शेडमाके यांनी गोंडवाना क्षेत्रातच (गडचिरोली जिल्ह्यातील) घोट येथे जुलमी इंग्रजी राजसत्तेला शह देण्यासाठी आदिवासींची प्रचंड सेना तयार केली, ही घोटची जांबाज सेना लढाईसाठी सदैव तत्पर असून मातृभूमीच्या मुक्तीकरिता बलिदान देण्यास अग्रेसर होती. '२३ मार्च १८५८ ला घोटच्या या सेनेने वीर बाबुराव शेडमाकेंच्या नेतृत्वात इंग्रजांवर आक्रमण करून हजारो इंग्रजांना धारातीर्थी लोळविले. २७ एप्रिल १८५८ला घोटजवळील ब्राम्हणपेठ या गावात पुन्हा इंग्रजांशी सामना झाला. शेवटी इंग्रजांनी कूटनीतीचा वापर करून, अहेरीच्या राणी लक्ष्मीबाईंना हाताशी घेऊन वीर बाबूराव शेडमाकेंना पकडले व २१ ऑक्टोबर १८५८ ला त्यांना फाशी दिली. लगेच त्यांचा भाऊ पुढे आला व त्याने इंग्रज सरकारला नामोहरम केले व १८६० मध्ये त्यानेंही स्वांतत्र्य संग्रामाकरीता आहूती दिली.'[२]

याशिवाय संगाली रय्याना, उमाजी नाईक, तंट्या भिल्ल, भागोजी नाईक आणि ख्वाजा नाईक हेही आदिवासी लढवय्यांनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता बलिदान केलेले आहे.

स्वातंत्र्य लढ्यात आदिवासी महिलाही मागे नव्हत्या. त्यांनीही आपले कर्तृत्व सिद्ध करून दिले आहे. यात प्रामुख्याने राजकुमारी हसला, राणी मैनावती मडावी, राणी पद्मावती मडावी, राणी देवीकुंवर उईके, राणी हिराई यांचा उल्लेख करता येतो.

या सर्व उल्लेखांवरून विदर्भ हा पौराणिक काळापासून आदिवासींचा प्रदेश असला तरीही आर्थिक, राजकीय, सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न असा प्रदेश होता. जेव्हा जेव्हा प्रसंग पडला तेव्हा विदर्भातील मागासलेला समजला जाणारा आदिवासी समाज क्रांतियुद्धातही अग्रेसर राहिला. या आदिवासी समाजाने आपली पूर्वापार संस्कृती व परंपरा अजूनही जतन केलेली आहे. कारण त्यांना वर्षानुवर्षाची वैविध्यपूर्ण आणि विशेषत: ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

## वेगळ्या विदर्भ चळवळीत राजे विश्वेश्वरराव यांचे योगदान

आदिवासी नेते राजे विश्वेश्वरराव महाराजांनी ज्या स्वतंत्र विदर्भाचा जन्मभर ध्यास घेतला होता, त्याच्या परंपरा, संस्कृती, सामाजिक आणि राजकीय इतिहास, भौगोलिक वैशिष्ट्ये, उत्पादने, कृषी उद्योगधंदे इत्यादी पैलूंबद्दल समग्र माहिती बघितली तर लक्षात येते, की हा प्रदेश सर्वसंपन्न असा होता. ज्या ज्या वेळी स्वतंत्र विदर्भाचा प्रश्न निघाला, त्या त्या वेळी अनेक उद्योजकांनी, विद्वानांनी, राजकारणी आणि समाजकारण्यांनी साधार आपली कैफियत सरकारपुढे मांडली. त्याचे ऐतिहासिक उल्लेख बघितले की राजे विश्वेश्वरराव महाराज त्यावेळेपासून याबाबत त्यांची भूमिका ठामपणे मांडत होते. यासंदर्भात त्यांची दूरदृष्टी होती. येथील सगळ्या पैलूंची जाण तर त्यांना होतीच, पण ज्या आदिवासी समाजातून ते आले, तो समाज उपयुक्त सगळ्या बाबींमध्ये स्वतंत्र विदर्भाच्या कार्याला कसा काय हातभार लावू शकतो, हेच ते सांगत असायचे. त्यांची त्यांच्या समाजासाठी हीच कळकळ आणि दूरदर्शिता होती.

अहेरी येथील राजघराण्यात राजे विश्वेश्वरराव महाराजांचा जन्म झाला. जन्मत:च ते कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांचे शिक्षण अहेरी व पुणे येथे झाले. पुण्याच्या मिलिटरी शाळेत शिकत असताना प्राचार्य व प्राध्यापक ब्रिटीश होते. त्यांनी प्राचार्यांच्या भारतीय नसल्यावरून आवाज उठविला. पुढे देश स्वतंत्र झाल्यावर प्राचार्य व प्राध्यापकांना विद्यालय सोडावे लागले. यावरून त्यांच्या अंगी क्रांतीचे बीज शालेय जीवनापासूनच होते हे जाणवते.

महाराजांचे वडील जुन्या सी.पी.ॲन्ड बेरार मध्ये मंत्री होते. त्यांच्या निधनानंतर विश्वेश्वरराव राजे झाले. तरुण वयातच विश्वेश्वररावांवर ही जबाबदारी आल्याने आदिवासींच्या विकासाकरिता स्वतंत्र विदर्भाशिवाय पर्याय नाही, जे लक्षात आल्याने ते राजकारणात गेले. महाराष्ट्र विधानसभेवर ते सलग चारदा काँग्रेस विरोधात निवडून गेले व लोकसभेवरही निवडून गेले. त्यांच्या याच काळात कृषी विद्यालय, विद्यालये व महाविद्यालये आदिवासी भागात सुरू झाली.

दुर्गम भागातील आदिवासींचा विकास घडवून आणण्यास त्यांनी आदिवासी सेवा मंडळाची स्थापना केली. खेडे विकसित पावणार नाहीत तोवर देशाचा विकास होणार नाही, असे त्यांचे मत होते, म्हणूनच

आदिवासी समाज कष्ट करण्यास प्रेरित व्हावा यासाठी त्यांनी या संपूर्ण परिसरात पदयात्रा काढल्या. राजांनी आदिवासींसोबतच दलित, गरीब समाजदेखील एक व्हावे यासाठी प्रयत्न केले. त्यांनी पूर व अतिवृष्टीत आपल्या वाड्यातून अन्न, वस्त्र व भांड्यांचे वितरण अनेकदा केले. राजांनी खमनचेरू येथे 'वन कामगार सोसायटी'ची स्थापना केली. याद्वारे गोरगरीब आदिवासींना रोजगार मिळवून दिला. तसेच वनमजुरांना खाण्याचे साहित्य, ब्लॅंकेट व सायकलचे वाटप करण्यात येत असे.

ज्या आदिवासींजवळ जमिनीचा छोटासा तुकडा असेल त्यांना ती जमीन कसता येईना. त्यावेळी तेव्हा त्यांनी येचली या गावी सामुदायिक शेती सहकारी संस्थेची स्थापना केली व अनेक आदिवासी शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

अतिदुर्गम आदिवासींना एकत्र आणून त्यांना विकासासाठी कार्यप्रवृत्त करणे, हक्क व कर्तव्याची जाणीव करून देणे ह्या उद्देशाने महाराजांनी इ.स. १९६० मध्ये अहेरी येथील हॉकी मैदानावर संपूर्ण भारतातील आदिवासींकरीता एक भव्य अधिवेशन आयोजित केले होते. आदिम जनतेमध्ये जागृती व विकास करण्यासाठी १९६२ मध्ये 'गोंडवाना' वृत्तपत्र सुरू केले. राजांनी कृषी विद्यापीठासाठी आंदोलन केले. त्यात १० तरुण शहीद झाले. त्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या लढ्याला यश आले आणि इ.स. १९६९ मध्ये अकोला येथे कृषी विद्यापीठाची स्थापना झाली.

जल, जंगल, जमीन यावर विसंबून असलेला आदिवासी समाज जो आपली अस्मिता गमावून बसला आहे, त्यांना जागृत करण्यासाठी महाराजांनी 'विदर्भ जंगल कामगार संघटना' स्थापन केली. त्यानंतर मजुरांना योग्य मजुरी मिळू लागली व इतरही फायदे मिळाले. शेतकऱ्यांच्या समस्या दूर करण्यास त्यांनी 'धर्मराव फार्मिंग सोसायटी' स्थापन केली. त्याद्वारे शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले.

राजे विश्वेश्वरराव महाराजांनी निस्पृह जनसेवा केली. कुटुंबकल्याण संदेश त्यांनी आदिवासींपर्यंत पोचविला. दुर्गम भागातील लोक साथींच्या रोगाला बळी पडतात. तिथे आरोग्यविषयक सोयीच नसतात. तिथे आरोग्य केंद्रे सुरू होण्यासाठी प्रयत्न केले. प्राथमिक स्वास्थ केंद्रासाठी स्वत:ची जागा दिली. अहेरी येथे राजांनी स्वत: दवाखाना सुरू केला तर त्यांच्याच प्रयत्नांनी आलापल्ली येथे वनविभागाने दवाखाना सुरू झाला. अहेरी परिसरात पिण्याचे स्वच्छ पाणी जनतेला उपलब्ध होत नव्हते. राजांनी सरकारकडे सतत पाठपूरावा करून पहिल्या पंचवार्षिक योजनेत ९ विहिरी मिळवल्या तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत २६ विहिरी बांधून घेतल्या.

समाजाकार्य करताना त्यांची भूमिका सर्वधर्मसमभावाची असे. राजांनी आर्य वैश्य समाजाच्या कन्यका मंदिराच्या बांधकामासाठी १० हजार चौरस फुट जागा अहेरी येथे दान दिली तसेच मुस्लिमांसाठी इदगाह बांधण्यास एक एकर जागा दिली. विठ्ठल रूक्माई मंदिर बांधले. राजे साईभक्त होते. एकदा साईबाबांच्या कृपेने ते बचावले, असे ते स्वत: सांगत. तेव्हापासून दसऱ्याला वाड्यातून साईबाबांची पालखी आजही निघते.[३]

महाराजांच्या प्रयत्नाने संपूर्ण आदिवासी परिसरात ११०० मैल रस्ते तयार झाले. वाहतुकीची सोय नव्हती, तेव्हा राजांनी एस.टी. मंहामंडळाला आपली दुबार पिकाची जमीन दान केली. तेथे आज मोठे बसस्थानक आहे. राजांनी वनचराई फी माफीसाठी मोठे आंदोलन केले व फी माफी मिळवली. आदिवासींसाठी गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी घडवून आणली.

अशा सामाजिक व राजकीय कार्यासोबतच त्यांचे स्वतंत्र विदर्भाचे आंदोलनही सुरू असायचे. विदर्भाचे राज्य जर स्वतंत्र झाले तर आदिवासींचा विकास होईल, सर्वदृष्टीने विदर्भ उजळून निघेल यावर राजे ठाम होते. म्हणूनच बापूजी अणे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात व स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीत स्वत:ला झोकून दिले. या चळवळीतील जवळपास सर्वच नेते कॉंग्रेसवासी झाले. राजांनाही मंत्रीपदाचे आमिष दिले गेले. पण राजेसाहेबांनी आपल्या मूळ स्वभावाला अनुसरून जनताजनार्दनाचे भले हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवत शेवटच्या श्वासापर्यंत स्वतंत्र विदर्भ चळवळीलाच महत्त्व दिले व ही चळवळ सतत जनतेच्या सहभागाने पुढे नेली, ती आयुष्याच्या अखेरपर्यंत!

आदिवासींचा जिव्हाळयाचा नेता, राजकारणावर प्रभाव पडेल असे राजकीय, सामाजिक व शैक्षणिक नेतृत्व महाराजांमध्ये होते. राजे विश्वेश्वरराव महाराजांना मंत्री पदाचे आकर्षण नव्हते. राजे शेवटपर्यंत वेगळ्या विदर्भासाठी अट्टाहास धरून बसले त्यांचे निकटवर्ती जाबुवंतराव धोटे, बापूजी अणे, ब्रिजलाल बियाणी, पुनमचंद रॉंकाजी या सर्वांसोबत राहून त्यांनी विदर्भातील अनेक सभा घेतल्या, मोर्चे काढले, पदयात्रा काढल्या व वेगळा विदर्भ व्हावा यासाठी आदिवासी बांधवांना गोळा करून विदर्भाची कास पकडून ठेवली. 'जय विदर्भ' हा त्यांचा नारा होता. मी जगेल तर विदर्भासाठीच व मरेल तर विदर्भासाठीच हे शेवटपर्यंत त्यांचे ब्रीद होते.

राजे विश्वेश्वरराव महाराजांनी सार्वजनिक जीवनात स्वतंत्र विदर्भ राज्याचा हिरीरीने पुरस्कार केला. स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी सभा, संमेलने, मोर्चे, निवेदने आणि जेल भरो यात सतत संघर्षात्मक पवित्रा घेऊन लढले. कुणी कितीही आमिषे दाखविली तरीही नाग विदर्भ आंदोलन समितीला शेवटपर्यंत त्यांनी सोडले नाही. आदिवासी दुर्गम क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार, राजकारणात प्रखर काँग्रेस विरोध, पराभव झाल्यावरही सौजन्यशील वागणूक असे त्यांचे आणखी काही गुण सांगता येतील.

राजे विश्वेश्वररावांनी आरंभापासून विदर्भ राज्याच्या स्वप्नांचा ध्यास घेतला अन् त्या मागणीसाठी आपले राजकारण राबविले. हा ध्यास एवढा तीव्र की त्यात त्यांचे मूळचे आदिवासी सेवा मंडळ हरवले आणि त्याची जागा 'नागविदर्भ आंदोलन समिती' या नव्या संघटनेने घेतली. कै. बापूजी अणे आणि कै. ब्रिजलाल बियाणी यांच्यानंतर त्या चळवळीची धुरा खरे तर विश्वेश्वरराव यांच्याकडे येण्याची शक्यता होती. हुकमी मतदारसंघ असणारे त्या चळवळीतील तेच एक तेव्हाचे नेते होते. मात्र याच काळात जांबुवंतराव धोटे यांचे नेतृत्व या चळवळीत पुढे आले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आक्रमकता आणि साऱ्या विदर्भाच्या पातळीवरील त्यांची स्वीकारार्हता मोठी होती. विश्वेश्वररावांच्या स्वभावातील विशेषता अशी की, चळवळीतील आपल्या ज्येष्ठतेचा हेका न धरता त्यांनी जांबुवंतरावांचे नेतृत्व मोकळ्या मनाने मान्य केले. पुढे जांबुवंतराव जेव्हा काँग्रेसकडे गेले तेव्हा विश्वेश्वररावांनी त्यांच्यापासून आपली चळवळ आणि संघटना वेगळी केली.

विदर्भाचे राज्य वेगळे करायचे तर आपल्या मागणीमागे जनमत उभे केले पाहिजे आणि सत्तारूढ पक्षाशी संघर्ष जारी ठेवला पाहिजे, हे त्यांना माहीत असल्याने ते विदर्भाच्या भूमिकेवर अखेरपर्यंत ठाम राहत विदर्भाच्या प्रश्नासाठी सत्तेशी कायमचे वैर ठेवून लढले.

आदिवासींचे हृदयसम्राट राजे विश्वेश्वरराव महाराज ऐश आरामाचा त्याग करणारे, तीव्र मतभेदांना तोंड देणारे, मानसिक ताण सहन करणारे 'नागविदर्भ आंदोलन समिती'ची स्थापना करणारे एक आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणून महाराजांकडे पाहिले जाते.

सत्तेच्या प्रलोभनाला कधीही बळी पडले नाहीत. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांच्याही अमिषांना, बळी न पडता प्रवाहासोबत न जाता विरोध करून शुद्ध राजकारण करणारे एकमेव राजे विश्वेश्वरराव होय. ते शेवटच्या क्षणापर्यंत वेगळ्या विदर्भासाठीच लढले.

दूरदृष्टी बाळगणारे, सत्यनिष्ठ, क्रांतिकारी, कर्मयोगी राजे विश्वेश्वरराव महाराज आपल्या रयतेसाठी, आदिवासींचा विकास व्हावा यासाठी व वैदर्भीय जनतेसाठी आयुष्यभर लढले. आदिवासींची संस्कृती टिकली पाहिजे यासाठी त्यांचा आग्रह होता. जंगलतोड होऊ नये अन्यथा पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवेल हा त्यांचा विचार द्रष्टेपणाचा ठरतो. राजे सत्तेच्या मागे राहिले नाहीत उलट पदेच त्यांच्या मागे असत. त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक क्षेत्रातही आदिवासींच्या उत्थानाचे कार्य केले.

आदिवासी नेते राजे विश्वेश्वरराव महाराजांनी १९६२ साली नागविदर्भ आंदोलन समितीत प्रवेश करून वेगळ्या विदर्भाच्या मागणीचे रणशिंग फुंकले. नंतरच्या प्रदीर्घ वाटचालीत या आंदोलनाने अनेक स्थित्यंतरे अनुभवली. लोकनायक बापूजी अणे, श्री. ब्रिजलाल बियाणी यांच्यासारख्या दिग्गजांनी विदर्भ चळवळीचे नेतृत्व केले. पुढे जांबुवंतराव धोटे यांच्यापासून टी. जी. देशमुख, बाळकृष्ण वासनिक यांच्यापर्यंत अनेक नेते विदर्भाच्या मागणीसाठी पुढे आले व बरेचजण आमिषांच्या वावटळीत उडून गेले; पण राजे विश्वेश्वरराव महाराज यांनी आपला मार्ग काही सोडला नाही. या संपूर्ण प्रवासात राजे विश्वेश्वरराव महाराज मात्र अगदी निश्चल होते. त्यांच्यापुढे काँग्रेस नेत्यांनी अनेक प्रलोभने ठेवली यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ते शंकरराव चव्हाण यांच्यापर्यंत सर्व जेष्ठ काँग्रेस नेत्यांनी, राजे विश्वेश्वरराव महाराजांनी काँग्रेसमध्ये यावे असे प्रयत्न केले. शरद पवार यांनी तर 'पूलोद सरकार'मध्ये सहभागी व्हायचे निमंत्रणच त्यांना दिले होते. एखादा सामान्य नेता असता तर चालून आलेली अशी संधी त्यांनी सोडली नसती; पण राजे विश्वेश्वरराव महाराजांनी हे प्रस्ताव धुडकावून लावले. कोणत्याही आमिषाला ते बळी पडले नाहीत. नागविदर्भ आंदोलन समितीचा जो झेंडा त्यांनी रोवला होता, त्याच्याशी ते एकनिष्ठ राहिले.

## समारोप

राजे विश्वेश्वरराव महाराजांनी आपल्या जीवनात एकच ध्येय उराशी बाळगले, ते म्हणजे 'स्वतंत्र विदर्भ' आणि या ध्येयासाठी ते सतत ३५ वर्षे अक्षरश: दौडत होते. त्यासाठी त्यांच्या आवडीचा प्रांत, समाजकारण त्याला सोबत करून ते राजकारणात प्रवेश करते झाले. राजकारणात घडणाऱ्या गलिच्छ सौदेबाजीला

स्वत:च्या निग्रही वृत्तीने ठोकरले. त्यांच्यासोबतचा स्वतंत्र विदर्भाच्या आंदोलनातील एकएक मोती निखळला व सत्तांच्या शिखरावर स्थानापन्न झाला. राजांनादेखील सत्तेत आणण्याचे प्रयत्न झाले; परंतु राजे स्वत: ध्येयनिष्ठ असल्याने अशा मतलबी राजकारणाला ते बळी पडले नाही. यातून अनेक नेत्यांचा त्यांनी रोष पत्कारला; परंतु स्वध्येयापासून मात्र ते विचलित झाले नाही. खरेतर ते मुत्सदी राजकारणीही नव्हते; पण ध्येयनिष्ठा व प्रखर विचारांनी त्यांची राजकारणातील उंची वाढवून दिली. 'राजांना धरसोड वृत्तीचा तिरस्कार होता. राजकारणात माणसाने स्वत:ची मते निर्माण करावी, ध्येय ठरवावे व त्यामागे प्राणपणाने लागावे, या विलक्षण ध्येयासक्त विभूतीने आपल्या जीवनाचा अंत होईपर्यंत विदर्भ राज्याची मशाल स्वत:च्या खांद्यावरून उतरू दिली नाही. सर्व नेते सोडून गेले; पण राजे मात्र हे आंदोलन करीतच राहिले. एक प्रकारचे झपाटलेपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते. म्हणून सहकारी काय करतात, कुठे जातात, या वादात ते कधी पडले नाहीत. सतत 'एकला चलो रे' या उक्तीप्रमाणे स्वतंत्र विदर्भासाठी जो ध्यास त्यांनी घेतला त्यासाठी ते अचल हिमालयासारखे उभे राहिले. राजकारणात असा नेता मिळणे निव्वळ अशक्य आहे. म्हणून केवळ आणि केवळच राजे विश्वेश्वरराव महाराज हेच स्वतंत्र विदर्भ चळवळीचे अध्वर्यू: ठरतात.'[४]

विदर्भ अजूनही महाराष्ट्रापासून वेगळा झालेला नाही. सिंचनाचा आणि एकूणच विदर्भाचा अनुशेष वाढतच आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे विदर्भाचे आहेत. मात्र सहकारी पक्षांच्या विरोधामुळे वेगळ्या विदर्भावर त्यांचे मौन आहे. चळवळी मंदावल्या आहेत. विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण भयानक आहे. विदर्भाच्या वाट्याचा बराचसा पैसा पश्चिम महाराष्ट्र पळवून नेतो, अशी ओरड सतत होत आहे. अशा या विदारक सत्याच्या पार्श्वभूमीवर वेगळ्या स्वतंत्र विदर्भाकरिता राजे विश्वेश्वरराव यांनी शेवटच्या श्वासापर्यंत दिलेला लढा, केलेले अतुलनीय प्रयत्न बघितले तर ते या वेगळ्या विदर्भाच्या ऐतिहासिक चळवळीचे महानायक ठरतात, हे सत्य नाकारता येणार नाही. आदिवासी समाजातून पुढे येऊन अहेरीच्या राजघराण्यातील राजे विश्वेश्वरराव यांनी वेगळ्या विदर्भाच्या चळवळीत जे महत्त्वपूर्ण योगदान दिले, त्याला तोड नाही.

## संदर्भ


१. धुर्वे, विट्ठलसिंह, कथा इन मुलनिवासी कर्मवीरोंकी, गोटुल प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, पृ. ९
२. तत्रैव
३. https://books.google.co.in/books/The Gonds of Vidarbha_ By Shashishekhar Gopal Deogaonkar
४. अग्रलेख, दै. तरुण भारत, नागपूर, २९–३–१९९७, पृ. ४


❖❖❖

# Guidelines for Authors

Research Journal of India is a Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-disciplinary studies of various faculties.

Vision and Mission of Research Journal is to provide momentum to research in the all areas like analytical, competitive, survey, contemporary issues and quality control.

**Call for Research Paper**

1. Paper on all subjects and areas will be accepted in English, Hindi or Marathi.
2. Paper should be **A 4** size with 1.25 inch margin on each side.
3. No header & footer should be given.
4. Text should be in **Times New Roman** type with font size **11** in English and **Krutidev 50** type with **14** font size for Hindi/Marathi and should be computed in MS word only. PDF files will not be accepted.
5. Font size for Title of Paper 22 bold for English and 26 bold for Hindi/Marathi, Name of Author in 12 bold for English, 16 bold for Hindi/Marathi, address in 11 for English, 14 bold for Hindi/Marathi & Subtitles in 14 bold for English and 18 bold for Hindi/Marathi. For Marathi and Hindi articles Krutidev 50 font should be tatally bold for all matter.
6. Spacing should be **single**. Alignment for paper & headings should be justified & centered for title of paper & name of writer with address.
7. The first page should consist of title, name(s) of author(s) with designation, department or college with full address, contact numbers and mail id at the centre below title.
8. Introduction, review of literature, background of study, methodology, objectives, purpose, hypothesis, significance, findings and discussion, analysis, conclusion, recommendations may be given wherever required.
9. References list should be alphabetized at the end of research paper.
10. Tables & figures should be cited in the text in consecutive numerical order. Each figure should have concise and informative caption.
11. Maximum limit is 2500 words or 5 pages. Abstract should be up to 150 words followed by 4-5 key words. Paper exceeding 5 pages will be charged Rs. 100 per additional page. Only abstract or paper less than 3 pages or without references will not be accepted.
12. Authors have to send research paper by e mail at: **marathipradhyapak@gmail.com**

11\. Editorial Board's Decision will be final.

13\. The copyright of all accepted papers will vest with **Research Journal of India.**

14\. International Guidelines for writing of research paper are to be strictly followed.

15\. Date of Publishing is 1rst October each year and papers will be accepted up to 15th August.

Subscription for one year and single issue price for individual, institutional Rs. 500/- to be deposited in A/c No. – 60175373000 of Bank of Maharashtra, Azad Maidan Road, Yavatmal, IFSC code - MAHB0000047 in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre.

❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

Statement about ownership and other particular about the Journal

## Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226170, 226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in

For University : indiram414@sgbau.ac.in

For Research centre : marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983



| | | |
|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional / Single Issure ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal |
| IFSC code | - | MAHB0000047 |
| MICR coe | - | 445014001 |
| A/c No. | - | 60175373000 |
| Mode of Payment | - | By NEFT transfer or crossed Multi city cash at par Cheque or by Demand Draft of Nationalized Bank favorably Bank of Maharashtra payable at Yavatmal or by cash deposit in A/c in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre |



(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



ISSN 2349-9370

9 772349 937002